भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
राष्ट्रीय पुस्तकालय, कलकत्ता।
NATIONAL LIBRARY, CALCUTTA.

Mar

वर्ग संख्या
Class No 891·462

पुस्तक संख्या
Book No Kr 42.1vi

रा० पु०/ N. L. 38.

MGIPC—S1—59 LNL/64—1-11-65—100,000

DBA000009187MAR

प्रस्तावना.

"इंग्रजी राज्याचा उदय झाल्यापासून," किंवा "हल्लीं विद्येचा प्रसार जोरानें सुरू आहे," इत्यादि ठरींव रीतीनें आरंभ करण्याऐवजीं या पुस्तकाबद्दल त्रोटक माहिती एकदम देण्यास सुरवात करावी हें बरें.

प्रस्तुत नाटक लिहिण्यास सुरवात करून दोन तीन वर्षें झालीं; चार पांच प्रवेश झाल्यावर बरेच दिवस हें नाटक तसेंच भिजत पडलें होतें; व एक सुयोग घडून आला नसता तर वीरतनयाचा अंत गर्भावस्थेंतच झाला असता.

प्रसिद्ध किर्लोसकर मंडळीनें संगीत नाटकाविषयीं एक जाहिरात प्रसिद्ध केली आहे. असें ऐकिल्यावरून बाकीचे प्रवेश होतील तितक्या त्वरेनें पुरे केले, व पुस्तक मंडळीकडे रवाना केलें. पुस्तक पसंत पडून ठरविलेलें बक्षीसही देण्यांत आलें. नाटक प्रथम करुणपर्यवसायि होतें तें मंडळीच्या आग्रहावरून आनंदपर्यवसायि करण्यांत आलें आहे.

पुस्तक लिहितांना पुस्तककर्त्यांचे दोन हेतु होते. एक तर शृंगाररसाबरोबर वीररसही आणण्याचा प्रयत्न करणें, व दुसरा नवीन चालींवरील पदें प्रचारांत आणणें.

वीररसप्रधान नाटकांच्या अवश्यकतेविषयीं दोन मतें असण्याचा संभवच नाहीं. प्रश्न राहिला काय तो प्रथम निर्दिष्ट केलेला हेतु कितपत सिद्धीस गेला आहे याविषयीं. संभोगशृंगारापेक्षां विप्रलंभशृंगारासच प्राधान्य दिलेलें सुज्ञ वाचकांस चोहोंकडे आढळून येईल. संभोगशृंगार तरी करवेल तितका सौम्य करण्याचा प्रयत्न केला आहे. या नाटकापासून फारसा उपयोग जरी झाला नाहीं तरी त्यापासून विशेष तोटा होऊं नये इतकी खबरदारी घेतली आहे.

प्रस्तुत नाटकाच्या नामकरणावरून सुद्धां वरील हेतूची अटकळ सहज करितां येण्यासारखी आहे. " या चिमुकल्या वीरामुळेंच हा आनंदाचा समय प्राप्त झाला आहे " या प्रकोपाच्या मतासच बहुतेक वाचकांचीं मतें अनुकूल होण्याचा जरी संभव आहे तरी 'वीरतनयास' आंतील पृष्ठांपेक्षां मलपृष्ठावरच अधिक महत्त्व दिलेलें टीकाकारांस तरी दिसून येईल. पण वरील हेतूकडे लक्ष्य पुरविलें असतां या नाटकाचें नामकरण श्लाघ्य जरी नाहीं तरी क्षम्य वाटेल अशी उमेद आहे.

आतां दुसरा हेतु नवीन चालींसंबधानें. नाटकांतील पद्यांच्या चाली बहुतकरून मुंबईतील पारशी व गुजराथी नाटकमंडळींच्या नाटकांतून घेतल्या आहेत. " बल्लागर तुझी, " " मजवरि हें आलें, " इत्यादि जुन्या परिचयाची मित्रमंडळी आढळून न आल्यामुळें श्रोत्यांची जी निराशा होईल ती अंशतः तरी चालींच्या वैचित्र्यामुळें भरून येईल अशी आशा आहे. पद्यांवर राग व ताल दिले असून चाली मुळींच दिलेल्या नाहींत. पण बहुतेक चाली मुंबई येथें अंशतः, व इतर गांवीं सर्वथा अपरिचित असल्यामुळें पदांच्या चाली देणें हें अनवश्यक झालें असतें; कांहीं ठिकाणीं चाली अपुर्‍या घेतल्यामुळें व कांहीं ठिकाणीं त्यामध्यें फेरफार केल्यामुळें तसें करणें हें चुकीचेंही झालें असतें

संगीत नाटकांतील राग व रागिण्या यांच्या क्रमासंबधानें बराच मतभेद असतो. संविधानकांतील कालानुसारें, नाटकप्रयोगाच्या कालानुसारें, व रसानुसारें, असे जे तीन प्रकार आहेत त्यांपैकीं तिसरा बरा वाटल्यावरून त्याचेंच अवलंबन केलें आहे.

आजपर्यंत किर्लोसकर मंडळी जीं सर्वमान्य नाटकें करीत आली आहे त्यांच्या जोडीला बसण्याची प्रस्तुत नाटकाची योग्यता आहे कीं नाहीं

याबद्दल पुस्तककर्त्यासही बराच संशय आहे; 'शाकुंतल' व 'सौभद्र' यांची तुलना करितांना "कालिदासमुख-कविकृति पक्वान्नें सेवुनि विटले। रसिक तयांना पुनर्बुभुक्षाकरणीं निखटचि केलें" हे उद्गार कविशिरोमणि अण्णासाहेब किर्लोसकर यांच्या मुखांतून केवळ नैसर्गिक शालीनतेमुळें पडले; तसेच शब्द इतर नाटकें व प्रस्तुत नाटक यांसंबंधानें प्रस्तुत कवीस स्वतःच्या कार्यक्षमतेविषयीं शंका उत्पन्न होऊन काढावे लागावे हें अगदीं साहजिक आहे. तरी पण नगर, नाशिक, व कल्याण या ठिकाणीं प्रेक्षकांनीं या नाटकास उदारबुद्धीनें जें उत्तेजन दिलें त्यावरून (भीनभीतच कां होईना) रसिक जनांच्या मनोरंजनाकरितां हें नाटक पुढें आणिलें आहे.

हें स्वतःविषयीं झालें. आतां ज्यांनीं या नाटकासंबंधानें आपला अमोल वेळ खर्चून मला मदत केली त्यांचे आभार मानावयाचे राहिले आहेत. रा. रा. नारायणराव फाटक, बी. ए. एल्. एल्. बी., इसलामपूरचे मबजज, यांनीं या नाटकास जें प्रोत्साहन दिलें, माझे मित्र रा. रा. भास्कर रामचंद्र नानल, बी. ए., यांनीं भाषणें सुधारण्याच्या व नाटक आनदपर्यवसायि करण्याच्या कामीं जी बिनमोल मदत केली, तसेंच, रा. रा. लक्ष्मण गणेश महाजनि यांनीं चालींसंबंधानें, व रा. रा. विनायक बाळकृष्ण पंडित यांनीं प्रुफें तपासण्यासंबंधानें व इतर गोष्टींतही जें साहाय्य केलें, त्याबद्दल पुस्तककर्ता त्या त्या गृहस्थांचा फार ऋणी आहे. निर्णयसागर छापखान्याचे चालक शेट तुकाराम जावजी यांनींही पुस्तक छापविण्यासंबंधानें जी खटपट केली तिजबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्यक आहे.

सरतेशेवटीं किर्लोसकर मंडळीचे आभार मानावयाचे राहिले आहेत. पुस्तककर्ता या नात्यानें आभार मानिले तर पक्षपातित्वाचा

नसता दोष त्यांच्या अंगीं लाविल्यासारखें होईल. बरें, मानिले नाहींत, तर तेंही गैरच. तर हा प्रश्न असा संशयांतच ठेवून समाजांतील व्यक्ति या नात्यानें, मराठी भाषेबद्दल त्यांनीं जी कळकळ व्यक्त केली तिजबद्दल आभार मानून व त्यांनीं याप्रमाणेंच पुढेंही मराठी कवींस उत्तेजन देण्याचा क्रम चालू ठेवावा अशी सूचना करून त्यांची व वाचकांची रजा घेतों.

मुंबई,
सप्टेंबर १८९६.

पुस्तककर्ता.

श्री

संगीत वीरतनय.

मंगलाचरण.

झिंजोटी—त्रिवट.

धन्य तुझी रचना । वचनातिगा तव कृति अपार ॥ ध्रु० ॥ त्रिभुवन-चालक तूं या विश्वाचा हेतु ॥ जरी प्रभो तूं शून्याकार । तरिही असशी जगदाधार ॥ १ ॥ असशी ईशा तूं अविकार् । तरिही करुणापारावार ॥ २ ॥

झिंजोटी—धुमाळी.

प्रभो पदकमल नमीं तव विमल सदया विनयान्वित या हृदया ठेवोनीयां ॥ ध्रु० ॥ अंबरचरवर शंबररिपुहर लंबभुजंग-कदंब दिगंबर धृतजगदंब अनित-हेरंब तवचि उज्जृंभण जगदाडंबर तूंची धाता तूंची नेता होसी माता तूंची त्राता आम्हां मर्तां संसारार्णवीं या आवर्तांमाजी भर्ता तूंची ईशा ॥ १ ॥

साकी.

अत्रितनयही त्रिमुख त्रिगुणात्मक जो होउनि राहे ।
कारणकार्यें भिन्न कदाचित् सिद्धचि अणुं करिताहे ॥
मंगल त्या देवें । तुह्मां सकलांतें द्यावें ॥ १ ॥

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

(शूरसेन एकटाच प्रवेश करितो.)

शू०—(स्वतःशीं) हेंच तें स्थान. गगनचुंबित आम्रवृक्षांची हीच ती राई. अहोरात्र बाराही महिने एकसारखा खळखळणारा हाच तो ओढा. या ओढ्याजवळ व या झाडाखालीं माझी प्रियतमा व मी मिळून अनेक सुखाचे दिवस काढिले. या मद्भाग्याच्या नशीबीं आतां पुन्हा ते दिवस कमचे येणार आहेत. आह्मां उभयतांच्या प्रीतीचा साक्षी असल्यामुळें ज्यास आह्मीं स्मतीनें प्रेम-निर्झर असें नांव दिलें होतें तो ओढा त्या वेळप्रमाणेंच हल्लींही आनंदानें उड्या मारीत जात आहे. पण माझ्या पूर्वीच्या आणि हल्लींच्या स्थितींत पाहिलें तर जमीनअस्मानाचें अंतर. या सुखविरहित भूमीवर मी भ्रमिष्टासारखा फिरत असतां माझी प्रिया स्वर्गांतून मजकडे पहात असेल. प्रिये ! प्रिये ! या दीनाला या जगावर एकटें सोडून तुला स्वर्गलोकीं कसें जाववलें ग ! पण तुजकडे तरी काय दोष ! एखादी हरिणी वाघाच्या जबड्यांत सांपडावी त्याप्रमाणें तूं अनाथ होऊन मृत्यूच्या मुखांत पडलीस. मृत्यु हा स्वतः जर मृत्यूचा विषय असता तर मला किती आनंद झाला असता ! आतां जाऊन त्या

दुष्टाच्या नरडीचा घोंट घेऊन टाकला असता. पण हा राग व्यर्थ आहे. हे भगवंता,

मालकंस—दीपचंदी.

तुझी अन्यथा ती कराया कृति । अशा मान-
वांची मुळीं ना गति ॥ ध्रु० ॥ अनंता अहो-
रात्र तारातति । त्वदाज्ञेसि नम्रीं शिरीं मा-
निती ॥ १ ॥ दयाळा सुविश्वास तुझ्यावरी ।
सदा ठेवुनी साधु ते राहती ॥ २ ॥

देवा, माझा प्रिय बकुल तरी मला दुःखांत सुख देण्याकरितां ठेविला आहेस हे तुझे मजवर किति उपकार आहेत ह्मणून सांगूं? अहाहा! अपत्यसुख कांहीं विलक्षणच आहे.

जगला—धुमाळी.

मधुर वचें मम रिझवी हृदया बाल किती ॥ध्रु०॥
पूर्वी चुंबित सुदतीनें जे । मृदुल सुरक्त
गुलाबचि ताजे ॥ कपोल ते चुंबुनियां होई
सौख्य अति ॥१॥ संतत शोकें निर्जल झाले ।
नयन परी आनंदाश्रुजलें ॥ चंद्रमणीसम
मुख पाहुनियां तें स्रवती ॥ २ ॥

माझ्या बाळाचा तोंडवळा सुद्धां हुबेहुब माझ्या प्रियेसारखाच आहे. जणुं ती मरतांना माझें सांत्वन करण्याकरितां आपली प्रतिमाच ठेवून गेली. अरे पण मी विचारांच्या भरांत तिच्या पूर्वीच्या उठाठेवी सांगण्याचें राहिलें... पाशीं येऊन पोहोंचलों. तिचा वृद्ध पिताही तिच्या शोकानें परलोकवासी झाला. असो. या लढाईच्या निमित्तानें तरी मला या मनोहर

वस्तु पहावयास मिळाल्या. अहाहा! या गंभीर शब्द करणाऱ्या मेघामुळें व या फूत्कार टाकणाऱ्या वाऱ्यामुळें या जागेला उदासीनता येऊन ही फारच सुंदर दिसत आहे.

दिंडी.

शून्य सखिविरहित रम्य उटज भासे ।
शून्य आकाशहि मेघसन्निवासें ॥
धूलिपूरित शून्या रसाहि सारी ।
होत हृदया सुख खेदयुक्त भारी ॥ १ ॥

(पडद्यांत)

(धांवा धांवा, या भयंकर काळस्वरूपी वाघाच्या हातून मला वांचवा.)

अरे, कोणी तरी या अरण्यांत संकटांत पडलें आहेसें वाटतें. तर जोंपर्यंत त्या दीनाला वाघानें ठार केलं नाहीं तोंपर्यंत त्याला सोडवावें हें बरें. (जातो.)

(नंतर पुरुषाचा वेष घेतलेली शालिनी मूर्च्छित होऊन पडलेली आहे. तिला शूरसेन वारा घालीत आहे. जवळच वाघाचें प्रेत पडलें आहे.)

शू०—(मनांत) बरें झालें, वेळेवरच येऊन पोहोंचलों. वाघ या मुलावर झडप घालणार तोंच त्याचा तो अकाळविकाळ अवडा या तरवारीनें खालीं आणिला. पण मुलगा तर अजून बेशुद्धच होऊन पडला आहे. अहाहा! किती तरी मनोहर याचें रूप!

झिंजोटी—दादरा.

किति कोमल तनु तनुलतिका वाचि मोहिका।
दर्शन किति याचें हें देतसे सुखा ॥ ध्रु० ॥

वक्षःस्थलिं हे रुळती । केश वन स्वैरगति ॥
मन मोहे निष्कपटा पाहुनी मुखा ॥ १ ॥
कंप सुगात्रांसि सुटत । खिन्न मुख स्विन्न होत॥
स्थिति दीना झालि याचि भीतिमूलिका ॥२॥

हा कुमार बहुतकरून या अरण्यांत शिकारीस आला असावा; पण याच्याजवळ कोणी परिजन नाहीं हें कसें? असो. तें सर्व याच्याच मुखानें कळेल. पण हा अजून मुद्धां शुद्धीवर येत नाहीं. यास येथेंच टेंकून एखाद्या प्रवाहाचें पाणी आणण्याकरितां जावें तर तें मुद्धां नीट नाहीं. दुसरा एखादा वाघ येऊन त्यानें एका ग्रासांतच याला खाऊन टाकिलें तर माझे सर्व श्रम व्यर्थ होतील. पण आतां विशेष भीति बाळगण्याचें कारण नाहीं. कारण हा पहा चांगला पाऊस पडूं लागला.

शालिनी—(सावध होऊन) अहो, कोणी धांवा धांवा आणि मला वांचवा.

शू०—मुला, असा घाबरूं नको. डोळे उघडून चांगलें पाहिलेंस का मी कोण आहें तो? येथें वाघ नसून हा पहा तुझा मित्र मात्र बराला आहे, व वाघ तो तिकडे आपलें धिप्पाड शरीर पसरून पडला आहे.

शा०—(वाघाकडे व नंतर शूरसेनाकडे पाहून व उठून मनांत) अगबाई! काय तरी आश्चर्य! वाघाचें अक्राळविक्राळ स्वरूप दिसणार म्हणून भीतीनें जों वर पाहिलें तों ही मदनासारखी मूर्ति मजपुढें उभी.

यमन-त्रिवट.

कशि मदनमूर्ति ही पातली । मजजवळी अ-
वचित या स्थळीं ॥ ध्रु० ॥ मुख हें विलसे

शशिहुनि सुंदर । मंदहसितयुत प्रसन्न सुख-
कर ॥ निरखुनि ऐसे नयनीं नरवर । धन्य
असें मी भूतलीं ॥ १ ॥

शू०—(विस्मयानें) मुला, असा चकित कां झाला आहेस ? खालीं मान घालून उभें राहण्याचें कांहीं कारण नाहीं.

शा०—महाराज, दुसरें कांहीं नाहीं. अनोळखी मनुष्याकरितां आपण आपला जीव संकटांत घातला या आपल्या औदार्याबद्दल मी आश्चर्य करीत होतों. महाराज, आपले माझ्यावर किती उपकार झाले आहेत ह्मणून सांगूं ?

यमन - गजल.

जाहले आभार भारी आपुले । कालहस्तांतूनि
मातें रक्षिलें ॥ ध्रु० ॥ धन्य मातापितर साचे
धन्य जे । पुत्ररत्ना शूर ऐशा प्रसवले ॥ १ ॥
धन्य कांता भ्रांत कांतासी अशा । कोपवी आ-
लिंगनें जी कोमलें ॥ २ ॥

शू०—यांत मीं अधिक तें काय केलें ? आह्मां क्षत्रियांचें कर्तव्यकर्मच हें. अहाहा ! तुझ्या मातापितरांना आतां किती आनंद होईल !

देस झिंजोटी—त्रिवट.

तव मुख निरखुनि हरखति मनांत । कुशलि
बघुनि तुजप्रति नखशिखांत ॥ ध्रु० ॥ तनुसि
परिष्वंगुनि शिर हुंगुनि अंग अंग तें स्पर्शुनी ।

**दंग होती सुखजलनिधिमधिं पुलकित नि-
तांत ॥ १ ॥**

मुला तुझें नांव काय ?

शा०—मला शालीन ह्मणतात.

शू०—वा: ! हें नांव तुला फारच शोभतें. तुझ्या शालीनतेला अनुरूप असेंच तुझें नांव आहे.

शा०-महाराज, मीं आपणास कांहीं प्रश्न केला असतां आपण रागावणार नाहीं अशी आपली प्रसन्न मुद्राच सांगत आहे. तर—

शू०—काय ? रागावणार ? व तशांत तुझ्यासारख्या मुलावर ? छेः ही शंकाच नको. बोल बोल पाहूं तुला जें काय बोलावयाचें असेल तें.

शा०—आपल्यासारख्या उदार वीराचें नांव जाणण्याची उत्कंठा होणें अगदीं साहजिक आहे. तर कृपा करून—

शू०—(मध्येंच) कशाला या हतभाग्याचें नांव जाणण्याची इतकी उत्कंठा ? तरी पण ज्या अर्थी तू इतक्या मोकळ्या मनानें मला हा प्रश्न विचारला आहेस त्या अर्थी मलाही त्याचें उत्तर दिलें पाहिजे. या दुर्दैवी पुरुषास शूरसेन ह्मणतात.

शा०—हें नांव आपणांस किती तरी योग्य आहे ! पण महाराज, आपण एकदां माझ्या बोलण्याला मान दिला हें पाहून मला दुसरा एक प्रश्न विचारावासा वाटतो.

शू०—विचार विचार, तुझ्या सरळ प्रश्नाला उत्तर देणें आल्हाद-कारकच आहे.

शा०—मघाशीं मी आपल्या कांतेसंबंधानें बोललों असतां आपण एक दीर्घ सुस्कारा टाकिला त्याचें कारण काय ?

शू०—शालीना, काय सांगूं?

झिंजोटी-दीपचंदी.

सुखाशा कांहिं मातें नाहिं या लोकीं ॥ नि-
घोनी जाइना आत्माहि आलोकीं ॥ ध्रु० ॥
प्रिया कांताननां कांता त्यजूनी कीं ॥ मला
गेली जगत्कांतारिं एकाकी ॥ १ ॥

शा०—या गोष्टीची आठवण देऊन मीं आपल्या मनाला दुःख मात्र दिलें.

शू०—शालीना, हा विषय नेहमीं माझ्या डोळ्यांसमोर असतो. (डोळे पुसून) ज्या डोळ्यांना अश्रु गाळणें ह्मणजे भित्रेपणाचें लक्षण वाटत असे, त्याच डोळयांचा प्रियेच्या मरणानें अश्रुपात हा नित्यक्रमच होऊन गेला आहे. (मनांत) आतां आपण हा विषयच बद-लावा हें बरें. (उघड) शालीना, या पावसाच्या सरीनें पाहिलीस का तुझी काय स्थिति झाली आहे ती?

गौडमल्हार-त्रिवट.

वृष्टिमुळें तूं मम नयनांसी । भीतिव्याकुल
भजुनी दिससी ॥ ध्रु० ॥ स्वेदबिंदु ते नष्ट हो-
उनी । शोभविती जलकण वदनासी ॥ १ ॥
अतिशीतानें पीडित होउनि । रोमांचातें धा-
रण करिसी ॥ २ ॥ कपोलही आपांडु हो-
उनी । कंप सुटे सुंदर गात्रांसी ॥ ३ ॥

पण ही वृष्टि प्रत्येक क्षणाबरोबर वाढतच चालली आहे. हा पहा ढगांचा समुदाय.

मालश्री—सुरफाकता.

श्याम कवचा वरि घालुनियां गंभीर करित रव तुंबळ रणा करी ॥ ध्रु० ॥ चपलाखड्गीं भेदुनियां घनरिपु पाडी सलिलरुधिर महीवरी ॥ १ ॥

तर ही वृष्टि कमी होईपर्यंत याच झाडाखालीं बसूं. (पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

शुंभसेन. (प्रवेश करून)—आजचा मजवरचा कोण तो प्रसंग! बरें झालें, त्या शूरसेनानें त्या वाघाला ठार केलें ह्मणून. नाहीं तर माझ्या सर्व सुखावर पाणी पडलें असतें. जिवाचा धडा करून परत फिरून पहातों तों शालिनी सुरक्षित. शालिनीबरोबर मींही आग्रह करून त्या गृहस्थास या नगरांत आणिलें आहे. आतां त्यास एकदां दृष्टीआड केला ह्मणजे झालें आपलें काम. हें साधण्याकरितां मीं ही नवीन काढलेली शकल पाहूं कशी काय चालते ती. शालिनीस मींच वांचविलें असा कानमंत्र प्रकोप महाराजांच्या कानांत थावा भरवून ह्मणजे झालें. पण हे पहा प्रकोप महाराज बसले आहेत. (जवळ आऊन) महाराज, प्रणाम करितों.

प्र०—कोण? शुंभसेन? यावें, यावें. आतां मी तुमचीच मार्गप्रतीक्षा करीत बसलों होतों. आज इतका उशीर कां बरें झाला?

शुं०—तें कांहीं विचारूं नका महाराज. आज शालिनीचा पुनर्जन्म झाला.

प्र०—ह्मणजे? झालें तरी काय?

शुं०—आज मृगया करितां करितां मी व शालिनी दोघें एकटींच राहिलों असतां एका प्रचंड वाघाची गर्जना ऐकूं आली.

प्र०—मग पुढें ?

शुं०—पुढें काय विचारतां ? त्या आरोळीबरोबर शालिनी भूमीवर निपचित पडली. आतां तो वाघ उडी घालणार तोंच माझा बाण त्याच्या हृदयांत शिरून त्यानें तडफडत प्राण सोडला. एवढें धूड जमिनीवर पडतांच ती मुद्दां भयानें थर थर कांपूं लागली. त्या बिचाऱ्या प्राण्यानें प्राण सोडतांच मला अतिशय वाईट वाटलें. पण करतां काय ? तो माझ्या वाटेस गेला नसता तर मीं त्यास तसेंच जाऊं दिलें असतें. पण दयेला सुद्धां वेळ अवेळ हीं असतातच.

प्र०—तुमचे माझ्यावर किती उपकार झाले ! माझी आवडती शालिनी तुम्हीं मला आज परत दिली. हे उपकार फेडण्याची लवकरच वेळ येईल. माझ्या शूर मुलीला असाच शूर पति पाहिजे.

शुं०—त्या आशेवर तर मी प्राण धरून आहें. वीरांना शौर्याबद्दल मोबदला म्हटला म्हणजे स्त्रियांचें प्रेम. त्यांच्या प्रीतियुक्त भाषणानें आम्हांस जितका आनंद होतो तितका सर्व जगाच्या जयजयकारानेंही होणार नाहीं. व त्यांचें नुसतें विनययुक्त हास्य पाहून जितकी धन्यता वाटते तितकी आमच्या सन्मानार्थ नगर श्रृंगारलेलें पाहूनही वाटणार नाहीं. स्त्रियांचे नयनबाण हेच आमच्या बाणांनीं केलेल्या पराक्रमाचें बक्षीस.

मोड-धुमाळी.

किति वानुं बल युवतींचें ठरते रसना नीरस ते ॥ ध्रु० ॥ पैंजण मंजुळ सिंजित करितां कंकण किणकिण नाद । श्रवणांतें सुख होतें शतधा

तें मन धातें । वसुधासुधारस अनुभवि जो नर सेवी प्रेमास्वाद ॥ १ ॥

प्र०—खरें आहे, शुंभसेन. पण शालिनीही आपले उपकार विसरणार नाहीं.

शुं०—तितकें कुठचें माझें भाग्य! आमचें कपाळच तें. जन्मभर अनेक संकटें सोसून आम्हीं स्त्रियांचें रक्षण करावें. व शेवटीं याला बक्षीस काय ह्मणाल तर अवज्ञा. मिळून आह्मांस सुख कांहींचेंही नाहीं.

प्र०—अरेरे! शुंभसेन, असे निराशेचे उद्गार काढण्याचें कारण काय बरें?

शुं०—कारण काय विचारतां महाराज! मला त्या वाघानें ठार करून टाकिलें असतें तर बरें होतें असें वाटूं लागलें आहे. क्रूर दिसणारे प्राणी या मनुष्यप्राण्यांपेक्षां व तशांत स्त्रीजातीपेक्षां लाख पटीनें दयाळू. माझ्या असेंही पुष्कळदां मनांत येतें कीं, ज्या या तरवारीनें अनेक वीरांचें रक्त प्राशन केलें आहे ती तरवार या हृदयांत खुपसावी आणि तें प्रीतीनें किती पूर्ण आहे हें शालिनीला दाखवावें.

प्र०—शालिनीनें आपला कांहीं अवमान तर नाहींना केला? (शुंभसेन स्तब्ध राहतो.) होय, असेंच दिसतें. थांबा, त्या कारटीस आतांच कृतघ्नपणाचें बक्षीस देतों.

शुं०—नका नका, महाराज, त्या सुंदरीवर असे रागावूं नका. तिच्या मनाला यत्किंचित् जरी वाईट वाटलें तरी माझा प्राण निघून जाईल. महाराज, अनुरक्त पुरुषाचें मुख्य लक्षण हेंच आहे कीं, स्वतःला किती जरी दुःख झालें, अखेर मरण आलें तरी पत्करलें. फार काय, प्रियजनाची अवज्ञाही पुरवली. पण तिच्या मनाला कैसाइतका धक्का लागला ह्मणजे मात्र त्याचा जीव कासावीस होतो.

शुं०—महाराज, आतां मी आज्ञा घेतों. प्रथम त्या पुरुषाला कैदेंत ठेवून नंतर आपल्या सेवेला हजर होतों.

प्र०—ठीक आहे. (शुंभसेन जातो.) (स्वतःशीं) एका कन्येसाठीं किती संकटें भोगावीं लागतात ! याच गोष्टीमध्यें पहाना. नुसत्या एका विवाहासाठीं साक्षात् मृत्यूच्या केवळ जिभाच अशा हजारों तरवारी आतां आपापल्या म्यानांतून बाहेर उड्या घालतील; व भयंकर रण माजेल. एका शरीरसंबंधाच्या पायीं हजारों शरीरांचा प्रथम होम करावा लागेल. आजपर्यंत व्यवहारज्ञ लोक कन्येविषयीं जें म्हणत आले आहेत तें अगदीं खोटें नाहीं.

बरवा–धुमाळी.

ही दुहिता नोहे धरी स्वरूपीं अहिता । नि-
जतनूसि पोषी करी तयाच्या अहिता ॥ ही
सुता नसे परि हुताशनचि नरदेही । इजमुळें
जळे तनु चळे न जल नयनींही ॥ ही तनु-
जा नच साक्षात् असे ही दनुजा० । अवतरे
चिराया गळा छळाया मनुजा ॥ ही पुत्री नच
दुःखांचि सकल जनयित्री । मन करें पित्रें
हें करीत प्रेम अपात्रीं ॥ १ ॥

पण ही शालिनी आली. हिच्या तोंडाकडे पहातांच सर्व राग नाहींसा होतो. पण ही कांहीं विचारांत गर्क आहेसी दिसते. तर तिच्या एकांताचा भंग न करितां कांहीं वेळ वाट पहावी.

शालिनी—(प्रवेश करून) त्या वीराला पाहिल्यापासून माझें मन कसेंसेंच होऊन गेलें आहे.

खमाज—गजल.

पाहुनी मुखचंद्र तो हृदयाब्धि आजि उचंबळे । ओढतें मन त्याकडे निर्लज्ज कां नकळे बळें ॥ ध्रु०॥ स्वस्थता मनिची पहा । सोडोनि गेलि मला अहा ॥ या मन्मथें हृदयांतरीं निज सोडिले शर मोकळे ॥ १ ॥ निग्रहा करुनी जरी । स्वमनासि अंतरिं आवरीं ॥ परि आग्रही मन त्याकडे उडि घ्यावयासि पुन्हा वळे ॥ २ ॥

पण हे प्रेमाचे विचार मनांत आणून काय उपयोग ? त्या निर्बल, दुष्ट, भित्र्या शुभसेनाशीं माझा विवाह होणार. बाबा, तुमचें मन इतकें निर्दय कसें ?

काफी—धुमाळी.

जीवर मोठी तुमची प्रीति । तज्जन्माची करितां माती ॥ घेउनि जी खेळविली अंकीं । टाकित कां तिस दुःस्थिति-पंकीं ॥ प्रिय जी पूर्वी तुम्हांलागीं । अप्रिय झाली कां हतभागी ॥ जीव सदा तुमचा जीवरतीं । तज्जन्माची करितां माती ॥

(डोळे पुसते.)

प्र०—(प्रेमानें तिला जवळ घेऊन) बाळे, आज आनंदांत असावयाचें सोडून डोळ्यांतून हा अभद्र अश्रुपात कां बरें ? आज तूं दुष्ट बापाच्या हातून सुटलीस ना ?

शा०—(मनांत) पुन्हा दुसऱ्या वाघाच्या हातीं सांपडण्याकरितांच ना ?

प्र०—तुला शिकारीचा नाद फार ह्मणून लोकरीतीला एकीकडे ठेवून मीं तुला पुरुषांना मात्र योग्य अशा कला शिकविल्या. इतकें असूनही त्या वाघानें तुझी फजिती केली ह्मणून का इतकें वाईट वाटतें ? मग त्यांत रडण्याइतकें काय झालें ? (हंसून) पण या फजितीचा शेवट कशांत होणार आहे हें तुला कळलें ह्मणजे मात्र तुला गालांतल्या गालांत हंसूं येईल.

(शालिनी प्रकोपाच्या तोंडाकडे पहात रहाते.)

प्र०—अजून देखील कळलें नाहीं ? भोळी रे भोळी. अग आज तुला वाघाच्या हातून एका तरुण पुरुषानें सोडविलें ना ?

शा०—(लाजून खालीं पहाते.)

प्र०—अग यांत लाजायला काय झालें ? त्या शूर पुरुषाचा व तुझा विवाह करून टाकावा असें माझ्या मनांत आहे.

शा०—(आश्चर्यानें मनांत) हें काय ऐकतें मी ?

प्र०—मुली, अशी भांबावून जाऊं नको.

शा०—बाबा,

काफी–त्रिवट.

उपकृति किति असे ही मजवरती ॥ ध्रु० ॥
होउं उतराई कशी मी या ऋणामधुनी । थोर
हृदया युष्मदीया योग्य ही करणी । मच व-
दवत खुंटेच सकल मति ॥ १ ॥

प्र०—अग, यांत उपकार कसचे ? चांगला वर पाहून देणें हें बापाचें कर्तव्यच आहे. पण मला तुझी नम्रता पाहून फार आनंद

झाला. हें आनंदाचें वर्तमान आतांच्या आतांच शुंभसेनाला कळवा-यला सांगतों.

शा०—त्यांना कळविण्याजोगें यांत काय आहे ? व यांत त्यांचा संबंध तरी कोणता ?

प्र०—अग वेडे, विवाहांत वराचा जो संबंध असतो तोच येथें शुंभसेनाचा.

शा०—(मागें सरून) हें का आपल्या मनांत होतें ? शुंभसे-नाचा आणि माझा विवाह ?

प्र०—हो. ज्यांनीं तुला आज काळाच्या जबड्यांतून सोडविलें त्या शुंभसेनाचा आणि तुझा.

शा०—(धिक्कारानें) शुंभसेन मला वांचविणार ? वाघानें कि-काळी फोडतांच शुंभसेन गर्भगळित होऊन नाहींसे झाले. मला शूर-सेन नांवाच्या शूर पुरुषानें वांचविलें.

प्र०—मीं दिलेल्या स्वातंत्र्याचा उपयोग तूं एका अनोळखी आणि नीच पुरुषावर प्रीति करून करतेसना ? शाबास तुझी. कुळाला क-लंक लावण्याचे हे चाळे तुला बरे आठवूं लागले.

शा०—बाबा, मी पायां पडतें; पण त्या शूर पुरुषास नीच म्हणूं नका. ज्या उदार पुरुषानें मला सोडविलें त्याच्या उपकाराची फेड आपण अशा तऱ्हेनें करूं लागलों तर लोक काय बरें म्हणतील ?

प्र०—दुसरें काय म्हणणार ! अशा फाजील मनुष्याला देहांत शिक्षा न दिल्याबद्दल मला दोष मात्र लावितील.

शा०—बाबा, आपण एकदां त्यांना पहा कीं आपलें मन खास बदलेल. मीं त्यांना आग्रह करून मुद्दाम माझ्याबरोबर आणिलें आहे. त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांचें आगतस्वागत आपण करावें एवढें मी मागणें मागतें.

प्र०—तूं विनंति करण्यापूर्वीच मीं त्याचें स्वागत केलें आहे. त्याला शोभेल अशा बंदिखान्यांत हातापायांत बिड्या ठोकून त्याला ठेविलें आहे.

शा०—बाबा, आपलें नांव थोर आहे. त्याला असें करणें शोभणार नाहीं.

प्र०—तुला कळलें का तो कोण आहे तें? तुला घातलेल्या मागणीचा धिःकार केल्यामुळें रागाऊन वीरसेन राजा सैन्यासह या नगराबाहेरच छावणी देऊन राहिला आहे. त्याच्याच सैन्यांतील हा एक सरदार असेल. व मला तर असाही पक्का संशय आहे कीं ज्यानें आमच्या सैन्याचा अनेक वेळां पराजय केला तोच हा शूरसेन सध्यां सुदैवानें आमच्या हातीं लागला आहे. समजला का आतां तुझा प्रियकर कोण आहे तो?

शा०—बाबा, आपल्या मुलीवर इतका राग करूं नका.

सोरट—दादरा.

सदय हृदय अदय करुनि विसरूं नका माया।
प्र०—स्वकुल विमल समल करांनि विसरूं
नको विनया॥ ध्रु०॥
शा०—कोप करुनि शांत मना मळवुं नका
वाया।
प्र०—रिपुसि वपुसि दान करुनि मळवुं नको
काया॥ १॥
शा०—रिपुवरि उपकार तुम्हां उचित होय
राया।

प्र०—उचित उचित जनक-वचन मान्य तुज कराया ॥ २ ॥

थांब, उद्यां त्या पुरुषाला देहांतशिक्षाच देतो

शा०—(रडत) नका नका, बाबा आपल्या नांवावर विश्वास ठेवून आलेल्या मनुष्याचा असा घात करूं नका

प्र०—कारटे, तो शत्रुपक्षाचा असून सुद्धां तुला प्रिय झाला ना? आणि मी प्रत्यक्ष तुझा पिता असूनही तुझा वैरी झालों? ठीक आहे तुझ्या ह्मणण्याप्रमाणें करितों त्यास बंदींतून सोडून देतों. ह्मणजे तो आपल्या सैन्यासह चालून येऊन हें नगर हस्तगत करील मग तूं त्याची पट्टराणी होशील नंतर आमची गरज काय? तुझ्या काळजीनें कृश झालेलें हें मस्तक आपल्या हातानें उडवून टाक ह्म-णजे झालें

शा०—बाबा, क्षमा करा. मला हें ऐकवत नाहीं इतकें लागून बोलायला मीं काय अपराध केला?

प्र०—जरठ झालेल्या पित्याचें बोलणें कशाला ऐकवेल? त्या तरुण पुरुषाचें भाषण ऐकून मात्र कान पवित्र झाले असतील नाहीं?

शा०—बाबा, मी ह्मणतें, माझ्या हातून अपराध झाला असला तरी तो एकवेळ पदरात घाला मला आतां आपणांशिवाय कोण उ-रलें आहे? माझी आई मला केव्हांच सोडून गेली

परज—काल्गडा—दीपचंदी

कन्यकांसी अह्मां सोडुनीयां । गेलि माता स्व-
जुनी जगा या ॥ अंतकालीं स्वयें वेडनीयां ।
देइ आह्मां करीं याचि राया ॥ या पदांबांबु-

नी याअजाथां । राहिला नाहिं कोणीहि त्राता ॥
राग सोडा दयौदार्यवंता । फार आतां नका
पाहुं अंता ॥

(प्रकोपाच्या पायां पडते.)

प्र०—ती बिचारी या जगाच्या यातनांतून सुटली. मी मात्र हे सोहळे पाहण्याकरितां जिवंत राहिलों आहें. असो, नशिबीं असेल तें भोगलें पाहिजे. (निघून जातो.)

शा०—(उठून मनांत) अगबाई ! बाबा शेवटीं माझ्यावर रागावून निघून गेले ? कीं हें सर्व मला स्वप्नांत दिसलें ! छेः ! इतकें माझें भाग्य कुठचें ! तें सर्व खरें आहे. मला अगदीं सुचेनासें झालें आहे आतां शूरसेनाचे प्राण कसे वांचवावे ? आज यापेक्षां बाबांनीं मला ठार करून टाकलें असतें तर किती चांगलें झालें असतें ? पण तसें कुठून होणार ? असो, बाबांनीं कांहीं म्हटलें तरी त्यांची सुटका के-ल्याशिवाय मला गत नाहीं. काय बरें करावें ? (विचार करून) ह ठरलें तर, असेंच करावयाचें. त्यांच्या जागीं स्वतः कारागृहांत रा-हून त्यांची मुक्तता करावयाची. (विचार करिते. इतक्यांत शुंभसेन प्रवेश करितो.)

शुं०—(मनांत) मध्येंच ही लढाईची दगदग कशाला उभी रा-हिली ? मला नाहींत युद्धशास्त्राच्या बाराखड्याही माहीत. आतां प्र-कोपमहाराजांकडे खेपा घालतां घालतां नाकीं नव येणार.

शा०—(मनांत) ही पीडा येथें कशाला आली कोण जाणे !

शुं०—(मनांत) येथें प्रकोपमहाराज नाहींत असें वाटतें. (चपापून अरे ! ही सुंदरी एकटीच बसली आहे. आतां जाईनाका ती लढा ख्यांत. (उघड) कसें काय ? कसला विचार चालला आहे ? कां तरी लढाईचा बेत चालला आहे असें वाटतें.

Prac. No. 9187 Dt 22.11.63 OE-1.0

National Library

शा०—होय, तुमच्यासारख्या पुरुषांनीं जर बांगड्या भरल्या तर आतां बायकांनाच रणांत गेलें पाहिजे.

शुं०—बरें बोवा, आम्हीं बांगड्या भरल्या. पण तसें असून आज वाघाच्या तडाक्यांतून तुला मींच सोडविलें ना? कसा क्षणांत त्याचा जीव घेतला?

शा०—त्याचा जीव नाहीं घेतला, पण आपला जीव घेऊन मात्र पळत सुटलां खरें.

शुं०—काय? एका तडाख्यासरसें त्या वाघाचें मस्तक मीं फोडिलें असें असतां तू नाहीं म्हणतेस?

शा०—अस्सें अस्सें, हें कुणाला सांगतां? भ्रमाचा भोपळा फोडिलात तें मी नाहीं म्हणत नाहीं.

शुं०—(मनांत) हिनें मला पळतांना पाहिलें वाटतें. (उघड) सुंदरि, अशी भलत्याच वेळीं थट्टा कां बरें? थकलेल्या भागलेल्या वीरांना स्त्रियांच्या गोड शब्दांचीच अपेक्षा असते.

शा०—खरेंच. मी अगदीं विसरलें. भीतीमुळें पळतां पळतां आपणांस बरेच श्रम झाले असतील नाहीं?

शुं०—(मनांत) ही तर आपली डाळ बिलकुल शिजूं देत नाहीं. (तिजजवळ जाऊन उघड) सुंदरि, तूं मजवर रागावली आहेस वाटतें. हे पहा मी तुझे पाय धरितों. पण राग सोडून या दासावर अनुराग मात्र कर.

पिलु–धुमाळी.

कर टाकिं सखे गे या कंठीं। फिरविं न हनु-
वटि। शिणविं न तनु कटि। येडनि सुनिकटि।
विभ्रम भुजतटिं॥ दुःखांत काळ मी कंठीं॥
गे या कंठीं॥ १॥

राग व ताल सदर.

शा०—ह्हा दूर चला अपुल्या वाटे ।
शुं०—तुजवीण कुठें । वद जाउं खुटे । गति
हृदय फुटे । मम धीर सुटे ॥
शा०—कशि लाज तुह्मां नच वाटे । अपुल्या
वाटे ॥ १ ॥

शुं०—स्त्रिया ह्मटल्या ह्मणजे मोठ्या हट्टी बोवा हे समजलो मजकडून आणखीही मनधरणी करून घेण्याची तुझी इच्छा दिसते या दासाला तुझी आज्ञा होण्याचाच उशीर कीं मीं ती बजावलीच समज

शा०—हें खास ना ? मग इथून एकदाचे निघून जा कसे

शुं०—छे छे, हे शब्द मात्र उच्चारू नकोस माझे पाणिग्रहण तू केलें नाहींस तर माझा प्राण तरी राहील का ?

शा०—खरेंच, वाघ समोर आल्याबरोबर ज्या हातानें भीतीनें तरवार फेकून दिली त्या हाताशिवाय मीं दुसऱ्या कोणत्या हाताचा स्वीकार करावा ?

शुं०—शालिनि, असें बोलू नकोस माझा प्राण तुझ्या हातीं आहे. माझ्या या शरीराची तूच मालकीण आहेस.

शा०—हा काय तरी बाई चमत्कार ! मी जर तुमच्या शरीराची मालकीण आहें तर तें शरीर बाहेर घालविण्याकरितां मी इतका प्रयत्न करितें पण तें इथेंच लोचटपणानें उभें आहे हें कसें ?

शुं०—समजलों तुझा मतलब तूं प्रीतिकलह चालविला आहेस.

शा०—आतां बाई या लोचटपणाला काय करावें ? शुभसेन, मी तुह्मांला निक्षून सांगतें, माझी कांहीं तुमच्यावर प्रीति नाहीं.

शुं०—प्रीतीचा रंग तांबडा आहे असें ह्मणतात; त्या कसोटीला लावून पाहिलें असतां तू मजवर अनुरक्त आहेस यांत बिलकुल संशय नाहीं. कारण तुझा चेहरा पहा कसा तांबडा लाल झाला आहे तो. त्यावरून तू मजवर अनुरक्त होऊन लाजली आहेस असें दिसतें.

शा०—(मनांत) काय करूं ? लाजेशिवाय दुसऱ्याही तऱ्हेनें तोंड लाल करितां येतें हें दाखविण्याकरितां माझे हात कसे वळवळत आहेत.

शुं०—कां ? उगीच कां राहिलीस ? माझी विनति तुला मान्य झाली असें दिसतें. बोल बोल लवकर. आतां या अधीर मनाला संशयांत कां टेवितेस ? हें माझें हृदय पहा कसें प्रीतीनें वाहून चाललें आहे.

शा०—ह्मणूनच त्यांत लाजेला जागा राहिली नाहीं वाटतें. मूर्खा, आपल्या हातानें आपल्या पायावर धोंडा पाडून घेत आहेस.

झिंझोटी–दीपचंदी.

मूढमते तूं पापराशि । मूढमते नच लाज तुतें
किति ताप देशी ॥ ध्रु० ॥ कां अबलेचे शाप
घेसी । कां तुं निरर्थक होसि विघातक आप-
णासी ॥ १ ॥ सोडुनि त्या करुणापरासी ।
सेवुं कशी गतबुद्धि जशी तुज खापरासी ॥ २ ॥

(जंबिया उगारते, शुमसेन घाबरतो. पडदा पडतो.)

प्रवेश ३ रा.

(फत्तेसिंग पहारा करीत आहे.)

फ०—छेः बोवा, या धनाच्या तृष्णेनें तर आपणास वेडावून सोडिलें आहे.

खमाज—दादरा.

निशिदिनिं लागे मना आस । बघुनि धन विषारि मम मनिं येइ कधि न विसारि ॥ ॥ ध्रु० ॥ जननिहि धन जनकहि धन गुरु गमत मनास। लागतो कसा अशानीं पानिं निदिध्यास ॥ १ ॥ ठाउक जरि मजसि असे हा अति हव्यास। लाविलची फांस गळां बुडविल मज आस ॥ २ ॥

या तृष्णेनें इतर गोष्टींत सुद्धां माझी अभिरुचि कशी बदलून गेली आहे. रंगांत सोन्याचा रंग मात्र आवडतो, आणि सर्व संगीतांत पैशाचा छन् छन् आवाज मात्र पसंत पडतो. छेः पण आपलें मन असें हलकें होऊं देतां उपयोगी नाहीं. यापुढें आपण तर दृढनिश्चयानें वागणार. पैशाकरितां म्हणून कधींही कुकर्म करावयाचें नाहीं. हा निश्चय चांगला पाळण्याकरितां ही पहा मी पैशाचीच शपथ घेतों.

(पुरुषवेषानें शालिनी प्रवेश करिते.)

शा०—(मनांत) मी या फत्तेसिंगाची बरेच दिवस लोभीपणाबद्दल कीर्ति ऐकत होतें. आज पाहूं ती कितपत खरी ठरते ती. (उघड) कां हो, येथें कोणी हतभागी पुरुष बंदींत पडलेला तुम्हांस माहीत आहे का ?

फ०—(मनांत) मी स्वतःच तर धनलोभाच्या बंदींत पडलों आहें. छेः पण पैशाची आठवण होऊं देतां उपयोगी नाहीं. (उघड) होय, आहे खरा. त्याचें नांव काय ?

शा०—शूरसेन.

फ०—(मनांत) हेंच नांव मला कुंभसेनानीं सांगितलेलें आठवतें खरें. (उघड) बरें मग त्याच्याशीं तुझें काय काम आहे ?

शा०—मला त्याला भेटावयाचें आहे.

फ०—त्याच्याकडे जाण्याची कोणासही परवानगी नाहीं.

शा०—छे: छे: असें ह्मणून माझी निराशा करूं नका. या तुमच्या उपकाराबद्दल मी तुह्मांस जन्मभर धर्नात लोळवीन.

फ०—(दचकून मनांत) पुन्हा धनाची गोष्ट! (उघड) तरुण पुरुषा, जर तुला पैशाचें नांव काढावयाचें असेल तर येथून निघून जा कसा.

शा०—(मनांत) तर मग याच्या लोभीपणाविषयीं माझी कल्पना चुकली वाटते. (उघड) काय हा आपला निर्भीडपणा ? पण शिपाई-बुवा, मी तुमच्या पायां पडतों. पैशाकरितां जरी नाहीं तरी केवळ परोपकार ह्मणून तरी मला आंत सोडा. पहा, तो माझा वडील भाऊ आहे. त्याच्या मरणाच्या वेळीं तरी त्याची गांठ मला घेऊं द्या. बंधुप्रेम तुह्मांला माहीत असेलच, नसलें तरी आईबाप, मुलेंबाळें यांचें प्रेम तुह्मीं खास अनुभविलेलें आहे. त्यांची आठवण करून तरी मला आंत सोडा. नाहीं ह्मणूं नका. परमेश्वराकडे हें तुमचें सत्कृत्य खास रुजू होईल.

फ०—मी माझ्या नातलगांना फार काय ईश्वरास सुद्धां जुमानीत नाहीं. एका स्वामिभक्तीशिवाय मला दुसरें कांहीं दिसत नाहीं.

शा०—(मनांत) स्वामिभक्तीबद्दल द्रव्यभक्ति ह्मटलें तर जास्त शोभेल. लबाडाचे डोळे मघांपासून कसे माझ्या हातांतील पिशवी-कडे लागले आहेत; जणुं काय तिच्यामधील ऐवज तो आपल्या नेत्ररज्जूंनीं ओढूनच घेत आहे. (उघड) बरें तर मग, मी आपल्या ह्मणण्याप्रमाणें येथून निघून जातों व एखाद्या विहिरींत जीव देऊन आत्महत्या करून घेतों.

फ०—(पिशवीकडे पहात मनांत) याच्या ह्मणण्याला मान दिलाच पाहिजे. नाहीं तर फट् ह्मणतां ब्रह्महत्या, अशांतला प्रकार व्हावयाचा. आणि त्याच्या मरणाचें पाप माझ्या माथीं येऊन आदळावयाचें. (उघड) मुला, असा त्रागा करून काय उपयोग ? चल ये असा इकडे पाहूं; ठेव खालीं ती थैली. येवढें ओझें घेऊन कसा दमून गेला आहेस (पिशवी घेऊन मनांत) मोहोरांनीं कशी ओतप्रोत भरली आहे (उघड) मी सहसा परक्याच्या पैशाला कधीं शिवत देखील नाहीं पण ह्मटलें आपल्या नकारामुळें जर लोक आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात, तर एखादे वेळीं नकाराबद्दल रुकार दिला तर काय वाईट ? भिडस्तपणा हा माझा मोठा दुर्गुण; जेथें तेथें तो नडतो. पण मी ह्मणतों जाऊद्या कीं, हें आहे कलियुग. सत्ययुगाप्रमाणें चालूं लागल्यास जग तरी कसें चालावें ?

शा०—(मनांत) अहाहा ! किती पण मेल्याला जगाविषयीं काळजी ! (उघड) आणखी हा कंठाही आपण घेतला पाहिजे

फ०—(हात पुढें करून) वा: हे काय ? माझा भिडस्त स्वभाव पाहून तूं अधिक अधिकच देऊं लागलास. मी बोललों नाहीं तर मला वाटतें तूं मला आणखी देखील अलंकार देऊं करशील. पण–पण– (हातीं घेतो.)

शा०—(मनांत) काय लबाड आहे आगांतुकाप्रमाणें जास्ती मागणें चालविलें आहे (उघड) माझ्या आठवणीची खूण ह्मणून तर घ्यालना ?

फ०—हं; खूण ह्मणून देशील तर गोष्ट निराळी. एक सोडून दोन खुणा घेण्याला माझी हरकत नाहीं. हें कदाचित् तुला खरें वाटणार नाहीं. ह्मणून मीच तुला एक विनंति करितों कीं, या कंठ्याच्या जो-

डीला तुझ्या गळ्यांतील तो टसठशीत हार मला दिलास तर मला तुझी अधिक आठवण राहील.

शा०—(मनांत) म्हणतात किनई भटाला दिली ओसरी आणि भट हात पाय पसरी. (उघड हंसून) हं, ही घ्या माझी दुसरी खूण (हार देते).

फ०—(पिशवीकडे पहात) बरें, तूं मला मघाशीं काय सांगित-लेंस कीं हा कैदी तुझा भाऊ आहे. अरेरे ! बिचाऱ्यावर काय साडे-साती आली आहे पहा. (डोळे चोळूं लागतो).

शा०—(मनांत) मला वाटलें होतें तितकें याचें मन कांहीं क-ठोर नाहीं. हा पहा डोळे पुशीत आहे. पण छेः, मी अगदीं चुकलें. मोहरा निरखून पहाण्याकरितांच हा डोळे चोळीत होता. अरे लबाडा ! (उघड) बरें मग जमादारसाहेब, कसें काय ? मला आंत सोडाव-याचें कीं नाहीं ?

फ०—हो हो, हें काय विचारतोस मिश्रा ? तुझा तो हृदयद्रावक वृत्तांत ऐकून माझें मन वितळून गेलें. जरी माझ्यासारख्या नोकराला नेहमीं आपलें कर्तव्य केलें पाहिजे तरी पण कधीं कधीं दयेला सुद्धां पोटांत थारा द्यावा लागतो. (थैली खिशांत घालतो.) पाषाणाखालीं सुद्धां सोन्याच्या खाणी आढळून येतात. जा बाबा, आपल्या भावाला लवकर भेटून ये. (जातात).

(नंतर शूरसेन एकटा बसला आहे.)

शू०—

जोगी–धुमाळी.

या हालअपेष्टांतें । मम सांगूं कवणातें ॥धु०॥
तनय असे दूर दादुनि ये ऊर लागे मनिं हु-
रहूर । वाहे अश्रूंचा हा पूर असुनी शूर झालों

धूर ॥ १ ॥ हे परमेशा दीनदयाळा मी तव दीन किशोर । कां अणिलेसी संकट घोर मन कां थोर करिसि कठोर ॥ २ ॥

पण मी कशाला देवास दोष लावूं ? हा सगळा परिणाम माझ्याच निष्काळजीपणाचा आहे. त्या मुलाच्या मानभावी बोलण्यास व वरपंगी आग्रहास भुलून मी आलों नसतों तर हें सर्व चुकलें असतें. पण त्या वेळीं त्याच्या बोलण्याला मान दिला नाहीं तर विनाकारण संशय उत्पन्न होईल आणि मी कोण आहें हें त्याला माहीत नसल्यामुळें माझी सुटकाही तेव्हांच होईल असें मनांत आलें; पण तें सर्व व्यर्थ. मी दिवाणखान्यांत वाट पहात बसतों न बसतों तोंच राजाचे सेवक मला कारागृहांत घेऊन जाण्याकरितां आले. असो, दैवीं असेल तें भोगिलें पाहिजे. पण अपमानाशिवाय यांत दुःख मानावयास कांहींच कारण नाहीं. जर मी जिवंत राहिलों तर माझी आशा सफळ होईल का ?

पूर्वी—त्रिवट.

पुनरपि नयनां ती तनुलतिका । गोचर होइल का मंजुवचें रंजवील मन का ॥ ध्रु० ॥ तच्चिंतनिं जें नयनांतरिं या अंबु निघे तें चुंबुनियां का देइल सुदति सुखा ॥ १ ॥

छेः, या आशेचें नांवही नको. (दचकून) अरे, पण असा या एकांत स्थळीं शब्द कसला झाला असावा बरें ? (शालिनीकडे पाहून) हर हर ! दुःखाचा कडेलोट करावयास येवढीच गोष्ट काय ती कमी होती,

मांड—दीपचंदी.

दुर्दैवा कैसें क्रूर असें झालेंसी । कांरे अवचित मरण न धाडीसी ॥ ध्रु० ॥ देउनि दुःखा पाठविसी कां मागुनि तूं अपमानासी ॥ १ ॥ व्रण उत्पादुनि सैंधवरोपण करिशी तूं कृति कां तैशी ॥ २ ॥

(शालिनीकडे धिःकारानें पाहून) या महाराज, व्याघ्राच्या हातून सोडविण्याबद्दल मला बक्षीस योग्य देवविलैत. (थांबून) हा पाहिलास का हात ? याच हातानें त्या व्याघ्राला यमसदनाला पाठविलें. आणि या पायानें त्याला लाथ मारून खालीं पाडिलें. त्याबद्दल त्यांना बक्षीस काय तर शृंखला. हें सर्व नगर परस्पर—विरुद्ध अशा गोष्टींनीं कसें भरून गेलें आहे. यांतील मुलें मदनासारखीं सुंदर असून कृतीनें राक्षसांसारखीं आहेत. नको नको. तो सौम्य चेहरा पुन्हा मला दाखवूं नकोस. तो पाहून पुन्हा मी जादूनें भारला जाईन. आणि आधींच पसरलेल्या दुसऱ्या कपटजालांत सांपडेन. त्याचप्रमाणें कान बधिर झाले तरी पत्करलें; पण तुझें विश्वासघातकी बोलणें पुन्हा ऐकणें नको.

शा०—बोला बोला महाराज, या सर्व वर्षावास मी पात्रच आहें. कारण माझ्या दुर्दैवानें आपल्यावर—

शू०— दुर्दैवानें ! दुर्दैव खरेंच. प्रथम विश्वास दाखवून, नंतर राजाला सर्व हकीकत कळवून, त्याच्याकडून आपल्या मित्राला कारागृह दाखविणें ही दुर्दैवाची सीमा खरीच. या भूतळावर अशीं दुर्दैवी माणसें फार नाहींत ही ईश्वराची कृपाच समजली पाहिजे.

शा०—तर मग मींच आपणावर हा गहजब आणिला असें आ-पल्याला वाटतें ? आपण माझे प्राणदाते; असें असूनही मी—

शू०—असें असतांना विश्वासघात करण्यांत तर मौज आहे. याला ह्मणतात राक्षसी कृति. याबद्दल राजानें तुला चांगलें बक्षीस दिलें असेल नाहीं ?

शा०—महाराज, मी शपथपूर्वक सांगतों कीं—

शू०—पुरे पुरे, एकही शब्द काढूं नकोस.

पिलू-बरवा-दादरा.

फिरविं वदन वचन वद न पळहि मजसमोर।
शा०—पोर मी अजाण जाण नरवर मजवर
करीं न कठिण हृदय थोर ॥ ध्रु० ॥
शू०—प्रथम करुनि अघटित कट । येउं प-
हासि मजसि निकट। विदित मजसि अससिच
शठ । विफल तुझें समज कपट । कठिण-हृ-
दय असलि निपट। बहु खटपट करुनि विकट
कृति करिसि अघोर ॥ १ ॥

शा०—देवा, या माझ्या बेताला किती तरी अडथळे आणणार आहेस ? महाराज, कृपा करा, माझें ऐकून तरी घ्या.

पिलू-दादरा.

वचन वदूं कठिण नका। विनति मम ही एका ॥
लागतों पायां ही ऐका। जाहलां क्रूर कां ॥ध्रु०॥
तनय आपुला असा। शालीन दीन मी तसा।
करुं नका पारखा ॥ १ ॥

शू०—(मनांत) याचें बोलणें खरें असेल का? याची मुद्रा कशी निष्कपट दिसते.

शा०—महाराज, अजून आपणांस माझ्याविषयीं संशय आहे तर! (तरवार काढून) मग पहा माझें हृदय किती निर्मळ आहे तें (भोसकूं लागते.)

शू०—(तरवार धरून) हां हां,

विहाग-त्रिवट

आवरिं आवरिंरे असिसी या। आत्मवधा कां
करिसी वायां ॥ ध्रु० ॥ त्यजिशि काय तूं
अशा अभाग्यासाठीं पेशी कोमल काया ॥१॥

शा०—अशा रीतीनें जगण्यांत काय अर्थ?

शू०—छे छे: असें म्हणू नकोस

असुखि बांधवा निज पाडाया जीवासी कां
करिसि अपाया ॥ २ ॥

शा०—पण आता आपल्या मनांत मजविषयीं थोडासुद्धां संशय उरला नाहींना?

शू०—छे संशयाचें नांवही नको. प्रथम तरी तुझ्यासारख्या अकृत्रिम मित्रासंबधीं मला संदेह उत्पन्न झाला, याची मला फार लाज वाटूं लागली आहे.

शा०—आपल्याला संशय यायला जागा होती खरी. आपल्या जागीं मी जर असतों तर मलाही आपल्यासारखेंच वाटतें. पण आमच्या प्रकोपमहाराजांच्या कानीं अशी कुणकुण आली कीं,—

शू०—नको त्या विश्वासघातकी राजाचें नांव काढूं. पाहुण्याचें आदरातिथ्य कसें करावें हें त्याला पूर्णपणें अवगत आहे.

शा०—त्यांना असें कळलें कीं,—

शू०—त्यांची माहिती अगदीं बरोबर होती. शालीना, तुझ्या या मित्राचें नांवगांव तुला कळलें ह्मणजे तूं सुद्धां मजवर इतकें प्रेम करणार नाहींस. हल्लीं ज्या वीरसेन राजानें तुमच्या नगरास वेढा दिला आहे त्याचाच सेनापति मी दुर्दैवानें तुमच्या हातीं सांपडलों आहें.

शा०—हें मला आधींच कळलें आहे. आपण सेनापति आहांत हें ऐकतांच मला आपणांस या नगरांत आणल्याबद्दल फारच पश्चात्ताप झाला. आपली येथून मुक्तता करण्याकरितां मीं आपल्या अल्प मतीनें एक उपाय काढला आहे. आपण ऐकाल का?

शू०—तो कोणता? सांग पाहूं. अहाहा, शेवटीं तूं माझ्यासाठीं इतक्या संकटांत आपला जीव घातलास! शालीना, मी वारंवार तुझा संशय घेतल्याबद्दल तुझी क्षमा मागतों.

शा०—किती तरी आपला उदार स्वभाव हा! महाराज, मीं जो उपाय योजिला आहे त्याला आपली पूर्ण अनुमति पाहिजे.

शू०—माझ्या मुक्ततेबद्दल माझी अनुमति? हें सर्व कांहीं गूढ दिसतें.

शा०—आपल्याला मी उगीच संशयांत ठेवीत नाहीं. महाराज, माझी विनंति इतकीच कीं, मीं आपल्याकरितां माझ्यासारखा पोषाख आणिला आहे, तो अंगावर घालून आपण बाहेर पडावें. जपून गेलें ह्मणजे पहारेकऱ्याला संशय येणार नाहीं.

शू०—आणि तुझी वाट?

शा०—मी आपल्या जागीं बसतों.

शू०—वा: शालीना, उपाय पण उपाय शोधून काढिला आहेस खरा. ह्मणजे माझी सुटका व्हावी आणि तुझ्या गळ्याला फांस लागावा. खासी तोड.

शा०—माझ्या केंसालाही धक्का लागणार नाहीं.

शू०—म्हणजे ? तूं तर अधिक अधिक मला बुचकळ्यांत पाडूं लागलाग

शा०—राजकन्या शालिनी इचा मी मर्जीतला सेवक आहें

शू०—या राज्यांत मर्जीवर अवलंबून राहण्यांत अर्थ नाहीं. येथील दुष्ट, दगलबाज राजाला तुझी किंचित तरी कींव येईल असें तुला वाटतें काय ? वाटत असेल तर तीं समजूत आपल्या डोक्यांतून काढून टाक. फार तर काय ! आपल्या मुलीलाही शासन केल्यावांचून तो रहाणार नाहीं.

शा०—(मनांत) मी शालिनी आहें असें या वेळीं यांना सांगण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. (उघड) मी मोठ्या आशेनें आपणापाशीं आलों, त्या आशेचा शेवट असा व्हावा ना ! महाराज,

झिंझोटी—त्रिवट.

नकाहो नकाहो करुं या निराश । पुरवा या मनोरथास । करितसां स्वकरिं निज तनुचा विनाश ॥ ध्रु० ॥ वास घोर कारा-सदनीं । यासि हेतु माझी करणी ॥ हा विचार मम मना छळुनि दिनरजनी । शिणवित मज हा बंदिवास मम कंठि पाश ॥ १ ॥

शू०—शालीना, तूं नाहींसा झाल्यावर तुझ्या आईबापांना किती वरें दुःख होईल !

शा०—(मनांत) काय करावें ! माझे आईबाप आहेत असा यांचा ग्रह मीं दृढ केला ही केवढी चूक झाली ?

शू०—तूं असून जगाचा अनुभव घेतला नाहींस. संसाराचें सुख

अजून तुला लिहावयाचें आहे. मला आज मरण आलें काय, किंवा उद्यां आलें काय एकच. म्हणून सांगतों, हा अविचार सोडून दे. मला जर मरण आलेंच तर माझी आठवण सदोदित राहू दे.

शा०—नका नका. असें बोलूं नका. तुम्ही खास या संकटांतून वांचणार अशी माझी मनोदेवता मला सांगते. (मनांत) आतां वीरसेन राजास पत्र लिहिण्याचीच बाकी उरली आहे. येथून गेल्यावर तसेंच करितें तर. (उघड) महाराज, आपणांस मी पुन्हा एकदां विचारितें. माझी विनंति आपण नाहींना मान्य करीत ?

शू०—शालीना, याबद्दल आतां मला आग्रह करूं नकोस. येथें राहून मी मरणाची वाट पहात बसणार. हा निश्चय कालत्रयींही टळणार नाहीं. असो, जर आपली ही शेवटचीच भेट असेल तर मला तुला कांहीं मागावयाचें आहे.

जोगी-गजल.

अजि धन्य मी खरा जगीं या त्वत्समागमीं ॥
उतराइ कैसा होउं या जन्मीं ऋणीच मी ॥ध्रु०॥
झालों परासु मी तरी तूं तात होउनी ॥ रक्षीं
अनाथा मत्सुता वाहूं न दे कमी ॥ १ ॥
शा०—दीर्घायु देवो देव तुम्हां शतसमावधि ॥
ठेवो सुखोदधीमधीं सपुत्र नेहमीं ॥ २ ॥
शू०—जरि वांचलों असों सदा त्वदीय संगमीं ॥
शा०—मी ही वसों सहचारिसि. या तुमच्या
सुखोपमीं ॥ ३ ॥

(पडदा पडतो.)

प्रवेश ४ था.

(वीरसेन व बकुल प्रवेश करितात.)

वी०—(स्वतःशीं) काय करावें ? शूरसेनाचा अजून पत्ता नाहीं. कालच रात्रीं शत्रूच्या नगरावर हल्ला व्हावयाचा. पण मुख्य सेनापतिच नसल्यामुळें हल्ल्याचें काम लांबणीवर टाकावें लागलें. हल्ला लांबला म्हणून मला विजयप्राप्तीबद्दल शंका आहे असें मुळींच नाहीं. शूरसेन जर लवकरच परत आला तर त्या सिंहापुढें शत्रूच्या कडेकोट तयारीचेंही कांहीं चालणार नाहीं. जर का तो शत्रूच्या जाळ्यांत सांपडला असेल तर त्या दुःखापुढें अपजयाचें आणि अपमानाचें दुःख कांहींच नाहीं; म्हणून माझें मन आतां जयप्राप्तीकडे नसून माझ्या मित्राकडे मात्र लागलें आहे. त्याच्या गतपत्नीच्या पित्याचें घर याच अरण्यांत होतें, तेव्हां त्याच ठिकाणीं तो कोणासही न विचारितां व एकांताचा भंग होईल म्हणून कोणासही बरोबर न घेतां गेला असावा ही शंका येऊन मीं तें सर्व अरण्य सैनिकांकडून शोधून पाहिलें; पण अजून थांग नाहीं. लहानपणापासून एके ठिकाणीं वागत आल्यामुळें मला आज मुळींच चैन पडत नाहीं. देवा ! माझ्या मित्राच्या जीवास अपाय न होवो. (थांबून) पण मला ही भीति कशाला ? फार झालें तर तो शत्रूच्या हातांत सांपडला असेल. पण ते शत्रु कोण ? प्रकोप महाराजच ना ? ते आज शत्रु असले तरी आमचा पिढ्यानुपिढ्या चालत आलेला घरोबा विसरतील ?

ब०—महाराज, आज असे उदास कां बरें ? बाबा अजून परत आले नाहींत म्हणून का ? (वीरसेन स्तब्ध राहतो.) मला तर त्याबद्दल यत्किंचितही भीति वाटत नाहीं. कारण,

दिंडी.

कुठें पंचानन शूर उग्रकांति ॥
कुठें दुर्बलतम भ्याड हरिणपंक्ति ॥
तात जगतीं विख्यात वीर कोठें ॥
कुठें कीटांसम शत्रुसैन्य मोठें ॥ १ ॥

वी०—मला मुळीं माझ्या मित्राबद्दल विशेष भीति बाळगण्याचें कारण नाहीं. बरें पण बकुला, तूं आमच्याबरोबर लढाईला येणार का?

ब०—असें का विचारतां? या वेळीं मी लढाईला जाण्यासाठीं किती तरी उतावीळ झालों आहें!

झिंजोटी-त्रिवट.

रिपुवपुवरी कराया वार ॥ उत्सुक असे किती तरि तरवार ॥ ध्रु० ॥ क्षात्रकुला मज पात्र कराया मद्भुज असति सशस्त्र तयार ॥ गमन कराया रणांगणाप्रति स्फुरण चरण करिती अनिवार ॥ १ ॥

वी०—शाबास बकुला, शाबास. तू शूरसेनाचा मुलगा शोभतोस खरा. (मनांत) मला तर निःसंशय वाटतें कीं हा पुढें मोठा वीर निपजणार.

साकी.

सुकुल बकुल रिपु-भुजगां होइल नकुलचि अचिरें काळें ॥ उज्ज्वल वीर्या प्रकट करी अरि बाल्यहि पूर्ण न झालें ॥ रत्न लहान जरी ॥ दावि अपूर्वा कांति खरी ॥ १ ॥

पण समोरून हा भरधांव घोडा फेंकीत कोण येत असावा बरें ? शूरसेनाकडून तर कोणी आला नसावाना ? पण हा पहा घोड्यावरून उतरलाच. आतां लवकरच कळेल हा कोण, कोठून, आणि काय वर्तमान घेऊन आला आहे तें.

(जासूद प्रवेश करितो.)

जासूद—महाराज हें पत्र (पत्र हातांत देऊन) होईल तितक्या त्वरेनें आपल्या चरणांपाशीं आणून देण्यास मला माझ्या धनिनीनें- नव्हे धन्यानें—आज्ञा केली आहे. (प्रणाम करून जातो.)

वी०—(वाचतो.) "आपल्या सैन्यांतील शूरसेन नांवाचे सरदार राजधानींत कारागृहांत पडले आहेत. त्वरा करून त्यांना सोडवून न्यावें.

त्यांच्या बंधनास कारणीभूत झालेला एक हतभागी मनुष्य."

हरहर, शेवटीं माझी मनोदेवता खरी ठरली अं ! बरें पण हा हतभागी मनुष्य कोण ? आणि हा मित्राच्या बंधनास कारणीभूत झाला कसा ? मी पत्र वाचण्यांत गर्क असतां तो जासूदही निघून गेला आतां करावें काय ? पण हें शत्रूचें तर कांहीं किटाळ नसेल ना ? कांहीं असो; शत्रूचें नगर आपल्याला सर करावयाचेंच आहे. तेव्हां हल्ल्याचें काम लवकर हातीं घेऊन जासुदाचें वर्तमान खरें असेल तर मित्राची मुक्तता करावी हें बरें.

ब०—महाराज, चिंताग्रस्त कां झालांत ? बाबा खुशाल आहेत ना ?

वी०—ईश्वर करो व त्याच्या पवित्र देहाला शत्रूचा विटाळ न होवो !

ब०—महाराज, लवकर सांगा काय झालें तें.

वी०—बाळा, तुला मुलाला कळून काय करावयाचें आहे ?

ब०—मी तुमच्या पायां पडतों. मला लवकर कळूंद्या काय झालें तें. बाबा जर कोठें दुःखांत असतील तर मला त्यांच्या दुःखाचा वांटेकरी होण्यास जाऊं द्या. माझ्याशिवाय त्यांना अगदीं करमत नसेल. आतां मजवांचून त्यांचें सांत्वन करणारें कोण आहे ?

वी०—बाळ, आपल्या सैन्यांतील सिंह जाळ्यांत सांपडला.

ब०—काय ? बाबा बंदींत पडले ? पण त्यांच्या प्राणास कांहीं अपाय झाला नाहीं ना ? (रडत) बाबा ! बाबा ! आपल्या आवडत्या मुलाला सोडून तुह्मांला कसें जाववलें ?

मांड—गजल.

निज अर्भकासी एकट्यासी टाकुनी कसे ॥ गेलांत कां हो मजवरीही कोपलां असे ॥ ध्रु० ॥
पूर्वि मातेनेंहि मातें सोडिलें पहा ॥ जनक आई या अनाथा टाकुनी अहा ॥ जगतांत सान्या बालि कोणी राहिला नसे ॥ १ ॥
पाहुं पुनरपि मूर्ति कैशी धैर्यशालिनी ॥ कैशि वाणी ऐकुं कर्णें श्रवणमोहिनी ॥ तिळ सौख्य कोठें तातवीणें जगतिं ना दिसे ॥ २ ॥

बाबा, तुह्मीं मला आजपर्यंत फार प्रेमानें वागविलें. पण तुह्मी संकटांत असतां मी मात्र नुसते अश्रु ढाळीत रडत बसलों आहें.

झिंझोटी—त्रिवट.

तुमच्या प्रीतिसी पहा ॥ न मुळीं पात्र नीच हा ॥ ध्रु० ॥ प्राणाहुनि मज पाळुनी वाढविलें प्रेमें ॥ पळही नसलों जवळी मी नच तुह्मां

करमें ॥ १ ॥ शिकवित आलों क्षात्रकुला उ-
चित अशा धर्मा ॥ सांप्रत आयुध टाकुनियां
रडतों हतकर्मा ॥ २ ॥

वी०—(मनांत) काय करावें ? माझेंही अंत:करण या बालमीनें विदीर्ण होऊन गेलें आहे. पण असा धीर सोडून कांहीं उपयोग नाहीं. मींच असे हातपाय गाळल्यावर या बालकाची आणि सैन्याची काय स्थिति होऊन जाईल? हाच प्रसंग धैर्य दाखविण्याचा आहे. (मोठ्यानें) वकुला, पुरुषांनीं आणि त्यांत तुझ्यासारख्या वीरपुत्रांनीं व्यर्थ शोक करणें योग्य आहे काय? अशा प्रसंगीं वीरांनीं शत्रूला डोळ्यांचें पाणी दाखवावें कीं तरवारीचें पाणी?

व०—(आवेशानें) महाराज, हा पहा मी चाललों सूड घेण्या-करितां शूर पुरुषाचा अपमान केल्याचें पक्कें प्रायश्चित्त आज शत्रूला देतों.

बिहाग—त्रिवट

रिपुमधें हाकितों उडी ॥ जाऊं दे धरीं चरण
तव पळ न दवडि ॥ ध्रु० ॥ रण-मर्कीं बुडी ॥
देउनी कुडी ॥ हतचि येघडी ॥ बळि देइन
मुख न उघडि ॥ मज असोत कशाहि किर्तीहि
नडि ॥ १ ॥

वी०—(स्वत:शीं) हा दु:खामुळें तर अगदीं अनावर झालेला आहे. (उघड) बाळा वकुला, असा अविचार करण्यांत काय अर्थ ?

व०—यांत कांहीं अर्थ नसून परिणामीं अनर्थ असला तरी मी जाणार. कृपा करून मला सोडून द्यां.

झिंझोटी—त्रिवट.

मम तदर्थ त्यजीन प्राण ॥ अरिची रानोरान
दाणादाण करिं जाण ॥ ध्रु० ॥ वयें अरि ल-
हान ॥ रिपु प्रबलवान् ॥ तरवार मम करिं ॥
पर्वा रति न करिं ॥ क्षणिक तनुचि कांहीं ॥
अति लघु जीवाचीही ॥ तिळभर पळभर मज
न गुमान ॥ १ ॥

आणखी महाराज असें पहा कीं,

पिलू—धुमाळी.

दक्ष धुरंधर प्रबल भयंकर नामहि ज्याचें श-
त्रूंसी ॥ कद्रनीं वदना पाहुनि ज्याच्या कंप सुटे
तद्गात्रांसी ॥ ऐशा सिंहाचा छावा होवोनी ऐसा
का राहुं ॥ तातासी शोकीं मी कैसा नेत्रांनीं
पाहुं ॥ नीचा शत्रूच्या धिःकारा कैसा या
साहुं ॥ १ ॥

वी०—(त्यास पोटाशीं धरून) शाबास बकुला, शाबास तू आपल्या निश्चयानें कुलाला धन्यता आणलीस. बाळा, या प्रसंगीं माझ्या प्रिय मित्राबद्दल मी उदासीन आहें असें तुला वाटतें का ! चल लवकर त्याला बंदींतून सोडवूं.

सोरट—त्रिवट.

त्वरा करीं चल जाउं रणा ॥ नग्न खड्ग करिं
घेउनि सर्वा भग्न करूं रिपुगर्वा ॥ मनीं ग-
णुनि किमपि न मरणा ॥ ध्रु० ॥ शोक वृथा

न करीं ॥ स्वमना अवरीं ॥ मनिं धीर धरीं ॥
दृढ भक्ति हरीवरि ठेविं खरी ॥ १ ॥ सुहृदा-
वांचुनियां ॥ फळ वांचुनियां ॥ अंगि कांहिं
न या ॥ बहुतापमया ॥ चल सोडवुं त्या ॥ १ ॥

बकुला, आज आमच्याबरोबर येऊन आपल्या पित्याचें काम तूंच कर. आजच्या विजयाचें सर्व श्रेय तुझ्याकडे. चल जाऊं.

ब०—महाराज, आपल्याबरोबर रणांगणांत येण्याची मला आज्ञा केली हे आपले फार उपकार आहेत. ईश्वराच्या कृपेनें बाबांची सुटका आज सायंकाळच्या आंतच आपण कराल अशी माझी खात्री आहे. हे दीनदयाळा परमेश्वरा,

विहाग-त्रिवट.

शरणागतनाथ जना तुझ्याविना समर्थ या
विनवूं कुणा ॥ ध्रु० ॥ मङ्गुज बंधनिं पडती
तोंवरि ताह्यांच्या करुनी अवना । शिथिल सु-
सह करिं करीं कुसुमापरि बंधना ॥ १ ॥

अहो सैनिकहो,

झिंजोटी–दादरा (ब्यांडच्या चालीवर.)

अगीं महशूर असे जो शूर तया तातासि र-
क्षाया । खुली तरवार करा सरदार रिपूतें
आजि भक्षाया ॥ चिलखत चढवा रुधिरें म-
ढवा शत्रुसि रडवा पदिं तुडवा । रिपुतें पळवा
नव यश मिळवा पूर्व यशातें नच मळवा ॥ १ ॥

बिहाग–धुमाळी.

हे वीरांनो झणि चला अरीसी गांठूं या निमि-
षांत ॥ ध्रु० ॥ कदन करुनि अरिसदनिं करुं
सपदि रुदन-युत युवतिवदनशतास । मरण
गणुनि नच हरण करुनि रिपु शरण अणुं स्वनृ-
पचरणयुगास ॥ पवनसम बहुत जवन करुनि
करुं हवन त्वरित रिपुभवनगणास । गमन क-
रुनि अरिदमन करुनि मदशमन करुं तिळहि
दम न मनास ॥ १ ॥

(जातात.)

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

स्थल - कारागृह.

शुंभसेन—(प्रवेश करून) छे बोवा ! आपले तर पळतां पळतां पायांचे टांके ढिले झाले. आमची युद्धाची तयारी ह्मणजे शास्त्रीबुवांनीं दिलेल्या युद्धशास्त्रावरील कविता चक्क पाठ करून ठेवण्यापलीकडे फारशी नव्हती त्या दोनदोनदां तीनतीनदां ह्मणून पाहिल्या, त्यांत एकही चूक निघाली नाहीं. तरी रणांगणीं गेल्याबरोबर आपले धाबे दणाणून गेले. अरे बापरे ! कोण तो तरवारींचा चकचकाट व भाले बरच्या वगैरेंचा लखलखाट. येवढा धुळीचा लोट मीं माझ्या जन्मांत उसळलेला पाहिला नव्हता. लढाईंत त्या धिप्पाड स्वारीचें लक्ष्य माझ्याकडे गेलें मात्र. त्यासरशी त्यानें ती आपली काळस्वरूपी तरवार मजवर उगारली. तेव्हां वाटलें कीं आतां आपलीं शंभर वर्षे भरलीं. अरे, मी वीरसेन महाराजांकडचाच आहें, मला मारूं नकोस, असें मीं त्याला पुष्कळ सांगितलें. तरी त्याला कांहीं माझी दया आली नाहीं. ती तरवार जर का माझ्या या फुटक्या कपाळावर पडती तर मी व माझे वेत या दोघांचाही बरोबरच अंत झाला असता. पण आयुष्याची दोरी बळकट होती आणि माझ्या घोड्यानें पण कसब केलें ह्मणून वांचलों. माझ्यापेक्षां भित्रेपणा जास्ती असल्यानें ह्मणा, किंवा अकल जास्ती असल्यानें ह्मणा, त्या बेट्यानें ती उगारलेली तरवार पाहून जी एक उडी मारली तीसरसा मी आलों खालीं व घोडा झाला मजकूर स्वार. हें दुसरेंच गंडांतर माझ्यावर

आलें होतें. परंतु त्यांतूनही बचावून मी इकडे तिकडे न पहातां या दिशेकडे पळत आलों. आतां प्राण जरी गेला तरी रणांत ह्मणून जावयाचें नाहीं, व कोणीं माझे हात जरी तोडले तरी हातांत तरवार ह्मणून धरावयाची नाहीं, अशी मनाशीं गांठ बांधून ठेविली आहे बरें, देवानें या पठ्याला इतक्याही संकटांतून वांचविलें यांत त्याचा हेतु काय असावा? मला राज्यपद मिळवून देण्यावांचून दुसरा काय असणार?

पिलू–धुमाळी.

मृत्युभयातें दाखवितांची शूरसेन जरि वीरमणि। भीत भीत होईल खरोखर महत्त्व ऐकुनि तो स्वमनीं॥सैन्य घेउनी वीरसेनही सोडुनि सुदतीसी निघुनी । जाइल ऐशा वचनातें मी घेइन त्यापासोनि ह्मणी ॥ सेना जातां नगरांतूनी गोड गोड शब्दां वदुनी । जिंकिन नंतर चारुहासिनी बाला गजगति ती रमणी ॥ सुंदर मंदिरिं कुंदरदन सखिसह उपभोगां भोगोनी । होइन स्वामी या राज्याचा मजहुनि धन्य नसे कोणी ॥ १ ॥

अहाहा! हें सर्व मनोराज्य असतां केवळ याच्या चिंतनानें मला किती आनंद होतो आहे! बरें, पण आतां आपल्या इष्ट कार्यास सुरुवात करावी. (आड उभा रहातो. नंतर शूरसेन एकटा बसला आहे)

शूरसेन—आज त्या पहारेकऱ्यानें मला सांगितलें कीं जर वीरसेनाचे सैन्यानें शहरावर हल्ला केला तर माझा प्राण कांहीं रहाणार नाहीं. अरेरे! या कारागृहांतच माझें मरण असावें ना!

पूर्वी-धुमाळी.

किति ही नीच दशा मातें आली । अवचित
या काळीं ॥ हे भगवंता मजवरि आतां अनु-
कंपा तव काय निमाली ॥ ध्रु० ॥ कर हे स्फु-
रती आयुध धरण्यातें । नच परि जवळी तें ॥
मन हें उत्सुक बहु सुत बघण्यातें । परि नच
तो येथें ॥ प्रियसुतविरहित निःशस्त्र अहा म-
रणें लिहिलें माझ्या भाळीं ॥ १ ॥

पण माझ्यासाठीं वीरसेनानें शत्रूच्या अटी मान्य कराव्या अशी माझी मुळींच इच्छा नाहीं. माझा तर उलट निश्चय झाला आहे;

कालिंगडा दादरा.

मरण गणुनि तुच्छ स्वदेश-कीर्ति मी यदा । रौ-
रव नरकीं पडोंच रौरव नरकीं पडों व्हावों कृ-
तघ्न मी सदा ॥ ध्रु० ॥ तनय नको कीर्ति नको
सौख्य नको संपदा । शतपट अति विकट
निकट प्रकट होउ आपदा ॥ १ ॥ (गाचित जसतो.)

शं०—(शूरसेनाजवळ जाऊन) कसें काय बाबा! तुझा निश्चय काय झाला आहे! शरण येऊन आमच्या म्हणण्याप्रमाणें वागावयाचें कीं नाहीं?

शू०—छे छे, ही गोष्ट देखील बोलूं नकोस.

मन्मुखसन्मुख म्हणि रणिं कंप सुटत ज्या
पदा ॥ त्याच पदीं तेंच वदन नच नमविन
मी कदा ॥ मरण० ॥ २ ॥

शुं०—बरें तर, तुला जर स्वामिभक्ति प्राणापेक्षांही आवडत असेल तर ती आतां खुशाल दुसऱ्या जगांत मिरवीत बैस. उद्यां सकाळीं तुझें मस्तक शहरच्या वेशीवर लटकलेलें असेल हें मात्र मनांत पक्कें समजून ऐस.

शू०—तुझ्यासारख्या पंढांनीं भरलेल्या या शहराचें रक्षण तुम्तें माझें मस्तक करितांना पाहून स्वर्गांत मला किती तरी आनंद होईल!

शुं०—(मनांत) काय करावें? याजपुढें आपली तर कांहीं मात्रा चालत नाहीं. बरें तर आतां असें बोलावें. (उघड) वेड्या, कांहीं तरी विचार कर. तुझ्यामागें तुझीं बायकापोरें काय करतील?

शू०—माझी प्रिया या जगांतील विपत्तीच्या आटोक्याबाहेर आहे. व मुलाविषयीं म्हणशील तर तो अनाथाप्रमाणें शोक न करितां आपल्या पित्याच्या मरणाबद्दल पुरता सूड घेईल. तुमच्या या शहराची तो राखरांगोळी उडवील. ज्या ठिकाणीं हल्लीं गाणेंनाचणें चाललें असेल त्या ठिकाणीं घुबडांच्या गाण्याशिवाय एकही शब्द ऐकूं येणार नाहीं, व कबंधांच्या नृत्याशिवाय कांहीं दिसणार नाहीं. जे गगनचुंबित वाडे हल्लीं आपल्या उंचीच्या तोऱ्यांत सर्वांना तुच्छ मानताहेत, तेच आमच्या सैन्यापुढें आपलीं मस्तकें लववून धाडकन् जमिनीवर पडतील. तुमचीं दुष्कर्में पाहून आधींच रागानें लाल झालेली ती इंद्रावती नदी रक्ताच्या पुरानें जास्ती तांबडी होईल. व तुमच्या राजसभेंत साक्षात् कृतांत आपला दरबार भरवील.

शुं०—(मनांत) हें ऐकून माझ्या अंगावर कांटा उभा राहिला. (उघड) हटी मनुष्या, तुझे डोळे उघडणार तरी केव्हां?

शू०—सांगतों ऐक. माझ्या मृत्यूबद्दल माझें सैन्य तुमचा सूड घेऊन तुमची दुर्दशा उडवून देईल तेव्हां ती पहाण्याकरितां मात्र स्वर्गांत मी आपले डोळे उघडून तुह्यांकडे आनंदानें पाहीन.

शुं०—जोंपर्यंत तुझें डोकें धडापासून वेगळें झालें नाहीं तोंपर्यंत तें लवकर धान्यावर आण. वेगळें झाल्यावर मात्र कधींच धान्यावर येणार नाहीं. थांब, तुझा हट्ट व प्राण हीं बरोबरच या शरीरांतून काढून टाकतों तुझें मन जरी इतकें दुराग्रही आहे, आपला कृतनिश्चय सोडणार नाहीं, तरी शरीर कांहीं तसें नाहीं तें मस्तकापासून दूर रहाण्यास कबूल होईल.

शू०—रणांगणांतून भित्रेपणानें पळून आलेल्या व एकही शिपाई मारावयास मिळाला नाहीं म्हणून खिन्न झालेल्या मनुष्यास आपला निष्फळ कोप शमविण्याकरितां नि:शस्त्र मनुष्यास ठार मारणें हेंच साधन काय तें मोकळें असतें. मी मरणाकरितां एका पायावर तयार आहें तुझ्यासारख्या नीच मनुष्याच्या हातून मरण येतें एवढेंच काय तें वाईट वाटतें.

शुं०— मी नीच असो किंवा कसाही असो. तुला मात्र या नीच जगांतून एका क्षणांत उंच अशा आकाशांत नेऊन पोंहचवितों चल, लवकर देवाचें स्मरण कर.

शू०—(आकाशांकडे पाहून)

सिंधभैरवी—दादरा.

प्रभो अनाथ-पालका । अनंतसृष्ट-चालका ॥ ध्रु० ॥ मदीय पाळिलें सुता । जिवाहुनीहि तत्त्वतां । स्वदेह सोडि मी अतां । न देखतांचि सन्मुखा ॥ १ ॥ न तात राहिला तया । तयावरी असो दया ॥ अनाथ देई कांहिं या । तुझ्याच हातिं बालका ॥ २ ॥

शुं०—चल आटप. प्रार्थना लांबली ह्मणून आयुष्य मात्र लांबावयाचें नाहीं. (तरवार उगारतो.)

(इतक्यांत बकुल येऊन शूरसेनास मिठी मारतो व वीरसेन शुंभसेनास पकडतो.)

ब०—बाबा, बाबा,

मांड-दादरा.

काय ही दशा तनुची काय ही दशा । किति तरी अहा तात असे जाहली कृश ॥ध्रु०॥ जळड जड निगडिं पद्कमल असे हें । रिपुसिही न होवोत कधीं यातना अशा ॥ १ ॥

बाबा, मी किती भाग्यवान् ह्मणून आयत्या वेळीं या ठिकाणीं आलों. (शुंभसेनाकडे वळून) दुष्टा, चल चालता हो येथून. खबरदार पुन्हा आपलें काळें तोंड दाखविलेंस तर.

वी०—दुष्टा, ही पाहिलीस का नग्न तरवार? तुझ्या शरीरांत घुसण्याविषयीं किती उतावीळ झाली आहे! पण तिला तुझ्या अपवित्र रक्ताचा विटाळही होऊं नये ह्मणून मीं तिला आवरून धरिली आहे. मित्रा, या दुष्टाला काय शिक्षा करूं बोल.

शू०—महाराज, तो एक क्षुद्र मनुष्य आहे. त्याला शिक्षा कशाला? त्याला सोडून द्याना?

वी०—तूं ह्मणतोस ह्मणूनच याला मी सोडून देतों. (शुभसेनास) पण अधमा, आधीं शपथ घे कीं आतांच्या आतां मी हें राज्य सोडून जातों. (त्यास सोडून देतो. शुंभसेन पळून जातो.)

शू०—(साश्रु) तुह्मी दोघेही मला पुन्हा कडकडून भेटा. (त्यास आलिंगन देतो.)

धी०—मित्रा, या तुझ्या शृंखला डोळ्यांनीं बघवत नाहींत तर त्या आधीं काढून टाकितों. (काढूं लागतो.) मित्रा, आज तुझी जी सुटका झाली तिला कारण बकुलचा प्रताप.

शू०—(बकुलास घट्ट पोटाशीं धरून) माझ्या आवडत्या मुलानें स्वतः श्रम करून माझी सुटका केली यापरतें दुसरें कोणतें भाग्य ? धन्य आहें मी.

लीलांबरी–दादरा.

आजवरी जनक देइ जन्म सुताला । पुनर्जन्म तनयें मज आज दीधला ॥ ध्रु० ॥ आलिंगूं तनु किति ही धूलिधूसरा । चुंबुं किती म्लान मुखा या मनोहरा । पाहुं किती नेत्र भरुनि मूर्ति सुंदरा । तृप्ति न हो सुमहोत्सव आजि लाधला ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

(प्रकोप, शालिनी व मालिनी.)

मांड–धुमाळी.

शा० व मा०—शांति धरा नृपराज । शोका टाकुनि व्हा धृतिभाज । खिन्न असे कां आज ॥ ध्रु० ॥ जें असेल दैवीं तें टळेल कैंची । प्राक्‌कर्मफलिच ही समजावी ॥ ईल न कांहिं

इलाज ॥ १ ॥ जनहि सर्व जरि फिरे एक मित्रही तुरे । जाणा या दुहितांचें सारें प्रेम असे निर्व्याज ॥ २ ॥

प्र०—नृपराज, या शब्दानें मला कशाला दुखवितां? मुलींनो, मोठें राज्य गेलें म्हणून मी दुःखी आहें असें तुह्मांस वाटतें काय? देवानें जरी मला तें परत दिलें तरी आतां नको.

पिलु–धुमाळी.

वैभव स्वकरें देईन झुगारुनि सारें । मनिं खेद न मम कांहीं ॥ जरि मत्सुख नियुनी जाई । सकल अचिरें ॥ ध्रु०॥ प्रिय दुहितांची लोटिलें असुखार्णवि मीं खास । हृदया सांप्रत कालिं हा विचार दे आयास ॥ प्राण कसे अजुनीही नच जाती यांतें नेई अदय विधिरे ॥ १ ॥

शा०—बाबा, आमच्याबद्दल काळजी करूं नका.

खमाज–गजल.

जी असे गति आपुली ती आमुची । शांत व्हा दुखवूं नकाहो या वचीं ॥ ध्रु० ॥ संकटें तुह्मांसवें बहु सोसण्या । तात आणा सिद्ध आहों आजची ॥ १ ॥ दुःखि पाहुनि तुह्मां हृदय विदीर्ण हें । त्वरित सोडा शोक अंजलि ही रची ॥ २ ॥

प्र०—(दोघींस जवळ घेऊन) मुलींनो, तुह्मांसारख्या सुशील

मुलींवरून राज्य देखील ओंवाळून टाकावें. शालिनि, तुझा विवाह आतां वीरसेनाशीं किंवा शूरसेनाशीं अगेल तर मी सुखानें मरेन. देवा, माझ्या या अर्भकांनीं काय पातक केलें होतें कीं त्यांनीं माझ्या दोषाबद्दल प्रायश्चित्त भोगावें ! शालिनि, शुंभसेनानें तुला एकटी टाकून पळ काढला हें जर मला त्या वेळीं खरें वाटलें असतें तर मीं शूरसेनाचा उपमर्द केला नसता. माझें राज्य गेलें याबद्दल मला वाईट वाटत नाहीं. पण त्या वीराचा उपमर्द केल्याची आठवण झाली ह्मणजे माझें मन मला खातें.

शा०—बाबा, माझ्या हातून एक अपराध झाला आहे.

प्र०—मुली, बोल पाहू तो कोणता तो ! तुझ्या सर्व अपराधाबद्दल तुला क्षमा आहे.

शा०—मीं वीरसेनाला पत्र पाठवून त्यांना मोडवून नेण्याबद्दल विनंति केली.

प्र०—एकूण माझ्या दोषापासून तूं मला मुक्त केलेंस. शालिनि, याला तू अपराध ह्मणतेस काय ?

शा०—मला अशी भीति होती कीं शुंभसेनानें—

प्र०—त्या मूर्खाचें नांवसुद्धां काढू नको. त्याच्या नादानें वागूं लागल्यापासून मला रणांत कधींही जय आला नाहीं. त्याच्या वाडवडिलांनीं आमच्या गादीचें उत्तम तऱ्हेनें रक्षण केलें ह्मणून मीं त्याच्यावर विश्वास ठेविला. पण दुष्टानें त्याबद्दल मला चांगलें प्रायश्चित्त भोगण्यास लाविलें.

एक सेवक (येऊन)—महाराज, बाहेर वीरसेनमहाराज उभे आहेत. आज्ञा होईल तर त्यांना आंत आणतों.

प्र०—बाबा, आतां माझी आज्ञा कसली ? त्यांची मर्जी असेल तर मीच त्यांची भेट घेण्याला बाहेरील दिवाणखान्यांत येतों.

प्रवेश ३ रा.

(सुवर्णमालिनी प्रवेश करिते.)

सु०—(मनांत) अरे देवा! आतां ही गोष्ट कोणत्या थराला जाईल कांहीं सांगवत नाहीं. आमच्या महाराजांचा स्वभाव पडला तापट. वीरसेनही विजयानें अंधळे झालेले. शुंभसेनानीं आजपर्यंत जें प्रकोपमहाराजांना सांगितलें कीं वीरसेन शालिनीबाईबरोबर लग्नीन करावयाला तयार नाहींत तेंही शंभर हिश्शांनीं खरेंच असेल. या तारुण्याचा संचार झाला कीं माणसाच्या हातून काय होईल आणि काय न होईल याचा कोणीं नेम सांगावा? तेव्हां या भेटीचा शेवट गोड होईल असें मला नाहीं बाई वाटत. मागें वीरसेन महाराजांचे वडील आणि प्रकोपमहाराज यांनीं सहज विनोदानें शालिनी आणि वीरसेन यांचें लग्नीन करावयाचें ठरविलें तेव्हां त्यांच्या हें सगळं ध्यानींमनीं तरी आलें असेल का? कुठून येणार? (थांबून) फत्तेसिंग हे शूरसेनावर पहारा करण्याकरितां होते, तेव्हां ते जर या भस्त्यांच्या रागाला बळी पडले तर–इडापिडा टळो आणि अमंगळ पळो! फत्तेसिंगाबरोबर थाटानें लग्नीन करून श्रीमंतींत दिवस घालवावयाचे ही माझ्या वेड्या मनाची हौस. पण शेवट हा असा व्हावयाचा होता!

सरला—(येऊन) अहाग वेडे सुवर्णमालिनि, तिकडे काय आनंदीआनंद चालला आहे. आणि तूं आपली दुर्मुखलेलीच ना?

सु०—कायग झालें सरले, तुला इतकं आनंदायला? प्रसंग कोण, आणि हें काय हें?

स०—अग, वीरसेन व प्रकोपमहाराज पुन्हा एक झाले.

सु०—(तिला आलिंगून) बरें झालें बाई, तुझ्या तोंडांत साखर पडो. बरें पण हें तुला कसें कळलें ?

स०—त्यांत ग काय कठिण ? मीं कोणाला नकळत त्यांचें सर्व बोलणें ऐकिलें. पहिल्याप्रथम आपले महाराज वीरसेन महाराजांवर फार संतापले. आणि तूंच प्रथम मागें ठरलेला संकेत मोडलास आणि पुन्हा दुःखावर डाग देण्याकरितां युद्धाला उभा राहिलास असें एक ना दोन, नाहीं नाहीं तें त्यांना बोलले. पण मग जेव्हां त्यांना कळलें कीं वीरसेन अजून रामचंद्राप्रमाणें दृढनिश्चयी आहेत तेव्हां त्यांचा सगळा राग निवून गेला. त्या शुंभसेनानें आमच्या महाराजांचे कान कसे भारुन टाकिले होते. वीरसेन महाराजांचीं पत्रें मधल्यामध्यें दाबून टाकिलीं आणि त्यांच्या वकिलांची आणि महाराजांची गांठच पडूं दिली नाहीं.

सु०—काय तरी दुष्ट स्वभाव ! बरें, मग लहानपणीं ठरल्याप्रमाणें या दोघांचें लग्न होणार तर !

स०—होणार म्हणजे ? शालिनीबाईंची मर्जी सुप्रसन्न करण्याकरितां वीरसेनमहाराज लवकरच त्यांची भेटही घेणार आहेत.

सु०—पण गडे सरले, मीं तुला कांहीं सांगितलें तर राग नाहींना येणार ? लहानपणची मैत्रीण म्हणून सांगावेंसें वाटतें.

स०—तें कायग ?

सु०—अग, असें आड राहून दुसऱ्यांच्या एकांतांतल्या गोष्टी ऐकणें ही खोड बऱ्यापैकीं नव्हे म्हणून सांगतें.

स०—अग होहो. सगळें समजलें बरें. फत्तेसिंगाच्या आणि तुझ्या एकांताविषयीं म्हणत असशील नाहीं ?

सु०—मेलें जिभेला हाड सुद्धां नाहीं. अग, तुझ्यासारख्या अ-

ग्सरेला सोडून माझ्यासारख्या कुब्जेला वरावयाला ते वेडेच आहेत वाटतें. त्या कमानदार भिवया, तें सरळ नाक (सरळ आरशांत पाहू लागते.) (मनांत) चढली मेली लागलीच हरबऱ्याच्या झाडावर. तिला वाटतें कीं मी खरीच अप्सरा लागून गेलें आहें. अहाहा ! ध्यान ! दिवे ओंवाळावे त्या स्वरूपावरून काय तें फताडें नाक आणि त्या केंगाळ भिवया ! कोणत्या वेळेवर जन्माला आली होती कोण जाणे

स०—गडे सुवर्णमालिनि खरेंच का हें सगळें ? नाहीं तर आपलें तोंडदेखलें बोलत असशील

सु०—नाहींग, तू तशीच सुंदर आहेस (एकीकडे) राक्षशणीप्रमाणें

स०—तू सुद्धां काहीं कमी नाहींस कांकणभर जास्तच म्हटलें तरी शोभेल. (सुवर्णमालिनी आरशांत पहाते) ते कान पहा किती सुंदर आहेत, (एकीकडे) जशा काहीं सुपल्याच. तसेच हे दांत (एकीकडे) हत्तिदंतच.

सु०—इश्श ! एखाद्याची स्तुति करावी तरी किती मेली बाई ! भाट झाली असतीस तर किती शोभली असतीस पण.

स०· तसेच हे गाल–अगबाई, पण यांचा कोणीं चावा घेतल्यागत दिसतो

सु०—बाई बाई ! शर्थ झाली तुझ्या थट्टेखोर स्वभावाची.

स०—पण या सगळ्या अवयवांपरीस निराळीच गोष्ट तुझ्या उपयोगीं पडेल.

सु०—ती कोणती ?

स०—कोणती म्हणजे ? तुझें नांव. सुवर्णमालिनी हें नांव फत्तेमि-

गांना इतकें आवडेल कीं ज्याचें नांव तें. महादेवापेक्षां हें नांव ठेव-णाऱ्या आईबापांचेंच रिण तुझ्यावर आहे.

सु०—चल चहाटळ कुठली !

कलिका—(येऊन) कायग वेळ नाहीं प्रसंग नाहीं उठल्या सु-टल्या कीं लागल्या मांजरींप्रमाणें भांडायला. भांडकुदळ कुठल्या.

स०—अग हो ! आहेस ठाऊक. मोठी आली आहेस शहाणपणा शिकवायला ! बरें, पण इतका आपल्या भारदस्तपणाला ऊत तरी क-शानें आला आहे तो ?

सु०—अशानें का ती सांगणार आहे ? चल हो एकीकडे. मीच विचारून पहातें कलिके कायग झालें ?

क०—अग या लढाईत ज्यानें तरवार गाजविली तो शूरसेनाचा मुलगा बकुल आतां आपल्या महाराजाची क्षमा मागण्याकरितां आला होता त्याची एक जखम खुली होती म्हणून तो दिवाणखान्यांत कसा प्रेतासारखा होऊन पडला आहे. रूपानें कसा मदनासारखा आहे वैद्यबुवांना बोलावणें पाठविलें आहेच. अगबाई ! तो पहा शूरसेनाचा करुणस्वर.

(पडद्यांत)

* जोगी–धुमाळी.

निजबालपणीं कां जासी अवचित हें जग

* या पदाबद्दल खालील पद म्हटलें असतां चालेल.

मांड–दादरा.

मौन असें धरुनि उगा पडसि कासया । तात तुझा रुदन करित शान्तवीं तया ॥ ध्रु० ॥ आज्ञा मम आजवरी कधिं न मो-डिली । मजवरती प्रीति अपूर्वाच दाविली । तुजविण हृद-

सोडुनियां ॥ ध्रु० ॥ अजुनि विकसला ना-हिंस बकुला तोंची म्लानहि होसी ॥ १ ॥ चरित्र अपुलें कां संपविलें बुडवुनि शोकिं पित्यासी ॥ २ ॥

सु०—देव करो आणि त्याच्या जिवाला आराम पडो! कलिके, तूं जा आणि वैद्यबुवा आले कीं नाहींत तें पाहून ये. (कलिका जाते) गडे मरले, अशा गोष्टी पाहिल्या किंवा ऐकल्या किनई म्हणजे हा सारा संसार कसा विश्वासारखा वाटूं लागतो.

स०—अग, यालाच म्हणतात स्मशानवैराग्य. ही घटका जाऊंदे म्हणजे तूंच पहा कशी फत्तेसिंगाबरोबर लग्न करावयाच्या विचारांत गढून जातेस ती.

सु०—अशा वेळीं सुद्धां तुला थट्टेशिवाय सुचत नाहींना? धन्य आहे बाई तुझी.

क०—(येऊन) हं सुवर्णमालिनि, सरले, चला लवकर.* बकुल चांगला शुद्धीवर आला आहे. शूरसेनही प्रकोपमहाराजांचें बोलणें मोडूं नये म्हणून त्याला इथेंच ठेवून निघून गेले. महाराजांनीं त्याला केला आहे शालिनीबाईसाहेबांच्या स्वाधीन. आतां आपणांलाच त्याच्या पथ्यापाण्याची तजवीज पाहिली पाहिजे.

---

* याचि पहा झालि काहली । बोल बोल मधुर बोल येउंदे दया ॥ १ ॥ मंजुळ तव वचन अतां आयकूं कुठें । कंठुं कसें जी-वित तुजवीण एकटें । निश्चल तुज पाहुनियां हृदय हें फुटे । पाहिं पाहिं उघडुनियां नेत्रकुवलया ॥ २ ॥

दोघी—चला तिकडेच जाऊं सगळ्याजणी. (जातात.)

(पडदा पडतो.)

प्रवेश ४ था.

(बकुल मंचकावर पडला आहे, जवळ शालिनी बसली आहे.)

शा०—बाळा, आतां तुला बरें वाटतें का ?

ब०—ताई, तूं इतक्या ममतेनं माझी सेवा करीत असूनही मला बरें वाटू नये काय ? हे तुझे उपकार मी कसे फेडूं ?

शा०—बाळा, तूं बरा झालास की नाहीं म्हणजे मला सगळें मिळालें, समजलास ?

ब०—माझी आई परलोकवासी झाल्यापासून मला कोणत्याही स्त्रीनें इतक्या ममतेनं वागविलें नाहीं. तुला पाहिलें की मला माझ्या आईची आठवण होते. आणि तुला ताई म्हणण्यापेक्षां आई याच नांवानं हांक मारावीशी वाटते. तुझ्या डोळ्यांला पाणी कां आलें ? तुला वाईट वाटत असेल तर मी पूर्वीप्रमाणें ताईच म्हणत जाईन.

शा०—(डोळे पुसून) बाळा, तुला आवडत असेल तर आई याच नांवानं मला हाक मारीत जा.

ब०—पण हें काय बरें असें ! तूं पुन्हा रडूं लागलीस.

शा०—बकुला, मला माझ्या आईची आठवण झाली. ती सुद्धां मला लहानपणींच सोडून गेली. (मनांत)

झंपला—दादरा.

मृदु बालवाक्य ऐकुनी मदीय अंतरीं । कल्लोल होइ तिमिर येइ लोचनावरी ॥ ध्रु० ॥ हें बाल

बाळसें मदीय होइ का तरी । ऐशा विचारिं
चित्तवृत्ति होइ बावरी ॥ १ ॥

(उघड) बकुला, तुला झोंप येते आहे का ?

ब०—ताई, मला स्वप्नांची फार भीति वाटते. परवां मला असें स्वप्न पडलें कीं, आईची, माझी आणि बाबांची पुनः गांठ पडली. ताई, आई पुनः मला कधीं भेटेल काय ?

शा०—बाळा, असें बोलूं नये. थांब, तूं डोळे मीट. मी तुला झोंप येण्याकरितां एक गाणें ह्मणतें.

ब०—ह्मण बरें. मला तुझें गाणें फार आवडतें.

शा०—(गाऊं लागते.)

झिंजोटी—दादरा.

नीज सुखें विश्रांतिसि पात्र ही निशा । निद्रा-
कुल जग सगळें शांत दशदिशा ॥ ध्रु० ॥
चंद्रबिंब बिंबित कासारिं निर्मळीं । सोडुनि
नभ निद्रासुख सेवण्या जलीं । अवतरलें
काय गमे शांत भूतलीं । अचलपर्ण वृक्षावलि
स्तब्धतावशा ॥ १ ॥

(मनांत) याला झोंप लागली वाटतें. मुलांना कशी ह्मणतां ह्मणतां झोंप लागते. पण तेंच माझें पहा. रात्रीच्या रात्री पापणीला पापणी न लागतां जातात. आतां याला असाच येथें ठेवून आपण बाहेरच्या दिवाणखान्यांत जावें. (बाहेर येऊन बसते.) मला आतांशा असें काय होतें कोण जाणे.

पिलू-रूपक.

निशिदिनिं मना आयसशल्यसा एकचि छ-
ळीतो विचार । नच नच खरा मानस व्या-
धिसा अन्य न सुजीला विकार ॥ १ ॥

या मनोव्याधीचा परिणाम काय झाला आहे पहा;

पिलू-गजल.

मम मानसीं नसेच कांहीं राहिला उल्लास ।
जगती दिसे उदास ॥ अति खिन्न मानसा
कधीं ना रुचति हे विलास । न चैन या जि-
वास ॥ मन व्याप्त होइ संशयानें जाइ सारा
धीर । जड होइ हें शरीर ॥ मज देखुनी हो-
ईल का अनुरक्त तो सुधीर । गुणशाली
गंभीर ॥

त्यांचे शब्द अजून माझ्या कानांत घुमघुमत आहेत. "तात हो-उनी रक्षी अनाथा मत्सुता" याबद्दल तू माझ्या बालकाची माता हो, असें त्यांनीं ह्मटलें असतें तर किती चांगलें झालें असतें ? पण मी वेडी तर नाहीं ना ? त्यांना त्या वेळेला काय माहीत कीं शालीन ह्मण-जेच शालिनी ? पण आतां सर्व उलगडा करावयाचा, ह्मणजे सोक्षमोक्ष काय तो होऊन जाईल. शालीनास ते विसरले नसतीलच. अगबाई, पण तेच आले वाटतें.

(शूरसेन येतो.)

शू०—(मनांत) आज शालिनीला भेटून तिचे उपकार मानिले पाहिजेत. त्या बिचारीच्या कळकळीनें माझ्या बकुलची स्थिति किती

सुधारली ! "ती भेटली ह्मणजे आज शालीनाचीही चौकशी करूं. या ठिकाणीं ही कोणी सुंदर स्त्री बसली आहे. अरे, या स्त्रीचा चेहरा ओळखीचा दिसतो.

शा०—(त्याजकडे पाहून व उठून) आपण कुणाचा शोध करण्याकरितां आलां ? महाराज,

जंगला—दादरा.

वसुनि कोणती पुरी अलंकृता करीतसां । नाम काय कांतकाय मानसासि लालसा ॥ ध्रु० ॥ हेतु काय दर्शनीं । होय याचि चिंतनीं । संशयकल्लोललोल हृदयसिंधु हा कसा ॥ १ ॥

शू०—मला शूरसेन ह्मणतात. वीरसेनराजाच्या सैन्याच्या अधिपतीचें काम मजकडे आहे.

शा०—मी बरेच दिवस आपली कीर्ति ऐकत होतें. पण आज आपणांला प्रत्यक्ष पाहून मी धन्य झालें. शालीन आपली फार स्तुति करीत असे.

शू०—काय ? शालीन ?

शा०—होय. तो फार विश्वासुक ह्मणून बाबांनीं माझ्या तैनातीला त्याला ठेविला होता.

शू०—तर मग राजकन्या शालिनी हीच मजसमोर उभी आहे

शा०—होय, मीच शालिनी.

शू०—शालिनि, तुझें दैव थोर यांत कांहीं संशय नाहीं. एरवीं शालीनासारखा सेवक मिळावयाचा नाहीं.

शा०—आपण म्हणतां तें कांहीं अंशीं खरें आहे. (डोळ्यांत पाणी आणून) पण तो मला आतां अंतरला.

शू०—तो तुम्ही नोकरी सोडून गेला की काय ?

शा०—हाय हाय ! तो या लढाईत हें जग सोडून चालता झाला. (मनांत) आतां पाहूं शालीनाची आठवण आहे की नाहीं.

शू०—(व्याकुळ होऊन) शालीना, इतक्यांतच आपल्या प्रेमाचा असा शेवट व्हावा ना !

खमाज–दीपचंदी.

मजला प्रेम खरें दाउनियां शेवटिं हाय । त्य-
जिलें एकाकि जहालासि मनीं निठुर काय ॥
पळही कंठुं कसा हा युगसा तुजशिवाय ।
मजशीं बोल सख्या यासि कथीं काय उपाय ॥
हाय आतां तुजविणें कैसें करूं । भिन्न हृदयें
धीर कैसा तो धरूं ॥

शा०—(मनांत) शालीनावरचें प्रेम, शालिनि, तुला मिळेल का ! पण आतां ज्यास्ती परीक्षा पाहण्यांत कांहीं अर्थ नाहीं. (उघड) महाराज, शांत व्हा. मीं आपल्याला विनाकारण हें दुःख दिलें त्याची मला क्षमा करा.

झिंजोटी–धुमाळी.

अंकित पद्मांबुजांची दासी । गुणगणीं लुब्ध
भृंगीसि ॥ ध्रु० ॥ ज्या दुष्टेनें कारागृहिं या
कष्टविलें देहासि ॥ १ ॥ नर-वेषासी घेऊनि
जिनें वंचियलें तुम्हांसि ॥ २ ॥

शू०—(बाईनें) काय ? शालीन व शालिनी एकच. शालिनि,

चाल सदर.

सुंदरि असें तुझा अपराधी । करिं करीं क्षमा मज आधिं ॥ ध्रु० ॥ त्वज्जनकावरि कोपुनि वदलों क्रूर शब्द तुज मूढधी । मी ॥ १ ॥ सोडुनि विनया लघुतम वर्तन केलें बहु-कालावधि । मी ॥ २ ॥

तू वीरसेनराजास पत्र पाठवून माझी सुटका केलीस याबद्दल मी तुझे आभार मानितों.

शा०—त्यांत उपकार कसचे ह्मणा. पण सहज ओघाला आलें ह्मणून विचारतें, आपण आमचें नगर जिंकिलें तर निदान आह्मा बायकांना तरी स्वतंत्र ठेवावयाच्या होत्या

शू०—राजकन्ये, माझा मित्र वीरसेनराजा जसाच रूपवान आहे आणि तो किती सुशील आहे ह्मणून सांगू ! पराक्रमांत तर त्याच्या तोडीचा पुरुष विरळा. त्यानें तुह्मांला मोह पाडला तर नवल नाहीं.

शा०—आपल्या विनयाला अनुरूप असेंच आपण बोललां महाराज. वीरसेन हे आपलेच स्नेही आहेत तेव्हां ते सर्वगुणसंपन्न असे असतीलच. नाहींत असें ह्मणणें हें मजसारख्या अज्ञान स्त्रियेला शोभत नाहीं. पण आह्मां स्त्रियांचा स्वभावच निराळा पडला स्वतःच्या प्रियकरावांचून बाकीचें सर्व त्यांना तुच्छ वाटतात.

काफी त्रिवट.

प्रिय तुजा न गमतो जगतीं । निजजनकसम इतर पुरुष गणिति ॥ ध्रु० ॥ प्रियजनवचनश्र-

वण महाक्षण । सुखन्हृदमजन रूपनिरीक्षण ।
इतर विषयिं कधिं न रति करिति ॥ १ ॥

शू०—मग तुझें मन आधींच दुसऱ्यावर बसलें आहे? शालिनि, असा भाग्यवान कोणता पुरुष आहे बरें? हें मीं विचारिलें याबद्दल मला क्षमा कर; पण आजपर्यंत आपला जो स्नेह होता तोच यापुढेंही कायम रहावा अशी माझी फार इच्छा आहे.

शा० - (आनंदानें मनांत) याचा अर्थ माझ्या मनासारखाच असेल का? (मोठ्यानें) महाराज, माझें मागणें तेंच आहे. पण त्या पुरुषाचें माझ्यावर प्रेम नसलें तर उगीच नांव सांगून उपयोग काय?

शू०—काय? तुझ्यासारख्या सुशील, सुरूप राजकन्येवर प्रीति करीत नाहीं? हें संभवेल तरी कसें?

झिंजोटी धुमाळी.

अशि ही सुगुणखनि देह त्यजोनी ॥ जगिं या
दिसोनी न येइल कोणी ॥ ध्रु० ॥ शरचंद्र
अति निर्मल जैसें शोभवि तारागार ॥ विमल
देहीं शुद्ध आत्मा तेंवि करित सुविहार ॥
निरखोनी विदेही मुनिही मतिहीन होई ॥ १ ॥

असा मूर्ख, अंध, वेडा—

शा०—नका, नका, या अभागिणीसाठीं त्या महात्म्यास दूषण लावूं नका. शिवाय, त्याचें नांव कळल्यावर तुम्हांलाही तसें केल्याचा पश्चात्ताप होईल.

शू०—तर मग तो माझ्या मित्रवर्गापैकीं आहे काय?

शा०—मनुष्याचा सर्वोत्कृष्ट मित्र म्हटला म्हणजे त्याचा आत्मा हेंच जर खरें असेल तर त्यास तुमचा मित्र म्हणतां येईल.

शू०—(आश्चर्यानें) काय म्हणतेस? मजवर तुझी प्रीति! या हतभाग्यावर! शालिनि, तूं स्वप्नांत आहेस. डोळे उघडून चांगलें पहा हा तुजपुढें अधमाधम शूरसेन उभा आहे. पूर्व जन्मीं हजारों पातकें केलीं होतीं म्हणून माझ्या हृदयमंदिरांतील देवी माझी पत्नी मीं स्वर्गी दवडिली. अशा रीतीनें शरीराची आहुति देण्यापेक्षां अग्नीत कां नाहीं उडी टाकीत! त्यांत अधिक शहाणपणा आहे.

शा०—महाराज, शांत व्हा. असा कोप करूं नका. आधींच निराशेनें ग्रस्त झालेल्या या हृदयास अधिक डाग देऊं नका. मीं हें बोलणें काढिलें ही माझी चूक झाली. आतां निदान पूर्वीचा स्नेह कायम ठेवावा, म्हणजे त्यानेंच समाधान मानून मी आयुष्य कंठीन तर दया करा आणि मजवर रागावूं नका. (रडूं लागते.)

शू०—(जवळ जाऊन) शालिनि, किती कोंवळें तुझें मन हें! मला क्षमा कर. अलीकडे माझें मन माझ्या ताब्यांत रहात नाहीं. मी वदिवासांत असतांना तूं पाहिलें नाहींस माझ्या चित्ताची किती लवकर चलबिचल उडून जाते ती! आणि तशांत माझ्या प्रियेसंबधानें गोष्ट निघाल्यावर तर विचारावयासच नको. शालिनि, काय सांगूं!

भैरवी–दादरा.

सुख न कांहिं देहिं पाहिं तनु जळे न जल
जळे पळें गळे नवाश्रुपंक्ति लोचनीं ॥ गुणखनि
गुणिमणि उपरत रतिस न उणी ॥ मम रमणी
सुख भरणीं हत विजनीं भवनिधनीं ॥ तिळ
गमत न मम मनीं ॥ १ ॥

शा०—महाराज, आपल्या पत्नीवरील आपलें अकृत्रिम प्रेम पाहून मला माझ्या कृत्याची मनापासून लाज वाटूं लागली आहे. त्या प्रेमाचा मीं उपमर्द केला यांत कांहीं संशय नाहीं.

शू०—शालिनि, तूं अजून पोरवयाची असल्यामुळें वरीच चंचल आहेस. या वयांत ज्यास बायका प्रथम पहातात त्यावर त्यांचें प्रेम जडतें. पण नंतर कधीं कधीं त्यांना आपल्या अविचाराबद्दल पश्चात्ताप होतो. विवाहासारख्या घट्ट ग्रंथीमधून त्यांची सुटका होणें शक्य नसतें. व शेवटीं निराशेनें झुरून त्यांचा अंत होतो. शालिनि, वीरसेन तुला अधिक योग्य वर आहे. त्याला तूं एकदां पहा. म्हणजे मी म्हणतों हें तुला खास खरें वाटेल.

शा०—आतां आपण मला जो उपदेश केला तो मला मान्य आहे, परंतु तशा स्त्रियांपैकींच मी आहें असें मात्र मला वाटत नाहीं. जोंपर्यंत जीव आहे तोंपर्यंत माझें एकपतिव्रत कायम राहणार. जरी आपला व माझा विवाह लागला नाहीं, तरी माझ्या मनानें आपणास वरिलें आहे महाराज, आपणास्वतःस अशा निष्कलंक प्रीतीचा अनुभव असूनही आपला माझ्या शब्दावर विश्वास बसूं नये हें माझें दुर्भाग्यच आहे.

शू०—तुझें मन अजूनही बदलावें अशी माझी फार इच्छा आहे. शालिनि, मी आतां जातों. माझ्या आवडत्या बकुलाचें आजपर्यंत जसें रक्षण केलेंस तसें पुढेंही कर. (निघून जातो.)

शा०—(स्वतःशीं) हरहर! झालें! माझे सर्व मनोरथ ढांसळले.

कालंगडा—धुमाळी.

या जगताच्या ठायीं। न सौख्य उरलें कांहीं।
॥ ध्रु० ॥ तुटे संदेहलेशहि तो उरेना अल्पही
किंतु। सुखेच्छा निष्फळा होई मदाशेच्या तुटे

तंतु ! जीवनहेतु न राही ॥ १ ॥ सुरम्या मूर्ति देखावी सदा ती ज्यां असे वांछा । तया नेत्रांचिया दैवीं असावे अश्रु ईशेच्छा । नच चुकवे कवणाही ॥ २ ॥

पण किती मी आपल्पोटी! त्यांचें मन इतकें क्षुब्ध होऊनही मी आपणाविषयींच विचार करीत बसल्यें आहें. हे भगवंता,

कालंगडा—दादरा.

अति करुण शरण कवण तुजसमान । नितान्त शांति दे प्रिया । तद्रवन करिं तदुपरि धरिं कर महान् ॥ ध्रु० ॥ करिं तयासि सौख्यवान् । पसरिं निज कृपावितान । देइं हें वरप्रदान । तूं अनुकंपानिधान ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

प्रवेश ९ वा.

(मालिनी प्रवेश करिते.)

मा०—(मनांत) आज वीरसेनमहाराजांची स्वारी शालिनीची भेट घेण्याकरितां इथे येणार आहे, हें ऐकून किती बिचारी घाबरून गेली. आणि खरेंच, कां घाबरणार नाहीं! त्यांनीं ही मोहीम मुद्दाम तिच्याकरितां केली. आपले उत्तम उत्तम मोहरे तिच्याकरितां बळी दिले. आतां ते या राज्याचे आणि आह्मां सर्वांचे मालक आहेत; करितील ती पूर्व दिशा. मग शालिनीशीं विवाह करावयाचा असें त्यांच्या मनांत असलें, आणि गोडीगुलाबीनें नाहीं जुळलें तर जबरीनें लग्न केल्या-

शिवाय ते सोडतील ? देवा, काय आमचें बायकांचें हें नशीब ! शालिनीच्या स्थितीचा मनांत विचार आला की बाई अंगावर कांटा उभा राहतो ! वाटतें, नको हा जळ्ळ जन्म. पण नशीबीं असतील तितके सोहळे व्हायला हवेत ना ? शालिनीचें दुःख माझ्यानें बघवेना ह्मणून मीच शालिनी असें दाखवून मी आज वीरसेन महाराजांचें मन ओढून घेण्याचा यत्न करणार आहें. जन्मांतला हा पहिलाच खोटें करण्याचा प्रसंग, ह्मणून बाई मन कचरतें. पण कचरून उपयोग काय ? यांत यश आलें तरच शालिनीला तरणोपाय आहे.

भैरवी-त्रिवट.

वेत हाच झाला अंतीं । अन्य ना गति । हे
सुरवर हर कर शिरिं धरिं खरि करिं सफल
कृति ॥ ध्रु० ॥ प्रेमानें पूरित हृदयसर जिचें
पूर्ण असे मज विदित खरें । प्रतिबंधा पाहुनि
प्रेम तिचें मृदु हृदया भेदिल असुखभरें ॥ १ ॥
मम बालपणापासुनि वागविलें मज जीवाहुनि
अधिक जिनें । उपकारांची जरि फेड तिच्या
नच होई तरि हें विफल जिणें ॥ २ ॥

त्यांची येण्याची वेळ झाली वाटतें. माझ्या सर्वांगाला तर बाई कांपरें सुटू लागलें आहे. कसें होईल कोण जाणे. देवा माझी भीति नाहींशी कर. आणि मला धीर व उत्साह दे. अग बाई ! पण हे पहा ते आले.

यमन-धुमाळी.

प्रसन्न सुंदर प्रशांत मुद्रा पाहुनियां ही सौज-

न्याहूं । उल्लसिता मम वृत्ति समुद्रा भरति जशी ये निरखुनि चंद्रा ॥ ध्रु० ॥ अलकपंक्ति शोभवी हरिद्रा-गौर मुखेंदुसि घनसम सांद्रा। स्तब्ध लुब्ध मम दृष्टि सुमंद्रा झाली देखुनि या राजेंद्रा ॥ १ ॥

बा: ग वेडे मालिनि, यांनाच का तू इतकी भीत होतीस ? तुझें नशीब, ह्मणून ही मदनमूर्ति आज तुला पहावयाला मिळाली, समजलीस ! तूं कशाला भीत होतीस नाहीं ? समज आज यांची मर्जी तुझ्यावर सुप्रसन्न झाली, आणि यांनीं तुझा स्वीकार केला, तर त्यांत तुझें मोठेंच वाईट होणार, नाहीं ! अग बाई, पण मीं अजून एक शब्दही ऐकिला नाहीं तोंच हे विचार काय कामाचे ! शालिनी आमची कृष्णाला भीत नाहीं हें सगळ्यांना ठाऊक आहे. तेव्हां मला सुद्धां आतां भीटपणाचा आव घातला पाहिजे.

वीरसेन—(येऊन मनांत) अहाहा ! काय हें सौंदर्य ! हीच राजकन्या शालिनी वाटतें.

मा०—महाराज, आपण आपली वाट चुकलांत कीं काय ? दरबारची जागा इकडे नाहीं. आपण कोणाकडे आलांत ?

वी०—मी वाट चुकलों ! चुकलों तर त्यांत पश्चात्ताप मानण्याला काय कारण आहे ? त्यामुळें तरी आज मला राजकन्या शालिनीचा मुखचंद्रमा पहावयाला मिळाला.

मा०—पण आपण आलां कोणाकडे ह्मणून मीं विचारलें ना ! त्याला कांहींच उत्तर नाहीं.

वी०—शालिनि, तुला कांहींच माहीत नाहीं असें तूं दाखवितेस हें काय बरें ? अग तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाची भेट घ्यावयाला मी येथें येऊं !

मा०—आपण कोण आहां तें कळेल का ?

वी०—(मनांत) हिला ठाऊक असून ही नाहींसें दाखविते. ठीक आहे. (मोठ्यानें) मी ? तुझा दासानुदास.

मा०—याचा नाहीं बाई मला अर्थ समजत. बरें, आपण असतां कोणीकडे ?

वी०—हल्लीं मी आहें तुझ्या अवकृपेंत. पण तें वास्तव्य बदलावें ह्मणून आज तुझ्या चरणांपाशीं आलों आहें. दया कर, आणि तुझ्या हृदयांत निरंतर वास करण्याचा माझा संकल्प तडीला ने.

मा०—आपलें नांव तरी काय ?

वी०—(मनांत) हिला खरोखरच माहीत नाहीं वाटतें. (मोठ्यानें) मला वीरसेन ह्मणतात.

मा०—खरेंच कीं काय ! हें काय बाई मला ठाऊक ! पण महाराज,

पिलु—धुमाळी.

तिळहि उचित नच गमत क्वचित नरवर अ-
वचित या स्थलिं येणें । तुह्मां लाहो किति
घडलाहो पाहोंया मजला येणें ॥ ध्रु० ॥ र-
णिचा थाट असिचा खणणाट रणरव घनदाट
न इथें आणे । हें अंतःपुर भरलें नूपुरकंकण-
मंजुलनादानें ॥ १ ॥

वी०—याचा मजकडे काय दोष ?

देस—दादरा.

दोष मजसि कावुनि मनिं रोष करिं न भा-
मिनि ॥ प्रीतिबद्ध मदनविद्ध काय करिल

शालिनि ॥ ध्रु० ॥ होय काय निःसहाय दीन शशिविकासिनी ॥ कोपपात्र लेशमात्र चारु-गात्रि कमलिनी ॥ १ ॥

मा०—इतकें आपल्याला प्रीतिबद्ध कोणीं करून टाकिलें ?

वी०—अग, तुझ्याशिवाय दुसरी कोण समर्थ आहे ?

मा०—वा', माझी आपली आतांपर्यंत दृष्टभेट सुद्धां नाहीं. आणि हें काय बोलणें ?

वी०—शालिनि, तुझ्या सौंदर्याची कीर्ति सर्व जगभर पसरलेली आहे हें तूं विसरतेस शिवाय तुझें चित्र मला एकदां पहावयाला मिळालें, तेव्हा पासून तर तुझें प्रत्यक्ष दर्शन घेण्याची मला अनोनात उत्कटा उत्पन्न झाली होती, पण मला असें वाटतें कीं चित्रकार कितीही कुशल असला तरी विधात्याची सर त्याला कधीही येणार नाहीं शालिनि, आपण लहानपणीं एके ठिकाणीं होतों, तुला आठवत नाहीं का ?

मा०—(मनांत) त्या वेळीं बहुतकरून माझा जन्महि झाला नसेल. (उघड) थोडें थोडें आठवतें पण ह्मणून काय झालें ? आपल्या प्रेमाची आठवण अशा रीतीनें का द्यायची ?

कापी-धुमाळी.

आजवरी बहु क्षत्रियकन्या ॥ परिणियल्या नृपसुतांनि अन्या ॥ परि नव रीती ही बहु-मान्या ॥ मिळालि कवणा कधिं न पहाण्या ॥ ध्रु० ॥ भूमि आमुची विजन अरण्यासमही झालि विपुलधनधान्या ॥ यासि शालिनी हीच वरेण्या कारण झाली काय अधन्या ॥ १ ॥

वी०—शालिनि, या सर्व गोष्टींचा उलगडा मीं प्रकोपमहाराजां-पाशीं केला आहे. मग तर तुझा राग नाहीं ना ?

मा०—पण मला सांगायाला काय हरकत आहे ?

वी०—सांगतों पाहिजे तर. (कानांत सांगतो.) समजलें ?

मा०—आतां न समजायला काय झालें ? तो मेला शुंभसेन इतका दुष्ट असेल हें मला माहीत सुद्धां नव्हतें.

वी०—शालिनि, आतां तरी तुझ्या मनांतलें काळेंबेरें गेलें का ? आतां तरी या दासाचा तू स्वीकार करशील का ?

मा०—हें काय बाई उलटें बोलणें ? स्वीकार कुणीं, मीं करायचा ?

वी०—शालिनि, तुझें मन तुझ्या स्वाधीन नाहीं असें प्रकोपमहाराजांनीं सांगितल्यापासून माझें मन अतिशय उद्विग्न झालें होतें मग त्यांचा समज चुकीचा होताना ?

मा०—असेल.

वी०—शालिनि, असें संदिग्ध बोलून मला संशयांत ठेवूं नकोस काय माझ्या नशिबीं आहे तें मला एकदां स्पष्ट सांग. माझी कींव अजून तुला येत नाहीं का ? अजून स्तब्धच ? या मौनावरून मी काय समजूं ?

मा०—मला बाई नेहमीं तेंच तेंच बोलतां येत नाहीं. एकदां सांगतें मीं कांहीं बाबांच्या आज्ञेबाहेर नाहीं.

वी०—शालिनि, तू या वेळीं मला जन्माचा सुखी करून टाकिलेस. (तिला आलिंगन देऊन) हें पहा माझें अंतःकरण आनंदानें कसें स्फुरण पावत आहे.

भैरवी-त्रिवट.

मुख उचलोनी पाहोनी ॥ मुख उचलोनि
दोनि करिं करिं परिवृत मज मीड सोड

ओढि पाणि ॥ ध्रु० ॥ मज्जन देई कज्जलघन-
युतलज्जितलोचनशशिशुभकिरणीं ॥ १ ॥
अपांगदृष्ट्या पांग फेडि या नयनांचें धवलांगि
मम झणी ॥ २ ॥

मा०—प्रिया, आपली प्रीति मजवरच आहे ना?

वी०—म्हणजे? तुजवर नाहीं तर दुसऱ्या कोणावर असणार?

मा०—तसें नाहीं. मला वाटलें कीं शालिनी या नांवावरच कदाचित् आपण लुब्ध असाल.

वी०—छेः छेः! काय ही शंका! शालिनि, तसें असतें तर शालिनी, शालिनी असा गजर करून मीं कालक्रमणा केली असती? तुझ्या नांवाला जो मान आहे तो केवळ तुजमुळेंच. अहाहा! काय सांगूं तुला?

भैरवी—त्रिवट.

हरिलें मन्मन तव सुमुखानें ॥ चातुर्यानें अति
विनयानें ॥ गुणगणमंडितयुवतीदानें ॥ उप-
कारी केलें मज विधिनें ॥ ध्रु० ॥

मा०—जगदीश्वरची या मम जाणे ॥ हृदया
सहिता सुप्रेमानें ॥

मा० व वी०—राहूं मिळुनी आनंदानें ॥ हे
देवा चक्रगदापाणे ॥ प्रीतिच्छेद कधीं का-
ळानें ॥ होवो नच तव प्रसादानें ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

(शुभसेन एकटाच प्रवेश करितो.)

शुं०—(रागानें) (मनांत) अंगाचा कसा तिळपापड होऊन गेला आहे. कांहीं सुचत नाहीं. वीरसेन व शूरसेन हे कसे आमच्या राजाच्या गळ्यांतील ताईत होऊन बसले आहेत. हा म्हातारा म्हटला म्हणजे शुद्ध बैल आहे. दोन शिंगेंच काय तीं कमी. फत्तेसिंगाच्या माहितीवरून असें दिसतें कीं वीरसेनानें राजाच्या धाकट्या मुलीकडे वळण बांधिलें आहे. इकडे शालिनी तर शूरसेनावर अगदीं फिदा होऊन गेली आहे. हा शूरसेन एकपत्नीव्रताबद्दल फार घमेंड मारीत असतो म्हणतात. पण वडील मुलीच्या नवऱ्यास राज्य मिळेल अशी आशा दिसूं लागतांच ते राजश्री तें सर्व विसरले तर? त्याचा मुलगा तर काय! विचारूच नका. त्याच्या बापाला आणि त्याला स्वर्ग काय तो दोन बोटेंच उरला आहे. बरें म्हणावें, बच्चाजी, तें दोन बोटांचें अंतर सुद्धां मी तरवारीनें नाहींसें करून टाकितों, आणि तुम्हांला स्वर्गप्राप्तिच करून देतों. आपल्या बेताच्या आड काय तो एकटा शूरसेन आहे, त्याला प्रथम दृष्टिआड केलें पाहिजे. म्हणजे मग शालिनीची प्राप्ति होण्याला काय उशीर?

झिंजोटी—दादरा.

दुजा न मनिं विचार ॥ करोनीयां पारख त-
याळागीं गारद् करीन न आइन हार ॥ वचा

करोनीयां ठार ॥ तद्धेतुशनावरि एकाकि सत्वरि घालिन आजि कुठार ॥ १ ॥

त्याला एकदां यमसदनाला पाठविला कीं मग इहलोकच्या सर्व सुखाची किल्ली माझ्याच हातीं कारण आमच्या महाराजांचें मन पतंगाप्रमाणें आहे. हवें तेव्हां खेंचून मजकडे आणितां येईल

झिंजोटी–दादरा.

सुरूपशालिनी ॥ सौंदर्यमालिनी ॥ नृपात्मजा प्रिया निजा करीन गेहिनी ॥ सुखी दुजा कुणी ॥ न अधिक मजहुनी ॥ बहु विलास करिन खास मी निशीदिनीं ॥ नृपकुलाग्रणी ॥ या भूमिचा धनी ॥ सदा सदा बसेन होउनी ॥ १ ॥

इतकें आल्यावर मग वीरसेनाचा व त्याच्या नगरीचा समाचार घेण्याला काय उशीर !

झिंजोटी–यमन–धुमाळी

मस्त रिपूसी ग्रस्त करुनि मग फस्त करीन समस्त पुरी। दुष्ट हृदय अतिनष्ट चिरुनि बलि अष्ट दिशा देईन करी। कधीं नसे कोप वृथा। कधीं नसे स्वाधीन करुनि कुधीप्रति तद्भ्रम दूर करीं ॥ १ ॥

हें कार्य जुळवून आणण्याला कोणाची बरें मदत घ्यावी ? फत्तेसिंग आपल्या चांगला कामीं पडेल. त्याला पाहिजे द्रव्य. तें आपल्यापाशी भरपूर आहे. बस्स जुळलें. आतां त्याच उद्योगाला लागावें (जातो).

प्रवेश २ रा.

(तरला व सुवर्णमालिनी)

तरला—कोण ग होता तो ? आपलें अंग चोरून पळून गेला तो?

सुवर्णमालिनी—कुठें ? कोण ? हो एकीकडे, मला शालिनी-बाईकडे जायचें आहे.

त०—हो का ? मीही येतें तुझ्याबरोबर आणि बाईसाहेबांना सगळी खरीखुरी हकीकत सांगतें.

सु०—(घाबरून मनांत) अगबाई ! या सटवीनें ऐकिलें वाटतें सगळें. असें कांहीं असलें म्हणजे टेवलेली. (उघड) गडे, तूं माझ्या जिवाची सखी ना ?

त०—सुवर्णमालिनि, तूं सुद्धां अगदीं माझी बाळपणची मैत्रीण ना ?

सु०—बरें, मग काय म्हणतेस ?

त०—फत्तेसिंग काय काय म्हणत होते ?

सु०—अग दुसरें काय म्हणणार ? पुरुषच ते. माझें प्रेम तुझ्यावर आहे दुसरीवर नाहीं हाच लघळपणा सारखा चालायचा.

त०—बाईसाहेब, अशानें आपली सुटका व्हायची नाहीं. या छक्केपंजांना मी बधणारी नाहीं. मी तरला आहें तरला. आज रात्रीं चार घटका, असें ते काय म्हणाले ?

सु०—(मनांत) सटवीनें अगदीं मुळापासून ऐकिलें वाटतें.

त०—बाईसाहेब, कसला विचार चालला आहे ? दुसरी एखादी लोणकढी द्यायची असेल मनांतून झालें. पण आतां अशी अळंटळं चालायची नाहीं, सांगून ठेवतें.

सु०—गडे, तुझ्यापासून का चोरून ठेवायचें? मग मैत्रिणी त्या इच्यान कशाला?

स०—(मनांत) अहाहा! खरेंच ह्मणेल कोणी!

सु०—ते ह्मणाले आज रात्रीं चार घटकांच्या सुमाराला कांहीं शिपाई अरण्यांत मिळायचे आहेत. (मनांत) बकुलच्या पत्राविषयीं सांगूंच नये ह्मणजे झालें. तें इला माहीत नाहींसें दिसतें.

स०—(मनांत) अजून बया सरळ बोलत नाहीं. इची आणि फत्तेसिंगाची आज रात्रीं भेट होण्याचें ठरलेलें दिसतें. (उघड) गडे, आतां कसें खरें सांगितलेंस तें? आतां जा इवी तिकडे. (सुवर्णमालिनी जाते.) (स्वत:शीं) आज बरेच दिवस मला इची खोड मोडायची आहे. आज बरी संधि सांपडली आहे आयती. आतां हें सगळें शालिनीबाईसाहेबांना कळवावें जाऊन. जर शिपाई खरेच जमणार असतील तर फत्तेसिंगाची चांगली खोड मोडल्यासारखी होईल. फार दिवस त्यांनीं मला वाळवण्या दाखविल्या, आणि शेवटीं माझ्या वैरिणीचा अंगीकार केला. जर ते जमणार नसतील तर सुवर्णमालिनीची पुरी फजीती उडेल. (जाते.)

प्रवेश ३ रा.

(शुंभसेन व फत्तेसिंग कांहीं शिपायांनिशीं येतात.)

शुं०—हं, बसा या ठिकाणीं आतां. ही वेळ आणि हें ठिकाण किती शांत आहेत! जगाच्या प्रळयानंतर जशी शांतता होईल तशीच या वेळींही चोहोंकडे आहे.

फत्तेसिंग—(स्वत:शीं) दुष्ट मनाच्या खळबळण्याशिवाय सर्व स्वस्थ आहे.

शुं०—अंधार तरी किती काळाठिकर पडला आहे!

फ०—(मनांत) त्याच्या कृष्णत्वास योग्य उपमा सुचली म्हणजे तुमचें हृदय किंवा आज रात्रीं होणारें भयंकर कर्म.

शुं०—छे बोवा. असा अंधार आपण साऱ्या जन्मांत पाहिला नाहीं. डोळे असून अंधळ्यासारखेच झालों आहोंत. मघाशीं माझ्या तोंडासमोर चिलटें घोंगावत होतीं तीं दूर करण्याकरितां म्हणून मीं जी त्यांना एक थापड मारली ती माझ्याच तोंडांत बसली.

फ०—तसेंच, मघाशीं मीं कांहींसें काढावयाकरितां म्हणून स्वतःच्या खिशांत हात घालावयास गेलों तों तो हात तुमच्याच खिशांत शिरला.

शुं०—अरे वेड्या, माझ्या खिशांतील मोहरा चोरण्यास वाटतें. बरें, तें असो. तुझें सर्व कौशल्य आज दाखविलें पाहिजे. (कुजबुजूं लागतो.)

शालिनी (प्रवेश करून)—(मनांत) माझें मन अनेक संशयांनीं भरून गेलें आहे. हें माझें हृदय तर इतक्या जोरानें उडूं लागलें आहे कीं त्याचें धडधडणें ऐकूं जाऊन माझें लपण्याचें स्थान शुंभसेनाला कळेल कीं काय अशी भीति वाटते. ते या अरण्यांत या वेळेस येत असतात हें त्या दुष्टाला ठाऊक आहे. आणि त्या मेल्याचें मन माझ्या प्रियकराविषयीं कांहीं शुद्ध नाहीं. या सर्वांस कारण ही मी अभागीण. सर्वांची भीति सोडून मी गुप्तपणानें इथें आलें त्याचा कांहीं उपयोग होवो म्हणजे झालें. (लपून उभी राहते.)

शुं०—कां? मग ठरलेंना त्याला मारावयाचें?

शा०—(मनांत) त्याला म्हणजे कोणाला असावें बरें?

फ०—खरें म्हणाल तर हें कर्म करण्यास माझे हातच वहात नाहींत, ते कसे जड झाले आहेत.

शुं०—भारी भारी सोन्याची कडीं हातांत घातलीं ह्मणजे ते ह-लके होतील कीं नाहीं ?

फ०—होतील खरें. पण जों जों मी निश्चय करतों तों तों माझी मनोदेवता टचक खाऊन मला हें काम करूं नकोस असें सांगते.

शुं०—सोन्याच्या ढिगाचें तुझ्या मनोदेवतेवर दडपण घातलें कीं मग तरी ती खालीं बसेल ?

फ०—असें ह्मणतां ? बरें, मग त्या शूरसेनाला मारावयाचें म-जकडे लागलें. (शालिनी घाबरते).

शुं०—(मनांत) काय पहा सोन्याचा गुण आहे ! स्वतः पिवळें असून लोकांचीं मनें मात्र कोळशापेक्षांही काळीं करितें. बरें तर तें कसकसें करावयाचें तें तुला सांगतों. (कुजबुजूं लागतो.)

शा०—(मनांत) देवा, ज्यांचें मन अगदीं निर्मळ, करणी काहीइतकी कधीं वावगी नाहीं, त्यांच्यावर या दुष्टांचा कां बरें दांत असावा ! त्यांनीं यांचा काय अपराध केला ! पण हे बोलून चालून दुष्ट लोक. यांना कारण कशाला हवें ! जीव जातांना मनुष्य ओरडतो कसा हें पहाण्याकरितांच मेले एखाद्याचा जीव घ्यायचे. आतां मला आपलें सगळें अवसान आणिलें पाहिजे. हें भयंकर कर्म कोणत्या वेळेस व कोणत्या ठिकाणीं होण्याचें ठरलें आहे तें ऐकूं.

शुं०—याच अरण्यांत त्याच्या बायकोचें पूर्वीचें घर आहे. त्या ठिकाणीं तो विश्रांतीसाठीं ह्मणून जात असतो, व तो त्या ठिकाणीं या वेळीं बसलाही असेल. तुह्मां सर्वांना तें स्थान ठाऊक असेलच. ज-वळ एक झरा वहात आहे, भोंवतालीं दाट आमराई आहे.

फ०—वा: असें रमणीय स्थान आह्मी विसरूं कसें ?

शुं०—त्या ठिकाणीं त्याची आणि त्याच्या बायकोची लग्न होण्या-

चीं प्रथम मुलाखत झाली; त्या ठिकाणीं त्या दोघांनीं अनेक दिवस आनंदांत घालविले. ती बिचारी साध्वी परलोकीं गेल्यावर या ठिकाणीं त्याची प्रीति प्रथम आपल्या राजकन्येवर जडली. म्हणून याच ठिकाणीं त्याला त्याच्या उद्धटपणाचें प्रायश्चित्त आपण दिलें पाहिजे. आतां कोणीं कोणत्या बाजूनें जाऊन त्याजवर हल्ला करावयाचा तें सर्व तुमच्या कानांत सांगतों. कारण तो मोठा धीट व शूर आहे. व आपण एकदम छापा घातला नाहीं तर त्याच्यापुढें इतक्या जणांचेंही कांहीं चालणार नाहीं. (कुजबुजूं लागतो.)

शा०—(मनांत) आज मला देवानेंच येथें मुद्दाम पाठवून दिलें. अहाहा ! माझ्या प्रियकराचा प्राण मी आतां खास वांचविणार ! हें मेलें शरीर त्याच्या थोडें जरी उपयोगीं पडलें तरी मला किती आनंद होईल !

झिंजोटी-त्रिवट.

सचिंतची निष्फल माझे प्राण । अशा हतभागिनीचे ॥ ध्रु० ॥ उदारचरिता प्रिय नाथाचें करीन आजी त्राण ॥ १ ॥

(निघून जाते.)

फ०—हं समजलों. बेत तर एखाद्या मोठ्या धुरंधर वीराप्रमाणें जमवून आणला आहे खरा.

शुं०—आतां माझी दुसरी एक कामगिरी तूं केली पाहिजे. या कामगिरीत तुझ्या साथ्यांची कांहीं जरूर नाहीं.

फ०—कां बरें ?

शुं०—(मनांत) इतक्यांतच ती गोष्ट फोडून उपयोग नाहीं. (मोठ्यानें) कारण विचारतोस होय ? अरे, कारण दुसरें काय असणार ? या कामगिरींत फार मनुष्यांचें काम नाहीं. मग उगीचच्या

उगीच तिसऱ्याच्या कानांवर ही गोष्ट घालण्यांत काय तात्पर्य आहे ? ह्मणतात कीं नाहीं, "मंत्र षट्कर्णी झाला कीं तो फुटलाच." बाकी तुझ्याजवळ सुद्धां ती गोष्ट काढण्याला मला भीतिच वाटते.

फ०—ह्मणजे ? माझ्यावर तुमचा विश्वास नाहीं का ?

शुं०—छे: रे, तसें नाहीं. (हसून) तुला एकट्याला सांगून सुद्धां सहा कानांत मंत्र सांगितल्याचा दोष झालाच कीं.

फ०—ह्मणजे ! आपणां दोघांत मिळून सहा कान आहेत कीं काय ?

शुं०—अरे हो. इकडे पहा. माझे दोन. आणि तुझे—

फ०—माझे बाकीचे चार कीं काय ?

शुं०—तसें नव्हे. तुझे दोन कान इतके लांब आहेत कीं ते सहज चार कानांची बरोबरी करितील.

फ०—अस्सें. एकूण मी लंबकर्ण आहें असा तुमचा भावार्थ ? बरें पण आपलें दुसरें काम कळूंद्या.

शुं०—तें मी करीन असें तूं प्रथम मला वचन दिलें पाहिजे.

फ०—वा: प्रथम वचन आणि नंतर कामगिरी कळवयाची ! हा कसा उलट न्याय ? बरें हें घ्या वचन (हातावर हात मारतो).

शुं०—ऐक तर मग. त्या शूरसेनाच्या मुलगा तूं पाहिला असशीलच.

फ०—हो हो, हें काय विचारतां ? आपल्या लोकांची पळापळ सुरू झाली तेव्हां विजेप्रमाणें चमकत होता तोच वीरतनय ना ?

शुं०—(त्रासानें) होय, तोच कारटा.

फ०—ज्यानें तुमचे प्राण औदार्यानें वांचविले तोच ?

शुं०—कशाला उगीच त्या पोरट्याची प्रतिष्ठा वाढवतो आहेस ?

फ०—बरें तुमचें जर पित्त खवळत असेल तर मी तो विषय सोडून देतों. पण त्याचा आणि ह्या कामगिरीचा काय संबंध ?

शुं०—संबंध काय विचारितोस? या अरण्यांत तो आज कोणा-सही बरोबर न घेतां येणार आहे. तर त्याच्या बापाला मारिल्यावर त्याला गांठून त्याचें—

फ०—सांत्वन करावयाचें येवढेंचना? तें माझें काम

शुं०—छे, छे गर्दन उडवावयाचें.

फ०—(आश्चर्यानें) काय? ह्मणतो तरी काय?

शुं०—दुसरें तिसरें कांहीं नाहीं. त्या कारट्याला बापाबरोबर निजधामास पाठवावयाचें

फ०—(तिरस्कारानें) वहावारे मर्दपणा! ईश्वर सांगतों तुह्मी नीचांतले नीच आहांत

शुं०—मी जर तसा असेन तर तूं सुद्धां नीचांतला नीच आहेस.

फ०—बरें तर. आपले बेत आपल्यापाशींच असूंद्या. माझा तु-मचा कांहीं संबध नाहीं हा पहा मी चाललों. (जाऊं लागतो.)

शुं०—(मनांत) रागाच्या सपाट्यांत मोटी डोबळ चूक झाली. (फत्तेसिंगास धरतो) फत्तेसिंग, हा काय वेडेपणा? मीं तुला नीच ह्मटलें ह्मणून रागावलास कीं काय?

फ०—रागानू कशाला? मीं तुह्मांला नीच ह्मटलें, व त्या श-ब्दाचा प्रतिध्वनि तुमच्या दगडासारख्या कठिण हृदयामुळें झाला, यांत रागावण्यासारखें काय आहे?

शुं०—असा बेफाम होऊन जाऊं नकोस.

फ०—बेफाम होऊन जाऊं नको तर काय करूं? अहो तें सो-न्यासारखें मूल. आणि त्याला मारावयास तुह्मी मला सांगतां?

शुं०—(मनांत) वेड्याच्या उपमाही सोन्याच्याच.

फ०—त्याला पहातांच साक्षात् मृत्यूच्या हृदयालाही पाझर फुटेल; मग मी तर काय मनुष्यच आहें.

शुं०—मनुष्य आहेस खरा. पण इतर मनुष्यांप्रमाणें तूं कांहीं वे-डगळ नाहींस. आपलें हित कशांत आहे हें सर्व तुला चांगलें माहीत आहे. तुला आणखी एक गोष्ट सांगतों. हें काम जर तूं चांगलें ब-जाविलेंस तर तुला सुभेदारी देण्याचें माझ्या हातांत आहे.

फ०—जळो ती सुभेदारी व ते तुमचे वेत. तुम्हांला मी अगदीं पाषाणहृदयी वाटतों ?

शुं०—(मनांत) आतां काय करावें याच्या मूर्खपणाला ? (उघड) तसेंच तुला बक्षीसही बरेंच मिळेल. तू अगदीं सोन्यारुप्यांत लोळू लागशील.

फ०—आणि पातकांतही लोळूं लागेन. मग त्या सर्वसाक्षी पर मेश्वराजवळ मी काय सांगूं ?

शुं०—असें सांग कीं शुंभसेनानें मला सांगितलें म्हणून मीं हें काम केलें. अरे वेड्या, कुठला देव घेऊन बसला आहेस·आणि आहे काय ? त्या मुलाला मारशील तर त्याच्या रक्ताच्या थेंबागणिक मोहरा तुला देईन.

फ०—(मनांत) ही आशा मोठी वाईट आहे. (उघड) काय म्हणतां ? मला रक्ताच्या थेंबागणिक मोहरा याल ?

शुं०—यांत काय संशय ? आणि एकही अश्रु डोळ्यांत न आ-णितां हें काम करिशील तर त्याच्या दुप्पट.

फ०—खरें कीं काय ?

शुं०—खरें म्हणजे खरेंच. आणि त्याच्या जोडीला सेनापतीची जागाही तुला देण्यांत येईल.

फ०—मग जरा थांबा. मला विचार करूंद्या. (स्वतःशीं) हें काम सकृद्दर्शनीं वाटतें तितकें वाईट नाहीं. तो धडधडीत शत्रूचा मुलगा. त्याला ठार मारण्याला काय चिंता आहे ? शिवाय त्यानें आ-

मच्या महाराजांचा पराजय करून अपमानच केला म्हणावयाचा. त्याचा सूड घेण्यांत पाप कसलें ? उत्कट पुण्य आहे. (चिंतन करितो.)

शुं०—(मनांत) मला खास वाटतें कीं सोन्याच्या आणि न्याय-बुद्धीच्या या युद्धामध्यें सोन्याची सरशी होणार. आतां आपणच ज-रासें ओढून चढबळ आणावें.

फ०—(मोठ्यानें) हं शुंभसेन. माझा विचार ठरला.

शुं०—काय ठरला बोवा ! बोल पाहूं.

फ०—कीं हें काम करणें कांहीं वाईट नाहीं.

शुं०—पण मीं सुद्धां विचार करून ठरविलें आहे कीं हें भयंकर कर्म करूं नये.

फ०—असें कां बरें !

शुं०—अरे, तें सोन्यासारखें मूल. त्याला कसें मारावें ?

फ०—अं:, त्यांत काय आहे ! डोळे मिटून त्याला मारावें म्हणजे झालें.

शुं०—अरे, साक्षात मृत्यूच्या हृदयालाही पाझर फुटेल, मग मी तर काय मनुष्य आहें.

फ०—तें खरें. पण तसें केल्यानें स्वामिभक्ति बजाविल्यासारखी होईल. या वेळीं मन घट्टच केलें पाहिजे.

शुं०—जळो ती स्वामिभक्ति आणि हा आपला दुष्ट निश्चय.

फ०—महाराज, उगीच या गरीबाची थट्टा कशाला करितां ? शि-वाय येथेंच बोलत बसल्यानें चंद्रोदय होऊन आपला बेत फसण्याचा संभव आहे.

शुं०—ठीक आहे. मग चला जाऊंया. मात्र पावलें न वाजवितां आणि एकही शब्द न उच्चारितां चला माझ्या पाठीमागून. (जातात.)

प्रवेश ४ था.

(नंतर शूरसेन प्रवेश करितो.)

शूरसेन—(मनांत) अहाहा ! या शांत वेळीं मला या ठिकाणीं काय सुख वाटत आहे ! नगरामध्यें विलासी लोक या वेळीं नाचगाण्याच्या रंगांत मग्न झालेले असतील. परंतु मला आतां त्याची बिलकुल गोडी राहिली नाहीं. या जगांतलें सर्वच सुख मला आतां तुच्छ वाटतें. माझ्या प्रियेची मूर्ति नेहमीं मनांत वागविणें, तिच्या गुणांचें चिंतन करीत बसणें, ती परलोकीं किती सुखांत असेल याचा विचार करणें, या गोष्टींनच मला आतां अतिशय सुख वाटतें. त्याबरोबरच इहलोकीं नाहीं, तर परलोकीं तरी मला तिचा निरंतर सहवास खास घडणार, हा विचार मनांत आला कीं माझ्या सुखाची परमावधि होऊन जाते. तो शहरचा गोंगाट मला बिलकुल सहन करवत नाहीं. पण या ठिकाणीं माझें मन कसें शांत असतें. म्हणून काम संपलें कीं नेहमीं मनुष्याच्या सहवासापासून मला दूर पळून यावेंसें वाटतें.

शालिनी—(प्रवेश करून) महाराज, पळा, पळा लवकर.

शू०—(मनांत) अरे हा काय चमत्कार ! माझ्या मनांतील विचार ओळखून माझ्या प्रियेची ही आकाशवाणी झाली कीं काय ? छेः, पण माझा तर्क चुकला. स्वरावरून ही तर ती उदार व सुंदर राजकन्या असावीशी वाटतें. शालिनि, अशा रात्रीच्या वेळीं तुझ्यासारख्या कुलीन राजकन्येला अशा निर्जन वनांत एकटें येणें शोभतें का ?

शा०—महाराज, कोणताही वाईट हेतु धरून मी आलें नाहीं. तसाच प्रसंग पडला म्हणून मला एकटीला यावें लागलें. आपलें मन वळविण्याकरितां आलें अशी आपल्याला शंका असेल तर ती खरी नाहीं. ती आशा मीं केव्हांच सोडून दिली. अजून माझें करणें आ-

पल्याला वावगें वाटत असेल तर मला आपण क्षमा करावी. ही आ-पली व माझी शेवटचीच— (रडूं लागते.)

शू०—(मनांत) अरे अरे ! विचारीची दया येते. (उघड) शालिनि, उगी रहा. तुझ्यासारख्या शूर स्त्रिलेला शोक शोभतो का?

कालंगडा- त्रिवट.

धरिं अवरुनि झडकरि शोक हा । श्रवण न करवत करुण वचन तव होई मन शतधा अहा ॥ ध्रु० ॥ तुजहुनि देखिल हतभागी जन दीन समीप उभा पहा । दुःखमया ही जगती सारी लघु सुख संकट तें महा ॥ १ ॥

शा०—आपल्या प्रेमाला मी मुळींच योग्य नाहीं. पण जर आ-पल्या मनांत माझ्याविषयीं यत्किंचित प्रेम असेल तर दया करून ये-थून निघून जा आणि मी हें कां ह्मणतें तें मला विचारूं नका. (शूर-सेन चकित होतो. (मनांत) ही पहा त्यांची चाहूल ऐकूं येऊं लागली. (उघड) महाराज, वेळ लावूं नका. जलदीनें निघून जाऊन प्राण वांचवा.

शू०—पळून मी आपला प्राण वांचवूं ! शालिनि, तूं स्वप्नांत आ-हेस ह्मणून मला असा उपदेश करितेस. ज्यानें त्या भयंकर वाघाला एका क्षणांत प्रेत करून सोडिलें तोच हा शूरसेन हें तूं विसरलीस वा-टतें ! हे समजलों. या ठिकाणीं कोणी तरी मजवर छापा घालणार असेल. अग भित्र्ये, मग अशी भितेस कां ?

बिलावर–झंपा.

रणीं एक येवो पुरें सैन्य किंवा । भीति नच

गमत तो मृत्यु बरवा ॥ ध्रु० ॥ दावि मज
धीट तो । मद्वधा चिंतितो । वद्व संनिध सदा
नच असतां । भीति कां होसि कातर मनीं
व्यग्र कां । ममहि विक्रम नसे काय ठावा ॥ १ ॥

(तरवार हातीं घेतो.)

शा०—(मनांत) शौर्याबद्दल खात्री आहे. पण प्रेमामुळें शंका वाटते.

शू०—शालिनि, दाखीव लवकर ते लोक कुठें आहेत ते. आतां तुझी भीति त्यास नेतों पहा.

शा०—स्वत:चा प्राण वांचवा, ह्मणून मीं आपणास सांगितलें नाहीं, राजवाड्यांत चोहोंकडे स्वारच स्वार होऊन गेले आहेत. आपल्या मित्राचा व मुलाचा प्राण वांचवा ह्मणून सांगण्याकरितां मी इतक्या घाईनें येथें धांवत आलें.

शू०—(घाबरून) काय ह्मणतेस ? राजवाड्यांत कत्तल चालली आहे ? नारायणा, मी तेथें पोंहचेपर्यंत सर्वांचें आपल्या प्रबल हस्तानें पालन कर. शालिनि, तूं माझ्या मागोमाग चल. (जोरानें निघून जातो.)

शा०—(स्वत:शीं) मी जर येथून निघून गेलें तर या दुष्टांना संशय येऊन ते माझ्या प्रियकराचा पाठलाग करितील. तर आतां याच ठिकाणीं मरणाची वाट पहात बसावें हें चांगलें. बाई प्रीतिदेवते ! तुझ्या चरणीं मी आज आपल्या प्राणांची आहुति देत आहें, ती ग्रहण करून संतुष्ट हो. या मंदभाग्येस दुसऱ्या जन्मीं तरी हेच पति मिळोत. हरहर ! या जगामध्यें त्यांचें हेंच शेवटचें दर्शन ना ? देवा,

झिंजोटी—दीपचंदी.

देई प्रियासि सदैव सुखा । दुःख शिवो न तदीय नखा ॥ ध्रु० ॥ हतदैवा ही स्फूर्तितुनि आवो सुहृज्जनीं प्रमुखा ॥ १ ॥ अंतकालिंची विनति करीं मी करुनी दीनमुखा ॥ २ ॥

(सचिंत उभी रहाते.)

(शुंभसेन, फत्तेसिंग व सेवक प्रवेश करितात.)

शुं०—आतां मला घोड्याच्या टापा ऐकूं आल्या.

फ०—मलाही ऐकूं आल्या. त्या पहा अजून ऐकूं येत आहेत.

(सर्व ऐकूं लागतात.)

शुं०—आपली शिकार फसली वाटतें. तो खास पळून गेला. पण त्याचा पाठलाग केला असतां तो अजून सांपडेल.

फ०—मला सुद्धां वाटतें कीं तो बेसावध असल्यामुळें आपल्या हातीं अजून सुद्धां लागेल. (हळूच) पण थांबा, तें पाहिलें का पली-कडे कोण बसलें आहे तें ?

शुं०—शूरसेनच तो. मी पैजेनें सांगतों तोच आहे. नसेल तर मी दोन्ही हात कलम करून टाकीन.

फ०—मग मला पैसे कोणत्या हातानें देणार ?

शुं०—(मनांत) या बेट्याला अशा प्रसंगीं सुद्धां पैशावांचून कांहीं सुचत नाहीं, हं, फत्तेसिंगा, तयार हो, या कामांत फत्ते झाली पाहिजे बरें का ? हं, घे देवाचें नांव.

(फत्तेसिंग आदिकरून सर्व मालिनीस वार करावयास पुढें सरसावतात.)

फ०—हं, धनसिंग, दौलतसिंग, व्हा तयार.

शा०—देवा, त्यांना चिरायु व सुखी कर. (भीतीनें ओरडून बेशुद्ध होते.)

फ०—हं, हटा मागें लवकर. अहो शुंभसेन महाराज, हा शूरसेन नाहीं, आणि बकुलही नाहीं. ही कोणी स्त्री आहे. अंग पहा किती सडपातळ आहे! आणि आवाज किती मंजुळ! जणुं काय रुपयांचा नादच

शुं०—अरे, त्या लबाडानें आपला आवाज बदलला असेल.

फ०— तें सर्व खरें. पण त्याला आपला पुष्टपणा तर नाहींना बदलतां आला ?

शुं०—तू ह्मणतोस तें खरें आहे. (घाबरून) तर मग आपली मसलत फसली वाटतें. बरें पण ही स्त्री कोण असावी ? थांब, आतां इतक्यांत चंद्रोदय होऊन आपोआपच कळेल ही कोण आहे तें. तो कारटा मुद्दां इतक्यांतच येईल. त्यास मीं त्याच्या बापाकडून ह्मणून खोटें पत्र पाठविलें आहे. तर अगदीं गडबड न करितां येथें दबून रहा पाहूं. (सर्व दबून रहातात.)

बकुल—(प्रवेश करून) बाबांनीं मला इतक्या रात्रीं एकटें बोलावण्याचें कारण काय असावें बरें? दुसरें काय असणार ? ते आईबद्दल दुःख करीत असतील. देवा, त्यांचें सांत्वन माझ्या हातून होईल असें कर. त्यांना भेटण्याची मला किती तरी उत्कंठा झाली आहे !

पिलू—झुमाळी.

तत्कंठिं करुनि मम भुजवलया ॥ शोक कधीं नेईन लया ॥ ध्रु० ॥ प्रेमातिशयें आलिंगुनि त्या शांतवीन कधिं तद्धृदया ॥ १ ॥

अरे पण हें पुढें काय चाललें आहे ? असेंच कांहीं वेळ आड उभें राहून काय आहे तें पहावें. (आड उभा रहातो.)

शुं०—(मनांत) हं, आतां चंद्रोदयामुळें तिचा चेहरा आपणास स्पष्ट ओळखूं येईल.) जवळ जाऊन पहातो आणि दचकतो.) मला भ्रम तर झाला नाहींना? अरे ही शालिनी. जिचा पति होऊन मी राज्यप्राप्ति करून घेणार होतों तीच ही सुंदरी. अरे अरे! मोठी चूक झाली. करावयाला जावें एक आणि व्हावें भलतेंच अशी गत झाली. इला मारून मीं आपल्या आशावृक्षाचा मात्र समूळ नाश करून घेतला. पण ही येथें कशाला आली असावी बरें? त्या दुष्टाबरोबर एकांतीं गुजगुज गोष्टी करण्याकरितां नसेल ना? हो. त्याकरितांच असेल. (आनंदानें) तर मग मोठी मौजच झाली म्हणावयाची. आतां पाहूं बोलतेस कशी आपल्या जाराबरोबर! तो आज माझ्या हातांतून सुटला. बरें म्हणावें बच्चाजी, आपण जाल कोठें? हं हं म्हणतो आपणास आपल्या प्रियकरिणीच्या मागोमाग पाठवीन. विरहावस्थेचें दुःख फार दिवस अनुभविण्यास लावणार नाहीं. शालिनि, आजपर्यंत मला पाहिल्याबरोबर कपाळाला आठ्या घालीत होतीस. आता तो ताठा कुठें गेला?

झिंजोटी—त्रिवट.

अजवरि हेका ॥ धरुनि अनेकां ॥ समयां प्रणया अवगणिलें कां ॥ त्यजुनि विवेका ॥ करिसि शलाका—कटु—वचिं विफल तदुद्रेका ॥ भोगीं या स्वकपटविपाका ॥ आतां मारिं अगणित हांका ॥ त्वन्मुखपद्मिं चुंबनसेका करितों सोडुनि आशंका ॥ सोडवितो तुज या पंकांतुनी तव प्रणयी आतां का ॥

थांब, आजपर्यंत तूं हट्टानें नाकारिलेल्या चुंबनसुखाचा अनुभव हा

मी येतों पहा. पाहूं या वेळेस तुझा प्यार तुझें रक्षण करितो कीं काय ! (जवळ जाऊन) अहाहा ! मृत्यूनें अजून देखील हिच्या मुखावर आपला पगडा बसविला नाहीं.

बिलावर–दादरा.

अजूनि मृत्युराहुनें मुखीं न बाहु टाकिले ॥
अजूनि हास्य लास्य हें अधरिं करित राहिलें ॥
विशाल भालिं जाल कालधीवरें न फेंकिलें ॥
अलकरकिमा वसे अजुनि वदनिं ना ढळे ॥
सुरक्षिताहि अक्षता स्वदोष्ठमंजरी पळें ॥ वि-
शंक निष्कलंक दंतिं अंकिता करीं बळें ॥ १ ॥

(चुंबन घेऊं लागतो तोंच बकुल त्यास लाथ मारून खालीं पाडतो.)

शुं०—अरे फर्तेसिगा, धांव धांव लवकर. (फतेसिंग धांवून येतो.)

ब०—अरे अधमा, लाज वाटत नाहीं तुला ! आपल्या धन्याचे असेच उपकार फेडितोस ! प्रथम अशा उदार स्त्रीचा वध करून नंतर तिला अपमानकारक असें वर्तन करितोस ! हाय हाय ! शालिनि, तुझा अशा तऱ्हेनें अंत व्हावा ना ?

मांड–दादरा.

मम लालस कर्णी मंजुळ वाणी बोल शालिनि ॥ कां दीनवाणी पडलिस रानीं ॥ध्रु०॥
राजकुलीं जनि घेउनि भोगुनि सुख विलासिनि ॥ शय्या विजनीं निबिड विपिनिं रुचलि कां मनीं ॥ द्रव मानसिं आणीं महत्व मानीं ॥ १ ॥

मृदुल हृदय मधुर वचन शुद्ध अशी करणी ॥
पाहूं कोठें जगिं या आतां तुल्य न तुज कुणी ॥
तूं रूपाची खाणी ॥ जगती वाखाणी ॥ २ ॥

अलीकडे तूं मजवर आईप्रमाणें प्रेम केलेंस. देवानें एक आई स्वर्गी नेली आणि दुसरी दिली असें मला वाटत होतें. पण आतां ती-ही मला सोडून गेली. मला लढाईंत लागलेल्या जखमा तूं किती काळजीनें आणि प्रेमानें बऱ्या केल्यास, आणि आतां असें मौन कां धरिलें आहेस !

॥ साकी ॥

मृत तुज पाहुनि हृदयामध्यें क्षत हें नूतन झालें ॥
बरें करीं हें मातृत्वाचें वात्सल्य कुठें गेलें ॥ १ ॥

माझ्या जखमांना तूं अनेक तेलें लावून बरें केलेंस. तुझ्या जखमांना मी आतां कशानें बरें करूं ? या अश्रूंनी ? (रडूं लागतो.)

फ०—(मनांत) मला तर हा दुःखमय देखावा पहावत देखील नाहीं.

झुं०—हं, फ्लेमिंग, असा पहात काय उभा राहिलास ? एक घाव आणि दोन तुकडे करून टाक.

फ०—या प्रसंगानें तुमचें सुद्धां हृदय विरघळून गेलें असेल ह्मणून मला वाटत होतें. पण माझा तर्क चुकला. पत्थर तो पत्थरच रहावयाचा.

झुं०—बरें बरें. पुरें कर आपलें ब्रह्मज्ञान, आणि त्याला मारण्यास तयार हो. नाहीं तर मीच तुझ्यावरचें तें काम करितों.

फ०—अनाथ पोरावर मात्र आपलें युद्धचातुर्य दाखवा. आणि

एखाद्या अकस्मानें डोळे वटारिले ह्मणजे मग आपला खरा पळपुटेपणा दाखवीत चला.

शुं०—(त्रासानें) एक शब्द जास्त बोलण्यांत वेळ घालविशील तर मीच याला पार नाहींसा करून टाकीन.

फ०—(तिरस्कारानें) चल हो दूर. तुझा विटाळ सुद्धां नको यांच्यासारख्या सुंदर मुलांना. अरेरे ! काय करूं ? ज्या या हातानें या दुष्टाला वचन दिलें तो हात तोडावासा वाटतो. (बकुलाजवळ जाऊन) बाळा, ऊठ पाहूं.

ब०—मी तुमच्या पायां पडतों. या राजकन्येमध्यें अजून सुद्धां थोडी धुगधुगी राहिली आहेसें वाटतें. तर तिला लवकर येथून उचलून शहरांत चलाल तर मी तुह्मांला महाराजांकडून चांगलें बक्षीस देववीन.

फ०—(मनांत) जळो तें बक्षीस. त्याच्या आशेमुळें तर मजवर हा दुर्धर प्रसंग आला आहे. (उघड) बाळा, एक देव मात्र आतां तिचा त्राता आहे. तिची आशा बाळगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. बाळा, दुसरी एक भयंकर हत्या करण्याचें माझ्या कपाळीं आलें आहे.

ब०—तर मग तुह्मींच या निर्दोषी राजकन्येस मारिलें !

फ०—होय. तोच मी चांडाळ, मांग, निर्दय, कसाब काय पाहिजे तें ह्मण. स्वामीचा द्रोह करून माझ्या धनिणीस मारणारा जो अधम, दुष्ट, विश्वासघातकी, गळेकापू, खाटीक तो मीच. एका वधानें माझें अधाशी हृदय तृप्त न होतां दुसरा एक तितकाच नीच वध करण्याची इच्छा करीत आहे. बाळा, तुला कळला का माझा दुसरा बळी कोण आहे तो ? त्याचें नांव ऐकतांच तुझें चिमुकलें तोंड निस्तेज होऊन जाईल. आणि तुझें कोमल मन करपून जाईल.

ब०—अशा अनाथ प्राण्याचे प्राण वांचविण्याकरितां मी आपल्या प्राणाचा देखील बळी देईन.

फ०—(त्यास पोटाशीं धरून) अहाहा! धन्य आहे तुझी. देवा, अशा गोजिरवाण्या व उदार मुलावर शस्त्र टाकावयाचें ना?

शुं०—(रागानें) हं, फत्तेसिंग, मोहरा लक्ष्यांत आहेत ना?

फ०—बरी आठवण झाली. क्षणिक मायेला भुलून मी आपलें सर्वस्वीं नुकसान करून घेणार होतों. मन असें वितळूं देतां उपयोगी नाहीं. हं, बकुला, चल देवाचें स्मरण कर.

ब०—काय? तुम्ही मला मारणार?

फ०—हो. देवाची तशी इच्छा दिसते.

ब०—मला मारणारच असाल तर माझ्याशीं तरवारीचे दोन हात करून मग मला मारा. पण प्रथम मीं तुमचा कोणता अपराध केला हें सांगा.

फ०—अपराध विपराध मला कांहीं विचारूं नकोस. तें सर्व याला विचार.

ब०—(शुंभसेनाकडे पाहून) या दुष्टाचा मीं अपराध केला? एके वेळीं मीं याला जीवदान दिलेलें मात्र मला आठवतें. जीवदान देणें हा अपराध झाला काय? मग हलीं तुम्ही माझा वध करीत आहांत तो मजवर तुमचा प्रसादच म्हटला पाहिजे. जगांतील सर्वच शब्दांचा अर्थ बदलला वाटतें? पण या दुष्टाचें काळीजच उरफाटें आहे. तेव्हां याला सर्व गोष्टी उलट दिसूं लागणें हें साहजिक आहे. तरी पण तुम्ही तसे नाहीं असें तुमच्या सौम्य चेहऱ्यावरून दिसून येतें. अजून तुमच्या अंगीं दयेचा लेश तरी राहिला आहे खास. नाहीं तर हे दीर्घ श्वास तुम्ही सोडितां ना. तसेंच, हे डोळे पहा कसे

अश्रूंनीं डबडबलेले आहेत. नका, नका, त्यांना आवरूं नका. पाण्याच्या रूपानें वहाणाऱ्या भूतदयेला कठोर मनानें थिजवून टाकूं नका.

फ०—(मनांत) या मुलाच्या भाषणांत खास मोहनी आहे.

शुं०—गप बैस कारट्या. हं, फत्तेसिंग, येथें तुम्हांला नाटकी भाषणें ऐकण्याकरितां आणिलें नाहीं. मोहरा ध्यानांत असूं द्या.

फ०—शुंभसेन, निर्जीव मोहरा घेऊन काय करितां ? हा सजीव मोहरा सोडून त्या चकचकणाऱ्या टिकल्यांनीं मला भुरळ पडेल असें तुम्हांस वाटतें काय ?

शुं०—काय करावें या हरामखोराला ? थांब गुलामा, शालिनीला तूंच मारिलेंस असें आतां प्रकोपमहाराजांना जाऊन कळवितों.

फ०— जा जा, मूर्खा! मला पाहिजे तें शासन कर. तें भोगण्यास मी एका पायावर तयार आहें. उद्यां माझ्या गळ्याला पाश लागला तरी पुरवला. पण हा मायापाश मला तोडवत नाहीं. (बकुलास पोटाशीं धरितो.) धन्य आहें मी आज. माझ्या सगळ्या जन्मांत आज याच्यामुळें मला प्रथम सद्बुद्धि झाली.

ब०—तुमचें नांव फत्तेसिंग आहे असें वाटतें. बरें तर, फत्तेसिंग, माझ्या बाबांना माहींना तुम्हीं कांहीं अपाय केला ?

फ०—नाहीं बाळ, तुझें भाग्य थोर यांत कांहीं शंका नाहीं. तुझ्या बाबांना मारण्याकरितां म्हणून आम्ही येथें आलों तों राजकन्येस न ओळखितां तिलाच मारिलें. बाळा, आतां तुला व तुझ्या बाबांना उदंड आयुष्य असो.

ब०—(शालिनीकडे पाहून) देव तुम्हांला या हत्येबद्दल क्षमा करो. हरहर ! शालिनि, तुझ्या मरणामुळें प्रकोपमहाराजांना किती तरी दुःख होईल !

झिंजोटी—झुमाळी.

हें वृत्त ऐकुनी आण त्यजीलचि प्राण आज नृ-
पति । शोकाकुल होउनि चित्तीं । ही नगरी
सकल उदास होइलचि खास घोर त्वन्मिषनें ।
गुणवंते नगराभरणे । अजि दाहि दिशांसि
नितांत होइ आकांत घात काळें । किति केला
राजसबाळे ॥ १ ॥

शालिनि, आतां मी शहरांत तोंड कसें दाखवूं ? (हातांनीं तोंड झांकतो).

शुं०—(मनांत) शहरांत जाण्याला तुला मी जीवंत ठेवीन तर मग ती काळजी तुला वहावी लागेल. (त्यास मारण्याकरितां धांवून जातो तों फत्तेसिंग त्यास धरितो.)

ब०—हा नीचा, षंढाप्रमाणें बेसावध असतां प्रहार करितोस काय? चल ये पुढं. (तरवार उपसतो).

फ०—हा दुष्टा, शेवटीं तूं आपल्या गुणावरच गेलास. थांब, तुला सुद्धां ईश्वराच्या न्यायासनापुढें पाठवितों. (त्यास धरितो.)

शुं०—मी तुझ्या पायां पडतों. मला मारूं नकोस. जीवदान दे

फ०—तुला जीवदान देऊं? कशाकरितां? याच उदार मुला-प्रमाणें तुझ्या रागास बळी पडण्याकरितां? आणि जगावर तुझ्यासारख्या राक्षसाला मोकळें सोडण्याकरितां? मी इतका शहाणा नाहीं. समजलास?

शुं०—(फत्तेसिंगाच्या लोकांस) तुम्ही तरी मला वांचवा.

एकजण—आपल्या हातून हीं भयंकर कृत्यें होतांना सुद्धां आम-

त्यांनीं बघवलीं नसतीं. पण फत्तेसिंगांच्या मुरवतीस्तव आम्हीं इतका वेळ तुम्हांला ठार केलें नाहीं.

शुं०—(रडत) अरे, मला कोणीच कारे त्राता उरला नाहीं ! (ओरडतो.) धांवा हो धांवा, माझा प्राण हे दुष्ट लोक घेत आहेत.

फ०—कर शंखध्वनि. आणखी शंभरदां. (तोंडांत बोळा घालतो.) आतां काय करिशील ? थांब, असें हातपाय आपटणें सोडून दे. आणि माझ्या हातांपायांही पडूं नकोस. लवकरच तू या सर्व जगाच्या न्यायाधीशापुढें जाशील. त्यापुढें गरीब, श्रीमंत, निर्बल, बलवान् सर्व एक आहेत. त्या भगवानाचें चिंतन कर. व आपल्या अपराधां-बद्दल त्याची क्षमा माग तो दयाळू आहे. माझ्या पायां पडून काय करितोस !

(शुंभसेन बकुलाच्या पायां पडतो.)

ब०—फत्तेसिंग, या नीचाला मारूं नका.

फ०—बकुला, जग किती नीच आहे याचा अजून तुला अनुभव नाहीं. याला जिवंत ठेवून कसें चालेल ? (शुंभसेनास) चल, आटप लवकर. अथवा ही शिक्षा तुला फारच हलकी आहे. परलोकीं ईश्वर तुला शिक्षा देण्यापूर्वी या जगांतील शिक्षा सोसण्यास तुला तयार झालें पाहिजे. (भोंवतालच्या लोकांस) चलारे, पकडा याला. बांधा याच्या मुसक्या. आणि चला याला घेऊन प्रकोपमहाराजांकडे.

(ते त्याप्रमाणें करितात.)

ब०—मीही जातों या दुष्टाबरोबर. व या राजकन्येकरितां वाहनाची तयारी करून परत येतों. (फत्तेसिंगाशिवाय सर्व जातात.)

फ०—(स्वतःशीं) आतां काय करावें बरें ? हें वर्तमान प्रकोप-महाराजांस कळवावें कीं नाहीं ? हें ऐकतांच त्यांच्या अंगाचा तिळपा-पड होऊन जाईल. व मग मला सुद्धां शुंभसेनामागोमाग जावें लाग-

णार. शहरांतील प्रत्येक मनुष्य माझ्याकडे बोट दाखवून म्हणूं लागेल कीं, हाच तो आपल्या राजकन्येचा द्रव्यासाठीं गळा कापणारा खाटीक. मी फांसावर लटकत असतां मजकरितां एकाही डोळ्यांत अश्रूचा थेंब दिसणार नाहीं. व मग सर्व शहराचे शिव्याशाप घेत घेत आमची स्वारी यमपुरींत प्रवेश करणार. व मग माझ्या अंगाला सुया बोंच-बोंचून यमदूत माझा छळ करणार. (अंगावर कांटा आल्याचा आवि-र्भाव करून) हा विचार येतांच माझ्या अंगावर तर कांटा उभा रा-हिला. माझ्या सर्वांगाला यमदूत अशा तऱ्हेनें सुया लावणार म्हणून हे केस जणु मला दाखवीतच आहेत पण चिंता नाहीं. आजपासून मीं सचोटीनें, प्रामाणिकपणानें वागण्याचा निश्चय केला आहे. तर कांहीं होवो. सर्व खरें खरें सांगून फांशीं गेलों तरी पत्करलें पण या मनाच्या बोंचण्या आपणास कधींही सहन करवणार नाहींत. आजप-र्यंत जे लोक मला ' द्रव्यप्रिय'' फत्तेसिंग म्हणून ओळखीत असत तेच आतां 'सत्यप्रिय'' फत्तेसिंग या नांवानें ओळखूं लागतील. (ऐकल्यासें दाखवून) अरे, पण ह्या पहा त्याच टापा पुनः ऐकूं येऊं लागल्या.

शू०—(प्रवेश करून) (मनांत) राजवाड्यांत सर्वत्र शांतता आहे. बकुल व शालिनी यांचा मात्र कुठें पत्ता नाहीं. हें आहे काय याचा कांहींच अंदाज होत नाहीं. (बरोबरच्या लोकांस) चलारे लौकर, सावधगिरीनें पण जलद चला माझ्या पाठीमागून.

फ०—(मनांत) हा तो हतभागी शूरसेन तर नसेल ना ? होय. तोच हा. अरे हतभाग्या ! हें पहा दुर्दैवानें तुझ्याकरितां विषाचें ताट वाढून ठेविलें आहे. पण हा घाबरलेलाच दिसत आहे. यास हें वृत्त कळलें तर नसेल ?

शू०—या ठिकाणीं तुम्हीं राजकन्या शालिनी पाहिलीत का ? कां ? हा प्रश्न ऐकून तोंड असें गोरेंमोरें केलेंत ? लवकर सांगा काय झालें तें. काय ! मरून पडलेली ? (धाडकन् अंग टाकितो.)

फ०—(एकीकडे) या अधमामुळें आणखी किती सत्पुरुषांचे प्राण जाणार असतील न कळे. मी कपाळकरंटा ज्न्मलों तरी कशाकरितां? (उघड) महाराज, सावध व्हा, सावध व्हा.

शू०—(सावध होऊन) फत्तेसिंग, अहो आतां कशाकरितां मला सावध करितां? एका घावासरसे माझ्या या दुःख भोगण्यासाठींच उत्पन्न झालेल्या शरीराचे दोन तुकडे करा. फत्तेसिंग, मला कारागृहांतच कां नाहीं ठार मारिलें? मजवर सूड उगविण्याकरितां इतके आयास कां घेतले?

फ०—महाराज, यांना मीं जाणून मारिलें असें आपणास वाटतें का? मी नीच तर खराच, पण हें कृत्य करण्याइतका नीचपणा माझ्या अंगीं नाहीं. यांना मारणारा चांडाळ कुंभसेन हल्लीं तुरुंगांत एखाद्या भयंकर शिक्षेची अपेक्षा करीत पडला असेल.

शू०—त्या दुष्टाला तुह्मींच कारागृहांत धाडून दिलें तर? फत्तेसिंग, मला क्षमा करा. शोकाच्या आवेशांत मीं तुह्मांवर भलताच संशय घेतला. पण मजवर दुसरा एक अनुग्रह करा.

फ०—काय ती आज्ञा व्हावी.

शू०—मला या राजकन्येच्या मागोमाग जाऊं द्या.

फ०—शिवशिव! काय बोलतां हें? या तरवारीचा आणि माझा संबंधच नको यापुढें. (फेंकून देतो.)

शू०—फत्तेसिंग, जिवंत रहाण्यासारखें या जगांत काय उरलें आहे?

जोगी–धुमाळी.

ठेउनि प्राण करूं मी काय ॥ ऐसा हतभागी ॥ ध्रु० ॥ सौंदर्याची केवळ खाण ॥ नृपदुहिता

ही सुगुणनिधान ॥ मजसाठीं त्यजिते स्वप्राण ॥
पुष्पसमान मृदुलांगी ॥ १ ॥

थांबा, मीच हें काम उरकून टाकितों. हे प्राण कसे जड झाले आहेत.

फ०—महाराज, आत्महत्त्येसारखें पातक शिरावर घेण्यास तुम्ही तयार आहां?

शू०—फत्तेसिंग, आत्महत्त्या करण्यास माझा आत्मा या शरीरांत राहिला आहे कुठें? तो या राजकन्येच्या आत्म्याबरोबर स्वर्गी निघून गेला आहे. शिवाय, असें पहा की, मजकडून झालेल्या पातकांपुढें आत्महत्त्येचें पातक कांहींच नाहीं.

कालंगडा—दीपचंदी.

याहुनि गुरुतर पातक काय ॥ ध्रु० ॥ या पा-
प्यानें राजसुतेच्या केला जिवासि अपाय ॥ १ ॥
या पापार्णविं आत्मवधाचें पातक लोपुनि
जाय ॥ २ ॥

फ०—महाराज, शालिनी बाईसाहेब हालचाल करीत आहेत. त्यावरून त्या जिवंत असून त्यांना बोलण्याची इच्छा आहे असें दिसतें.

शू०—काय शालिनी जिवंत? हे परमेश्वरा,

कालंगडा—दादरा.

तूं अनाथनाथ अशी कीर्ति दिगंतीं गाजे ॥ पू-
र्णपणें तुज संज्ञा हे भगवन् ती साजे ॥ ध्रु० ॥
नवयौवन अनुभवितां ॥ कां हरिली राजसुता ॥
हाय कसें गळतें हें कुसुम वसंतीं ताजें ॥ १ ॥

हे उदात्तचरिते शालिनि, शेवटीं याच स्थळीं तुला मरण यावेंना ? आणि तेंही व्याघ्रादलक्याच दुष्ट मनुष्याच्या हातून ? आतां मी भगिनि ह्मणून कोणाला हांक मारूं ? (शालिनी सुस्कारा टाकिते.) इनें दीर्घ सुस्कारा कां बरें टाकिला असावा ? (उघड) शालिनि, तुझ्या मनांत कांहीं बोलावयाचें आहे असें दिसतें. (वारा घालूं लागतो.)

(शालिनी हळू हळू उठून बसते.)

शू०—काय ? उठून बसण्याची तुझ्यांत शक्ति आहे तर ?

शा०—सुदैवानें—अथवा दुर्दैवानें ह्मटलें तर जास्त शोभेल—मला त्या मारेकऱ्यांचा एकही वार लागला नाहीं. मी त्या गर्दींत जी मूर्च्छित झालें ती ही सावध झालें.

शू०—तर मग तुला खचित जखम लागली नाहीं ? (निरखून पहातो) अहाहा ! देवा !

झिंजोटी-धुमाळी.

प्रभुजी प्रभुजी कृति धन्य तुझी ॥ लीन न होतां त्वत्पदपंकजिं ॥ मूढचि पडति वितर्कामाजी ॥ ध्रु० ॥ मजसम अगणित पापि कृतांता ॥ असति तयांच्या करिंरे घाता ॥ अंतक जाण असे ही मान नियोजिं कृपाण तियेवरि प्राण न यांसि समान ह्रर्ीं कौर्य त्यजीं ॥ १ ॥

बरें पण फत्तेसिंग, मी राजवाड्यांतून निघालों त्या वेळीं माझा बकुळही त्या ठिकाणीं नव्हता. त्याच्यावर त्या दुष्टानें असाच कांहीं प्रसंग नाहींना आणिला ? बोला, तुह्मांला ठाऊक असलें पाहिजे. माझें मन फार अधीर झालें आहे.

फ०—महाराज, आपला तर्क खरा आहे. परंतु ईश्वरानें मला सद्बुद्धि देऊन तो प्रसंग टाळिला. मीं आपले लोक बरोबर देऊन त्यांना राजवाड्यांत पोहोंचविण्याची तजवीज केली आहे. महाराजांना सर्व हकीकत मग सांगेन. मीही या कामांत अपराधी आहें. पण आधीं शालिनीबाईसाहेबांना शहरांत नेण्याची तजवीज केली पाहिजे. नंतर माझ्या अपराधाची शिक्षा घेण्याला मी तयार आहें.

शू०—ठीक आहे. मग तुम्हीच राजवाड्यांत जा. आणि ही सर्व हकीकत कळवून पुढची तजवीज करा. तेथपर्यंत तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवून असा.

फ०—आपण जवळ असल्यावर बाईसाहेबांना कांहींएक भय नाहीं ही माझी खात्री आहे. मग मी येतों रजा. (जातो.)

शू०—(शिपायांना) तुमची आतां गरज नाहीं. तुम्हीही आतां जा, आणि माझ्या बकुलला वीरसेन महाराजांच्या स्वाधीन करून ठेवा. इतक्यांत मी आलोंच. (ते जातात.) शालिनि, तुझी भीति गेली ना?

शा०—गेली, पण ती जाण्यापूर्वींच मी फार दुःखी होतें.

शू०—शालिनि, असें दुःखाचें बोलणें तूं या वेळीं कां बरें काढावेंस? तुझ्यासारख्या अद्वितीय गुणांच्या स्त्रिया जगामध्यें फार थोड्या आढळतील. तुझ्या गुणांची मीं पारख केली असें मी समजत होतों, परंतु हा निवळ भ्रम होता. आतां काय काय घडलें हें जरी मला सर्व माहीत नाहीं तरी येथें येण्यामध्यें तुझा हेतु काय होता हें मीं ताडिलें. माझ्यासारख्या क्षुद्र मनुष्यासाठीं तूं आपल्या जिवाला इतका कशाला बरें त्रास दिलास? आज जर तुझें कांहीं बरेंवाईट होतें तर मला या विचारानें किती दुःख झालें असतें तुला ठाऊक आहे का? स्त्रियांसाठीं पुरुषांनीं आपला जीव धोक्यांत घालणें हा त्यांचा धर्म आहे. परंतु स्त्रियांनीं पुरुषांचे प्राण रक्षण करण्याकरितां

अशीं साहसें करावीं याला कुठेंही आधार नाहीं. अग, आमचें काय? अशीं हजारों संकटें नेहमीं आमच्यावर येतात. कोणी त्यांतून पार पडतात, कोणी प्राणाला मुकून परलोकचा रस्ता धरितात. म्हणून तुझ्यासारख्या सुकुमार सुंदर स्त्रियांनीं तीं टाळण्याकरितां आपल्या जिवाला अपाय करून घ्यावा हें चांगलें का?

शा०—स्त्रियांना अयोग्य असें कांहीं माझ्या हातून घडलें असेल तर आपण मला त्याची क्षमा करावी. पण लहानपणापासून माझे फार लाड होत गेल्यामुळें चांगलें कोणचें, आणि वाईट कोणचें, हें कुणींच मला शिकविलें नाहीं. माझ्या मनाला जें आवडतें तें नेहमीं मी करितें, आणि मला करूं देतात. आज आपल्यावर संकट येणार हें मनांत आल्यावर घरीं चैन पडेना म्हणून मी येथें आलें. या वेळीं एकटी इतकी दूर येणें बरें दिसणार नाहीं ही शंकाच मला आली नाहीं. एरवीं, जिवाला भीति येवढ्यापुरतेंच आपलें बोलणें असेल, तर मला तरी जगण्याची इच्छा पाहिजे कशाला? माझ्या वांट्याचें सुख होतें तेवढें मीं भोगिलें.

शू०—(मनांत) अजून इनें कष्टी कां बरें असावें? (उघड) शालिनि, अशी निराश कां होतेस? परमेश्वराच्या घरीं न्याय असेल तर तुझ्यासारख्या शूर, उदार स्त्रीला दुःखाचा लेशही शिवणार नाहीं. परंतु माझी तुला हात जोडून इतकीच विनंति आहे कीं, पुन्हा असें साहस करून आपल्या मित्रवर्गास काळजींत टाकूं नकोस.

शा०—आपल्याला माझ्याबद्दल काळजी नसावी. मला दुःख किती मिळवयाचें आणि सुख किती मिळवयाचें हें पूर्वींच ठरलेलें आहे. आतां प्राणाची काळजी मला हवी कशाला? महाराज, राग न येईल तर सांगतें; ज्या दिवशीं महालांत आपलें माझें बोलणें झालें त्याच

दिवशीं माझ्या कपाळीं सुख किती आहे हें करून चुकलें, ती गोष्ट पुन्हा आज काढण्याची माझी इच्छा आहे असें आपण समजूं नये. त्या वेळीं देखील मीं तें बोलणें काढावयाचें नव्हे. पण हें माझ्या लक्ष्यांत मागाहून आलें. माझा आपण स्वीकार करावा इतकी माझी योग्यता नाहीं ही माझी त्या वेळीं खात्री झाली. आपल्याला माझी दया यावी ह्मणून मी बोलत नाहीं. माझें करणें आपल्याला चमत्कारिक वाटूं नये ह्मणून सांगतें. आपल्यासारखीं माणसें ज्या जगांत नेहमीं उद्विग्न रहातात त्यांत मी सुखी होणें ह्मणजे अन्याय होईल. ह्मणून ह्मणतें आतां मला काळजी कशाला ?

शू०—(स्वत:शीं) तर मग वीरसेन दुसऱ्याच स्त्रीला शालिनी समजून तिजवर अनुरक्त झाला असें दिसतें. बरें, पण माझें बोलणें इतकें हिला लागलें असावें का ? अहाहा ! काय हें स्त्रीरत्न ! हिचा जन्म जर ही ह्मणते त्याप्रमाणें खरोखर दु:खांत गेला तर—छे:, हा विचारच सहन होत नाहीं. (उघड) शालिनि, माझ्या बोलण्यानें इतकें तुझें मन दुखावेल असें त्या वेळीं मला बिलकुल वाटलें नाहीं. तुझें कल्याण कसें होईल, तुला सुख कसें मिळेल हे विचार माझ्या मनांत घोळत असतात हें तुला माहीत असलें पाहिजे. मग माझ्या बोलण्याचा तूं इतका राग धरावयाचा नव्हे.

शा०—आपल्या पायांची शपथ घेऊन सांगतें कीं मला त्याचा अगदीं राग आला नाहीं. राग कां यावा ? तें सुख भोगण्याला मी योग्य नाहीं. आणि देवाला साक्षी करून सांगतें कीं मी त्याची आशा केव्हांच सोडून दिली आहे.

शू०—(स्वत:शीं) माझ्याकरितां शालिनीसारख्या अप्रतिम सुंदरीनें दु:ख कां बरें करीत बसावें ? ती अजून लहान असल्यामुळें तिच्या मनांतील कल्पनाही लवकरच निघून जाईल अशी माझी स-

मजूर होती. पण ती किती निराधार होती ! आणि वास्तविक पाहिलें तर तिचा निश्चयी स्वभाव मला चांगला माहीत झाल्यावर देखील ती माझी समजूत राहिली ही माझीच चूक. मी यःकश्चित् क्षुद्र मनुष्य, असें असून ज्या स्त्रीनें मला आपलें प्रेम वाहिलें, माझ्याकरितां, माझ्या लाडक्या मुलाकरितां अनेक प्रकारची झीज सोसली, आपल्या पित्याची इतराजी करून घेतली, जी माझ्या जागीं कारागृहवास भोगण्याला तयार झाली आणि अखेर जिनें माझ्या ऐवजीं माझ्या शत्रूंना आपला प्राण वाहण्याकरितां या ठिकाणीं येण्याचें धाडस केलें त्या स्त्रीचा अव्हेर करण्याचा मला काय बरें अधिकार पोहोंचतो ! माझ्याकरितां जर ती रात्रंदिवस झुरत राहिली तर तें पाप माझ्या मस्तकीं येऊन पडणार नाहीं का ? मला कदाचित या गोष्टीपासून फारसें सुख होणार नाहीं, पण मी आपल्याच सुखाकडे पाहणें ह्मणजे एका तऱ्हेचा आपलपोटेपणाच नव्हे का ? आणि मला तरी सुख नाहीं होणार ह्मणून कशावरून ! ईश्वराचे खेळ आह्मां मानवांना अगम्य आहेत. माझ्या दुःखाचा मला विसर पडावा ह्मणूनच अशा स्त्रीचें प्रेम माझ्यावर जडावें हा योग त्यानें कदाचित् जुळवून आणिला असेल. सर्व गोष्टींचा विचार करितां तिची इच्छा मी मोडणें मला आतां रास्त दिसत नाहीं. (उघड) शालिनि, तुला दुःखी पाहून मला फार दुःख होतें.

शा०—आपला स्वभाव फार मायाळू आहे हें मला माहीत आहे. पण माझ्याकरितां तें दुःख कशाला ?

शू०—असें कां बरें ह्मणतेस ? तुझ्याइतकें कोणत्याही स्त्रीनें माझें मन अलीकडे बरेच दिवस वेधिलें नाहीं. आणि ह्मणून तुझ्या सुखाची मला फार काळजी आहे.

शा०—सुखाची गोष्ट पुन्हा पुन्हा कशाला ? त्याच्यावर मीं केव्हांच पाणी सोडिलें. त्याबद्दल आपण काळजी वाहूं नये.

शू०—शालिनि, तुझें सुख कशांत आहे तें तरी तुला खात्रीनें ठाऊक आहे का?

शा०—याचें उत्तर देऊन काय करावयाचें आहे!

शू०—पण सांग तरी पाहूं.

शा०—आपल्याला सर्व ठाऊक आहे. पुन्हा माझ्या तोंडांतून वदविण्यांत काय अर्थ?

शू०—शालिनि, असें समज, मी पूर्वी लग्न करावयाला तयार नव्हतों, पण हल्लीं मीं आपला निश्चय बदलला. माझा स्वीकार करावयाला तूं तयार आहेस का?

शा०—हात जोडितें. अशा उगीच कल्पना करावयाला मला आपण सांगू नये.

शू०—शालिनि, निदान येवढें सांग. माझी पत्नी झाल्यावर तूं खास सुखी होशील का? त्याचप्रमाणें लोक काय बरें ह्मणतील?

झिंजोटी–त्रिवट.

सुंदरी विलासिनी। सेवि कशी मधुरा विधुरा
विधु राहु जशी रविसि कुमुदिनी ॥ ध्रु० ॥
जन्म वृथा करि काय कधीं तरि मोहिनी रो-
हिणी वाहुनी निज तनु इतरा शशिवांचोनी ॥ १ ॥

शा०—पण या प्रश्नांचीं उत्तरें देऊन त्याचा उपयोग काय?

शू०—माझा अंगीकार करण्याची तुझी जर इच्छा असेल तर मलाही त्यांत सुख आहे.

शा०—(मनांत) हें मी काय ऐकिलें? छेः मला अर्थ समजला नाहीं. इतकें सुख माझ्या कुठलें नशीबीं?

शू०—शालिनि, तुझ्यासारखें रत्न मला मिळवून देण्यामध्यें परमेश्वराचा कांहीं तरी हेतु दिसतो. कां? कोणत्या विचारांत आहेस? बोल.

शा०—मीं आपली चूक कबूल केल्यावर आतां तरी माझी थट्टा करूं नये, येवढेंच मागतें.

शू०—(तिला जवळ घेऊन) शालिनि, ही थट्टा नाहीं. तूं आतां माझी आहेस. तुझ्यासारख्या शूर स्त्रीची थट्टा करण्याचें साहस कोण बरें करील!

शा०—मग माझी खरोखरच का आपणाला दया आली! आतां मात्र माझ्यासारखी सुखी कोणी नाहीं.

भैरवी–त्रिवट.

वचन नच मधुर अमृतचि गमे ॥ सुखि मन
रमेचि श्रमे विरमेहि शमेहि क्रमें ॥ ध्रु० ॥
मुदें निरुपमें नयन जल वमे ॥ प्लुत घन–तमें
विषमेंचि तमें परमेश भ्रमे ॥ १ ॥ या दीनेची
केधवां कैशी अनुकंपा ॥ आली अपणां सांगुनी
हराच हृत्तापा ॥ २ ॥

शू०—शालिनि, आतां तुझ्यापासून मला कांहींएक चोरून ठेवावयाचें नाहीं. चल, वेळ फार झाला. आपण रस्त्याला लागूं. वाटेनें तुला मी सर्व सांगतों. (जातात.)

प्रवेश ९ वा.

(वारांगनांचें नृत्य चाललें आहे. वीरसेन व शूरसेन आसनांवर बसले आहेत.)

काफी-त्रिवट.

वा०—तव वदुं किती थोरवी ॥ नृप त्वदभिधा-
श्रवण सुकवी रिपुमुख जेंवी उदक रवि ॥ यश
थकवि सुकवि ॥ ध्रु० ॥ निरसत रणसुनिपुण
रिपुगण जणुं घन अतिघनहि पवन क्षणांत
कृपाणपवि ॥ १ ॥

वी०—वारांगनांनो, आतां प्रीतिविषयक असें कांहीं ह्मणा बरें.

वा०—जशी महाराजांची आज्ञा.

* झिंझोटी-धुमाळी.

या जगीं कवि अरसिक गमती ॥ युवतीविषयीं
जड त्यांचि मति ॥ ध्रु० ॥ पक्वबिंबसम चुंबन-
योग्यचि अधर विद्रुमें उपमित करिती ॥ १ ॥
गल्ल रुचिर उत्फुल्ल गुलाबीं आम्रफलीं नच
कधीं तुलीती ॥ २ ॥

* या पदाबद्दल किंवा त्यास जोडून खालील भाग घातला असतां चालेल.

झिंजोटी-धुमाळी.

सखे करिं जनावरि या प्रसाद ॥ नच करीं मति कठोरा ॥ध्रु०॥
काय घडला सांग गे मजकडूनि असा प्रमाद ॥ १ ॥ भृंग कैसे
अंगनासह सुखें करिती निनाद ॥ २ ॥

वी०—(स्वत:शीं) स्वत:ची प्रिया आपणावर तुष्ट नाहीं असें ऐकण्याचा आतां गीतामध्येंच प्रसंग येणार. किती सुखी आहें मी.

(प्रकोप, शालिनी व मालिनी प्रवेश करितात.)

वी०—(उत्थापन देऊन) यावें महाराज, या वेळेस आपण मला भेट देण्याचा अनुग्रह कराल असें माझ्या ध्यानींमनींही नव्हतें. (प्रकोप वीरसेनास एकीकडे नेतो.)

शू०—(मनांत) वीरसेनानें मला पुन्हा आज सांगितलें कीं शालिनी त्याच्यावर अनुरक्त आहे. हा काय गोंधळ आहे कांहीं समजत नाहीं

प्र०—वीरसेना, तूं मला सांगितलेलें तुला आठवतें ना कीं शालिनीची तुजवर प्रीति आहे ?

वी०—हें काय विचारितां ! प्रत्यक्ष माझ्या कानांनीं ऐकलेल्या तिच्या शपथा खोट्या कशा ठरतील ? फार काय सांगूं ? तिच्या प्रत्येक शब्दांत मूर्तिमंत सत्य भरून गेलें होतें.

प्र०—तूं स्वप्नांत नव्हतास ही तुझी खात्री आहे ना ?

वी०—अगदीं बालंबाल. आणि सरतेशेवटीं जर हें सर्वच सुखमय स्वप्न ठरलें तर हा माझा आत्मा तात्काळच या शरीरांतून निघून जावो. कारण मग या जगांत प्राणधारण करण्यास योग्य असें काय राहिलें ?

प्र०—तुला मीं आधीं उगीच सूचना देऊन ठेविली आहे, येवढ्याकरितां कीं सत्य बाहेर आल्यावर तुझ्या मनाला एकदम धक्का बसूं नये. तुला खरें सांगूं ? आज मीं प्रत्यक्ष शालिनीलाच विचारिलें.

वी०—मग तिनें सर्व नाकबूल केलें काय ?

प्र०—होय, तिनें कानांवर हात ठेवून आपणास यांतील अक्षराक्षर माहीत नाहीं असें दर्शविलें.

वी०—ती लाजली असेल.

प्र०—छे: छे:, ती शंकाच नको. तुझ्याच शब्दांमध्यें सांगतों. तिच्या प्रत्येक शब्दांत मूर्तिमंत सत्य भरून गेलें होतें.

वी०—(स्वतःशीं) हरहर! मग मी त्या वेळेस स्वप्नांत होतों का? का हल्लीं मला स्वप्न पडत आहे? (चिमटा घेऊन) छेः, हें स्वप्न नव्हेच. रक्त येईपर्यंत जोरानें चिमटा घेतला, पण मी अजून जागा होत नाहीं. तर मग अगदीं निखालस ठरलें कीं तें पूर्वीचें सगळें स्वप्न ह्मणून. देवा, असें सुखकारक स्वप्न मोडणें तुझ्या दयाळुत्वास शोभतें का? तें स्वप्न तसेंच अंतकालपर्यंत राहूं देऊन त्यांतच या अभाग्याचा शेवट केला असतास तर किती चांगलें झालें असतें!

प्र०—वीरसेना, अजून निराश होऊं नकोस. या कोड्याचा एकदा सोक्ष कीं मोक्ष करून टाकावा ह्मणून मीं मुद्दाम शालिनीला माझ्याबरोबर आणिलें आहे. मालिनीसुद्धां ही गोष्ट ऐकून इतकी चकित झाली कीं ती आग्रह धरून माझ्याबरोबर आली. आतां तू असें कर कीं, तिजबद्दल मागणी घाल. मग मी आपली संमति प्रदर्शित करीन.

वी०—आपण सांगाल तसें करितों, म्याल तिकडे येतों, आणि सुचवाल तें बोलतों. माझ्या अंगीं आतां खरें विचाराल तर काडी-इतका देखील उत्साह राहिला नाहीं.

प्र०—असा धीर सोडून कसें होईल? (शालिनी व मालिनीकडे पाहून) मुलींनो, अशा उभ्या कां? (सर्वजण बसतात.)

वी०—(मालिनीकडे पाहून मनांत) हाच चेहरा मला स्वप्नांत पाहिलेला आठवतो. पण असें कसें होईल? असो. (उघड) महाराज, आपल्या चरणांपाशीं एक विनंति आहे. अभय असेल तर बोलतों.

प्र०—वीरसेना तुला अभय! बोल लवकर काय जें इष्ट असेल तें.

शा०—(एकीकडे) देवा, आणखी माझ्या जिवाचे किती धिंडवडे निघणार आहेत?

वी०—आपला संकेत आपल्या ध्यानांत असेलच.

प्र०—कोणता तुवा संकेत?

वी०—माझ्या पूज्य पित्याशीं केलेला.

प्र०—हं हं. लग्नासंबंधानें वाटतें?

वी०—आपण बरोबर ताडिलें.

प्र०—वीरसेना, माझ्या मनांत ही गोष्ट घोळत होतीच. त्या मूर्ख शुंभसेनाशीं शालिनीचा विवाह करून टाकावा असें प्रथम माझ्या मनांत आलें, पण आतां तो विचार बदलला.

वी०—तर मग मला धन्य करण्याला तुम्ही तयार आहांत असें मीं समजूं?

प्र०—हा अनुग्रह माझा नाहीं तर तुझाच आहे. कारण तुझ्या-सारखा वर त्रिभुवनांतही सांपडणार नाहीं.

वी०—(उठून मालिनीचा हात धरून) प्रिये, आतां विलंब कशाला लावितेस?

भैरवी–त्रिवट.

सखये पूर्ण मनोरथ झाले ॥ संशय-दोलारूढ हृदय हें सुखजलधींत बुडालें ॥ ध्रु० ॥ ये झणि वंदूं नत शीर्षी या तातपदां मन घालें ॥ १ ॥

(सर्व चकित होतात.)

मा०—महाराज, मीं तुम्हांला फसविलें. मला क्षमा करा.

वी०—तर काय तुझी प्रीति माझ्यावर नाहीं?

मा०—माझें आपणावर किती प्रेम आहे, याला ईश्वरच साक्ष.

वी०—मग अडचण कोणती राहिली?

मा०—महाराज, मी मालिनी नव्हे. तिचीच बहीण मी मा-लिनी आहे.

वी०—(थांबून) एवढेंच ना? मग यांत विशेष तें काय झालें?

भैरवी–त्रिवट.

सखेगे तूंचि मम शालिनी ॥ गुणशालिनी रमणी त्वदितर अनली ॥ ध्रु० ॥ मालिनि तव ही स्वसा अशी गे तेंवि ममहि भगिनी समजें मनीं ॥ १ ॥

प्र०—वीरसेना, तूं वेडा तर नाहींस ना? (शालिनी व मालिनी कुजबुजूं लागतात.)

वी०—प्रीतीमुळें मी वेडाच झालों आहें असें का म्हणतां?

शा०—बाबा, मी या सर्व गूढाचें स्पष्टीकरण करितें.

प्र०—तूं? मग आतांपर्यंत कां मौन धरिलें होतेंस?

शा०—(मालिनीला आलिंगून) या माझ्या आवडत्या बहिणीनें माझें नांव खोटेंच धारण करून वीरसेनांची प्रीति संपादन केली, हें या क्षणापर्यंत मला देखील ठाऊक नव्हतें.

प्र०—(रागानें) खरें की काय?

वी०—महाराज, कृपा करा आणि शांत व्हा.

शा०—हें तिनें कोणताही क्षुद्र विचार मनांत आणून केलें नाहीं, किंवा मोठेपणाच्या लोभानेंही केलें नाहीं. तर शुद्ध माझ्याकरितां हें कृत्य केलें.

प्र०—तुजकरितां?

शा०—होय बाबा. या अभागिनीचें हृदय तिच्या स्वाधीन नव्हतें. तें तुमच्या एका दुष्प्राप्य विषयावर जडलें होतें.

प्र०—हं आतां सर्व संदर्भ जुळला. तो विषय शूरसेनच असतील.

शू०--होय. याच अपात्र जनावर शालिनीनें प्रेम करून त्याला वाजवीपेक्षां अधिक मान दिला.

प्र०—तर मग मी मालिनीवर उगीच रागावलों. (तिला आलिंगून) मुली, आतां माझें समाधान झालें बरें. आतां आपल्या पतिमंदिरांत आनंदानें रहा.

मा०—(स्फुंदन) पण आतां आपल्या मनांत कांहीं किल्मिष राहिलें नाहीं ना?

प्र०—छेः छेः. मींच उलट तुझी क्षमा मागितली पाहिजे.

वी०—प्रिये मालिनि, या भगिनीप्रेमामुळें माझें तुजवरचें प्रेम द्विगुणित झालें आहे. पण मला अशी शंका येते कीं तुझें मजवर–

मा०—प्रिया, अजून ही शंका? प्रथम मात्र मी नुसत्या भगिनीप्रेमामुळेंच या कृत्यास प्रवृत्त झालें. पण आपली मूर्ति पाहिल्यावर माझें आपल्यावर किती प्रेम जडलें याची अटकळ माझ्या सोंगाची बतावणी मीं किती उत्तम रीतीनें केली यावरून आपणास बांधितां येईल.

वी०—खरेंच, तें माझ्या ध्यानींमनींही नव्हतें.

प्र०—असो. शूरसेन, जर माझ्या पूर्वीच्या कृत्याबद्दल तुम्हीं मनापासून क्षमा केली असेल तर माझी एक विनंति तुम्हीं अवश्य मान्य केली पाहिजे.

शू०—काय ती आज्ञा व्हावी.

प्र०—शालिनीचा अंगीकार करून मला काळजींतून सोडवा.

वी०—मित्रा, माझी सुद्धां अशीच विनंति आहे.

शू०—महाराज, शालिनीनें माझ्यावर इतके उपकार केले आहेत कीं, या वेळीं आपल्या बोलण्यास रुकार न दिल्यास आपला अ-

पमान केल्यासारखें जसें होईल त्याचप्रमाणें तिच्याशीं कृतघ्नतेनें वागल्याचा दोष येईल. महाराज, काय सांगूं?

झिंजोटी–धुमाळी.

पंकजगत भृंगसा न या देहाचा मी स्वामी ॥
रमणी ही स्वामिनी जाइं गुंतोनी तत्प्रेमीं ॥
हीच हृदानंद ही कंद प्रेमाचा सुखभूमि ॥
प्राणपरित्राण ही करी मम दासचि मी ॥ १ ॥

प्र०—धन्य आहे तुमच्या सुशील स्वभावाची. शालिनि, आतां झालें ना तुझ्या मनाप्रमाणें? (शालिनी लाजून खालीं पहाते.)

मा०—(एकीकडे) नाई, आतां माझ्या श्रमाचें चांगलें सार्थक झालें.

प्र०—विवाहाचा मुख्य भाग तर तुह्मीं मुलांमुलींनींच उरकून टाकिला आहे. सर्वांत नीरस भाग, ह्मणजे विवाहविधि करणें, हें मजकडे राहिलें आहे. शूरसेन, आतां हें माझें राज्य आपलेंच आहे असें समजा. तुह्मी व शालिनी, आणि वीरसेन व मालिनी, एकमेकांवर प्रेम ठेवा, आणि आपापलीं राज्यें चालवा. (मालिनीचा हात वीरसेनाच्या हातांत व शालिनीचा शूरसेनाच्या हातांत देतो.)

बकुल—(प्रवेश करून आश्चर्यानें मनांत) काय! शालिनी माझी आई झाली! (जवळ जाऊन प्रणाम करितो.)

प्र०—या चिमुकल्या वीरामुळेंच हा आनंदाचा समय प्राप्त झाला आहे ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. (त्यास आलिंगितो.)

ब०—(शालिनीजवळ जाऊन)

विहाग--त्रिवट.

अजवरि जैशि करिशि ममता ही ॥ ताई अ-
गाई अतांही करीं विस्मरलोंची जहालिस
आई ॥ ध्रु० ॥ झडकरि निज करिं पुनित करीं॥
या गगनांतूनी देवी जशी यावी तशी विरा-
जसी या भूभागीं ॥ दे आशीर्वच मज लव-
लाहीं ॥ १ ॥

आतां तरी मी तुझा पुत्र होण्याला योग्य आहें का ?

शा०—बाळ बकुला,

(मांड गरबा-दीपचंदी)

तुज पुत्रशताधिक मानीं ॥ सुत नारक बा-
ळांतूनी ॥ निज रक्षि जनकजननीसि वदती
ज्ञानी ॥ अतिरौद्र अधोगतिहूनी ॥ मज उद्ध-
रिलें अपमानवन्हिमधूनी ॥ १ ॥

प्र०—मुलांनो, आपल्या पोटचा गोळा दुसऱ्याच्या स्वाधीन के-
ल्यानें मनाला किती दुःख होतें याचा तुह्मांला अजून अनुभव नाहीं.
ईश्वरकृपेनें तुह्मांसारखीच सद्गुणी संतति झाल्यावर तुह्मांला याचा
प्रत्यय येईलच. मुलींना सुख द्या. त्यांची मनें फार कोंवळीं आहेत
ह्मणून— (हुंदका येतो.)

सू० व वी०—त्यांची तुह्मीं मुळींच काळजी करूं नका.

भीमपलास–त्रिवट.

प्रिय निज तनुहुनि सुदतिसि गणीन ॥ पळ-
भरि लव अवगणिनचि मनीं न ॥ ध्रु० ॥ ति-
ळहि न्हा न तर धृतिबल नृपवर चिंताधीन ॥ १ ॥

प्र०—तथास्तु.

(वारांगना नृत्य करीत गातात.)

भैरवी–धुमाळी.

हे प्रभुवर वधुवर सुखि कर अतिचिर मंगल
देईं तयां ॥ यांसि निरामय ठेवुनि अक्षय देईं
कृपाशय दीर्घ वया ॥ देईं सदा जय वारुनियां
भय ईश्वर अव्यय दीनजनाश्रय भक्तजनप्रिय
गूढतमक्रिय सौख्यमया ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

ईशस्तुति.

भैरव-त्रिवट.

तुज ध्यातां श्रीरामा गुणधामा अभिरामा हृद्‌-
यारामा ॥ मुखविहसितकामा धृतवनदामा
आनंदन अंतर्यामा ॥ ध्रु० ॥ हे इंदुवदन अर-
विंदरुचिर सुखकंद चरण तव वंदुनि हृदय
मिलिंद करुनि अति सुंदर घेउनि दुःखविरामा
तव नामा ॥ १ ॥ धीमंत धीर गुणवंत चिरं-
तन संत आजवर चिंतिति सुरवर संतत अंत
परंतु न हा तव महिमा परमा विश्रामा ॥२॥
सारंगनयन निःसंग निगमपारंगत मुनि तव
मंगल तनु भृङ्गं ध्याउनी दंगचि होति अ-
भंगयशा हे निःसीमा ॥ ३ ॥

National Library,
Calcutta-27.